# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख ७ माहे जून सन १८८० इसवी. अंक २२


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ां |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोक कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८३ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters, stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## नोटिस

मगनीराम तनसुकराय साहू दुकान तेल्हारें यास कणीराम राठी साहू दुकान तेल्हारें याजकडून कळविण्यांत येते कीं, तुह्मी तारीख १२ माहे मे सन १८८० इसवीचे पत्र टपालमार्फत पाठविलें त्यांतील मजकूर कळला त्याचें उत्तर खालीं लिहिल्याप्रमाणें:-----

आह्मी तुह्मास रुईचें ओझे देऊ केले त्यां पैकीं ११ ओझाचा अक्का दर ओझास २० वीस रुपये प्रमाणें घेतला. बाकी ओझे बिनअक्याचे देऊं केले. या अक्याचे व बिन अक्याचे ओझे मोजून देण्याचा करार फालगुन शुद्ध ९ पासून फालगुन शुद्ध १५ पावेतों मोजून देऊन रुपये घेण्याचा करार होता. त्याप्रमाणें आह्मी करारावर माल मोजून देत होतो; परंतु तुह्मी माल मोजून घेतला नाहीं. व रुपयेही दिले नाहींत. हल्लीं तुह्मी कराराविरुद्ध मागणें केलें आहे. हें गैर आहे. दिनभाव देण्याघेण्याचा मुळींच करार नाहीं. हल्लीं या नोटिशीनें तुह्मास इतकेंच कळवावयाचें कीं ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत रुईचे ओझे मोजून घ्यावे व त्याचे रुपये आह्मास [illegible]ख आणून द्यावे, नाहीं तर चालू भावानें माल फरोक्त करून नुकसानीचे रुपये तुह्मापासून फिर्याद करून घेतले जातील. कोर्टखर्च व या नोटिशीचा खर्च तुह्मापासून भरून घेऊ.

दुसरें---जवस तुमचे आह्मी घेतलें आहे त्याचा अक्का दर खंडीस १० रुपये प्रमाणें प्रथम दिले आहेत. बाकीचे रुपये माल मोजून दिल्यावर घेण्याचा करार आहे. जवस मोजण्याचा करार वैशाख शुद्ध १५ चा होता. त्याकरारावर तुह्मास माल मागितला पण तुह्मी दिला नाहीं व रुपयेही नेले नाहींत. हल्लीं ही नोटिस तुह्मास पावल्यापासून आठ रोजाचें आंत जवसाचा माल मोजून द्यावा व तुह्मी अपले रुपये घेऊन जावे. या मुदतींत जवस मोजून न द्याल तर कायद्याप्रमाणें तजवीज करून खर्चासुद्धां रुपये घेतले जातील. या नोटिशीचाही खर्च तुह्मापासून घेतला जाईल. कळावें. तारीख ४ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) कणीराम राठी साहू दुकान तेल्हारें दस्तूर मिठाराम.

### नोटिस.

मगनीराम तनसुकराय साहू दुकान पेठ तेल्हारे यांस. शिवलाल गुलाबचंद साहू दुकान तेल्हारे याजकडून कळविण्यांत येते कीं, तुह्मी तारीख १२ माहे मे सन १८८० इसवी रोजीं टपालमार्फत पत्र पाठविलें त्यांतील मजकूर कळला. तुमचे जवळ आमचे हातचे सट्टे आहेत त्यांतील कराराविरुद्ध त्या पत्रानें मागणें केलें आहे त्याप्रमाणें आह्मी देवाल नाहीं. सट्यांत करार फाल्गुन शुद्ध ९ पासून फाल्गुन शुद्ध १५ पावेतों रुईचे ओझे तकून देण्याचा करार आहे. दीन भाव देऊ किंवा घेऊ असा करार सट्यांत मुळींच नाहीं. ह्मणून कराराप्रमाणें रुईचे ओझेही आह्मी तकून देण्यास तयार होतो; परंतु तुह्मी ओझे तकून घेतले नाहींत. ही तुमची चूक आहे. पाहिजे असल्यास हल्लींही रुईचे ओझे ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत तेल्हारे एथें सट्यांतील कराराप्रमाणें आह्मी देण्यास तयार आहो. तुह्मी तकून घ्यावे. व आजपर्यंत माल ठेविला त्याचे घराचें भाडें द्यावें. आतां सदहू रुईचा माल आह्मी न ठेवितां चालू भावानें विकून जी रकम येईल त्याप्रमाणें तुह्मांस दिली जाईल. त्याप्रमाणें तुह्मी रकम न घेऊन जाल तर व्याज वगैरे आह्मी देवाल नाहीं.

दुसरें-- आह्मी तुह्मापासून जवस घेतलें त्याचा करार वैशाख शुद्ध १५ चा होता तो टळून गेला त्या करारा प्रमाणें जवसाचा माल तुह्मी मोजून दिला नाहीं. जवसाचे सट्याबद्दल तुह्मास दर खंडीस रुपये १० प्रमाणें आह्मी प्रथम दिले आहेत. बाकीचे रुपये माल मोजून दिल्यावर घेण्याचा करार आहे. तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत जवसाचा माल मोजून देऊन रुपये घेऊन जावे. सदरीं लिहिल्या प्रमाणें न कराल तर कायदेशीर तजवीज करून खर्चासुद्धां रुपये घेतले जातील.

तिसरें--- गव्हाचा सवदा आह्मी तुह्मास देऊं केला. त्याबद्दल दर खंडीस १० रुपये प्रमाणें अगऊ घेतले. व गहू देण्याचा करार वैशाख शुद्ध १५ चा आहे. त्याप्रमाणें आह्मी गहू मोजून देत असतां तुह्मी घेतले नाहींत व रुपये मागितले असतां तुह्मी दिले नाहींत तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत गहू मोजून घेऊन आमची रकम चुकती द्यावी. तसें न कराल तर पेठ भावानें गहू विकून जें नुकसान येईल तें भरून घेतलें जाईल. कळावें तारीख ४ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) शिवलाल गुलाबचंद साहू दुकान तेल्हारे. दस्तुर मिठाराम मोकमचंद.

### नोटिस

जानकी मर्द भोनाजी माळी बंड रहाणार पारशी तालुके बाळापुर जिल्हे अकोले इला खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझे लग्नाची बायको असून तुसी लग्न लावण्यास अंदाज पंध्रा वर्षें झालीं आहेत. तूं माझेपाशीं नांदणूक केलीस हल्लीं दोन वर्षें झालीं तुझा बाप माझे घरीं येऊन तुला लग्नाचे निमित्यानें घेऊन गेला नंतर आह्माकडून तुला आणण्याकरितां दोन तीन वेळां गाडी मनुष्य पाठविले तर तूं येते येते करतेस पण येत नाहींस सबब मी जातीनें ही आलो परंतु तुझा बाप तुला फितुराच्या गोष्टी सांगतो त्याप्रमाणें तूं करितेस हें नीट नाहीं हल्लीं या नोटिसीनें कळवितो कीं, ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत तूं आप होऊन आपले घरचे जे डागिने चांदी व सोनें, पिंतावर व लुगडे जे जें तूं घेऊन गेलीस ते सर्व घेऊन यावे न आल्यास रीतीप्रमाणें तुजवर आणि तुझे बापावर दावा करीन व कायद्याप्रमाणें तुला ताबेंत घेईन. कळावें तारीख २ जून १८८० इ०

( सही ) भोनाजी वल्लद महादाजी बंडे माळी रहाणार बाभूळगाव निशाणी खुद्द हातची.

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० या वाशिम जिल्ह्यांत नुकताच डाका पडला याची हकीकत जी मजला समजली ती आपणाकडे लिहून पाठविली आहे. मर्जीनुरूप प्रसिद्ध करावी.

तारीख २५ माहे मे सन १८८० इसवी रोजीं रात्रीं ९ वाजतां मौजे मोप तालुके वाशीम एथील गंगाराम मारवाडी व त्याचा माऊ यांचे घरावर सुमारें वीस लोकांनीं येऊन डाका घातला. माल व नगदी मिळून ६००।७०० रुपयांचा माल चोरीस गेला. डाकेवाले लोक हत्यारबंद होते.

ज्या समयीं ते लोक आले तेव्हां गंगाराम मारवाडी घरांत होता. तो तसाच पळून शेजारी न्हाव्याच्या घरांत दडला. त्याचा नोकर राठोड जातीचा असून त्याजपाशीं तरवार होती. त्यानें मोठ्या धैर्यानें डाकेकरी लोकांतील ४ जणांस बऱ्याच जखमा केल्या त्यांत एकाचे माडीवर वितभर जखम लागली आहे. त्यानें ती जखम तशीच पागोट्यानें बांधून अर्धा कोस जाऊन पडला. बाकीचे इसम पळाले. गावकरी दोघा इसमांस साधारण जखमा लागल्या आहेत. राठोडास तीन जखमा लागल्या पैकीं पोटावर, दंडावर एकेक आणि तळहाताचा तर तिसरा हिस्साच तुटला आहे. कांहीं जणांस गोठे लागले, आहे.

जेव्हां ते डाका घालणारे लोक आले तेव्हां गावकरी लोकांनीं त्यांचेवर हल्ला करण्याचा प्रसंग आणिला ह्मणून ते पळाले. परंतु गावकरी बिचारे पडले बिनहत्यारी त्यांचा इलाज कांहीं चालेना, वरचेवर पळून जात व पुन्हा सरसावून गावांत येत. गावाबाहेर गेल्यावर गोळी घालून बंदुकीचे ५ बार केले. परंतु इजा कोणास झाली नाहीं. तसाच पाठलाग करीत असतां ज्यास्ती जखमी झालेला मनुष्य सांपडला त्यास धरून आणिला.

त्या डाकेखोरांपैकीं सांपडलेल्या जखमी मनुष्यानें प्रथम कांहीं वेळ थांग लागू दिला नाहीं. परंतु त्यास चांगली समज मिळाल्यावर त्यानें सर्व हकीकत कळविली असें ह्मणतात. डाकेकरी लोक सेवली इलाखे मोगलाई एथील व त्याचे आसपासचे कोणी मांग महार व कुणबी वगैरे लोक होते असें त्याचे ह्मणणें आहे. १७ जणांची नांवें गावेही सांगितलीं ह्मणतात. सांपडलेला मनुष्य जातीचा कोळी असून हल्लीं तो वाशीम डिस्पेनसरी एथें आहे. तो वांचेल न वांचेल याचा भरवसा नाहीं. असें ऐकतों. सांगितलेल्या पत्याप्रमाणें दोन चीफ कान्स्टेबल, १५ कान्स्टेबल व एक पोलिस इन्स्पेक्टर इतके लोक तपासास गेले आहेत. पुढें जी हकीकत समजेल ती वाचकांकरितां विदित करीन. कळावें तारीख २७ माहे मे सन १८८० इसवी.

एक

" क्ष "

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. कसबे वणी तालुके मजकूर हा गाव मोठा असून यांत पुस्तकालय नसणें हें यास मोठें लांछन आहे; एथें पुस्तकालय स्थापण्याची पद्धत पूर्वीं एक दोन वेळ खटपट होऊन कांहीं सुरूही झाली होती परंतु ते फार दिवस चालली नाहीं पुढें मार्च १८७९ त एथें रा. रा. गंगाधर सिताराम याची इंग्रजी मराठी शाळेवर नेमणूक झाली त्या दिवसापासून याणीं या गावचें हें व्यंग काढण्याविषयीं मनावर घेऊन हर प्रसंगीं थोडा थोडा यत्न चालू केला त्यास एथील मंडळीस पुस्तकाल्यापासून फायदे काय काय होतात हें

माहित नसल्यामुळें शेकडों अडचणी आल्या तरी त्यांनीं आपला सतत उद्योग एत्किंचित ही कमी न करितां आज एक वर्षांत पुष्कळ वेळ तोच विषय पुनः पुनः काढून कोण ताही चांगला प्रसंग पुस्तकाल्यास अनुकूल करून घेण्याचा सोडला नाहीं इतकेंच नाहीं पण प्रत्येक प्रतिकूल प्रसंग आले असतांही ते आपल्या सतत उद्योगानें अनुकूल करून घेऊन आजपर्यंत पुष्कळ वर्गणी जमा केली व एखादें ठिकाण पसंत करून लायब्ररीला शाळागृह बांधण्याचा विचार करीत होते तों एथील चौकांत एक पाचखणी दुकान रा. रा. पुंजाराम वल्लद बाबाजी पाटील यांनीं बांधलेलें १५१ रुपये किंमतीचें आहे तें यांनी परम आनंदानें व विद्यावृद्धीच्यों हेतूनें एथील पुस्तकाल्याकरितां दिलें.

या वऱ्हाड प्रांतांत विद्याखातें सुरू होऊन फार थोडीं वर्षे झालीं इतक्या काळांत लोकांस विद्येची इतकी अभिरूची लागून त्यांनीं एवढ्या किंमतीची इमारत बक्षीस देणें हे या गृहस्थास भूषणास्पद आहे.

सदर्हू पाटील यांचे गावीं सरकारी शाळा आहे. तिकडेही यांचे लक्ष फार चांगलें असून यांचे श्रमानेंच ती आजपावेतों राहिली आहे; नाहींपेक्षां या गावा एवढें दुसरे कित्येक गावीं शाळा २।३ वर्षे राहून गावकरी लोकांस विद्येची अभिरूची नसल्यानें त्या शाळा उठल्या आणि यांचे गावची शाळा गाव लहान असतां अद्याप तिची स्थिति चांगली आहे यावरून पाटील मजकूर विद्यावृद्धीकडे लक्ष देऊन झटतात ही आनंदाची गोष्ट. पत्रविस्तार भयास्तव आतां पुरें करितों, कळावें ता. ३० माहे मे सन १८८० इ.

एक 'क्ष,'

---

## वसूल.

| | |
|---|---|
| मे० मीर फजले अली चीफ कान्स्टेबल | १३ |
| रा. रा. जनार्दन नारायण नातु | १०८।४ |
| ,, ,, शितळसिंगजी ना. तहाशिलदार | ९८।० |
| ,, ,, जानकीराम वामन कुळकर्णी | ६८८ |
| मि. मोफट साहेब पोलिस सुप्रिंटेंडेंट | ५ |
| गव्हर्नमेंट प्रेस रिपोर्टर अलाहाबाद | १२८५ |
| रा. रा. तुकाराम बालू साकीनगंगझरी | २८८ |
| रा. ब. नारायण भाई दाडेकर. | २६८६ |
| एजंट न्यूर्यांक बांबे-- खामगाव. | २०८४ |
| रा. रा. भास्कर महेश्वर लेले तहशि० | ६८८ |
| शेट दुलीचंद ओंकारदास साहू खाम | ६८८ |
| रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान डे. इ. | १५ |
| ,, ,, नारायण चिमणसा साहू मेहेकर | २० |
| बाशीम नेटिव लायब्ररी. | ६८८ |
| श्री. पंत प्रतिनिधि साहेब औंध | ३६ |
| रा. रा. नारायण रामकृष्ण मार्कंडे मा. | ३८४ |
| ,, ,, यशवंतराव दर्याजी पाटील | ३८४ |
| ,, ,, पुरुषोत्तम माधव देशपांडे हे.मा. | ६८८ |
| ,, ,, केशव दत्तात्रय हेड मास्तर | ३८४ |
| नेटिव लायब्ररी पुसद | ६८८ |

---

वऱ्हाडसमाचार.

मिति वैशाख वद्य ३० शके १८०२

## न्यायसार मासिक पुस्तक

मुंबई इलाख्यांतून पास होऊन आलेले वकील रा. रा. अंताजी गोविंद यांनीं न्यायसार नांवाचें माशिकपुस्तक प्रसिद्ध करण्याचें मनांत आणून पहिला अंक काढला त्याची एक प्रत आह्माकडे या आठवड्यांत आली तिचा आह्मी मोठ्या आनंदानें स्वीकार केला आहे.

रा. रा. अंताजी गोविंद हे प्रमोदसिंधूचे मालक रा. रा. यशवंतराव गोविंद यांचे बंधु असून इंग्रजी जाणतात. हे उद्योगी आहेत व त्यांनां छापखाना घरचा असल्यामुळें या पुस्तकापासून फायदा ही बराच होईल अशी आशा आहे. अंताजीपंत यांचा उद्योगीपणा आह्मांस मानवतो. अशा उद्योगानें त्यांचा फायदा होऊन लोकांच्या कामास त्यांचे श्रम लागू पडले असतां लोकांचाही फायदा आहे.'

पहिला अंक काढून आह्मास पाठविला यास्तव त्या संबंधानें आमचे विचार आह्मी कळवितो.

पुस्तककर्त्यांनें इंग्रजी गहन विषयाचें ज्ञान केवळ मराठी जाणणारांस-व्हावें ह्मणून जर मासिक पुस्तक काढण्याचें योजिलें आहे तर केवळ हाय कोर्टाचे निवाड्यांचें भाषांतर करून बस होत नाहीं असें आह्मास वाटतें. हायकोर्टाचे निवाड्याचीं भाषांतरें बऱ्याच मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध होत आहेत. प्रस्तावनेंत ह्मटल्याप्रमाणें इंग्रजींत प्रत्येक विषयावर मोठमोठाले ग्रंथ आहेत व त्यांतून निवडक विषय मराठी जानणारे लोकांस भाषांतरद्वारें व्यक्त केले असतां तशा मासल्याचें पुस्तक मराठींत आजवर नसल्या कारणानें त्याची पुष्कळ लोकांस साह्यता होईल. व तसें करणें पुस्तककर्त्यास इंग्रजी भाषेचें ज्ञान असल्यामुळें साहजीक आहे असें आह्मास वाटतें.

वऱ्हाडांतील मराठी जाणणोर पुष्कळ न्यायाधिश, वकील आणि इतर उद्योगी लोक यांस इंग्रजी ग्रंथाचें ज्ञान अशा रूपानें झालें असतां वास्तवीकपणें मोठा उपयोग होईल आणि ग्रंथकर्त्याचे श्रमाचें चीज होईल यास्तव आमची सूचना आहे, कीं, रा. रा. अंताजी पंत यांणीं आपले विचार साधतील तोंवर या लेखाकडेस वळवावेंत.

वऱ्हाडच्या लोकांस विशेषेंकरून उपयोग व्हावा ह्मणून जर य पुस्तकाची अवश्यकता आहे तर बाहेर प्रांताचे निवाडे पहाण्यास वऱ्हाडच्या लोकांस साधन आहे तसें वऱ्हाडांतील निवाडे पाहण्याचें साधन नाहीं यास्तव पुस्तकाचा मोठा भाग वऱ्हाडांतील निवाड्यांकडेस देऊन ते लोकांत प्रसिद्ध केले असतां बरें होईल असें आह्मांस वाटतें. त्याप्रमाणेंच वऱ्हाडांत न्याय खात्यांतील व मुलकी खात्यांतील महत्वाचीं सर्व सर्क्युलरें लोकांस कळत नाहींत यास्तव तीं भाषांतररूपानें प्रसिद्ध करण्याचा उद्योग लोकांचे सोईचा होईल. व पुस्तकाची गरज बऱ्याच लोकानां राहील. पुस्तककर्त्यांनीं रेसिडेंसी आर्डर पैकी कांहीं कांहीं ठराव या पुस्तकांत घेतले आहेत असेच सर्व ठराव आणि साधतील तितकीं बुक सर्क्युलरें व इतर सर्क्युलरें छापण्याची खटपट करावी अशीही आमची त्यांनां सूचना आहे.

हा अंक पहिलाच आहे व गरबडीनें छापला गेला तेव्हां त्यांत कांहीं कांहीं चुका असण्याचा संभव आहे. व त्या पुढें पुढें दुरुस्त होतीलच तथापि आमची अशीही सूचना आहे कीं निवाड्याचे भाषांतर देतांनां फार जपून, वाचणारांस बोध होईल अशा रीतीनें दिले ह्मणजे उत्तम. भाषांतरांत चूक राहिली ह्मणजे त्या पासून लोक फसतात.

उदाहरणार्थ फौजदारीभाग पान २ याजवर कलकत्ता व्हालिम ३ पान ३८९ याजवरील निवाड्याचें भाषांतर दिलें आहे यांत चूक आहे. आरोपीचा सर्व पुरावा घेतला पाहिजे असें मूळच्या निवाड्यांत नाहीं. तसेंच कलकत्ता व्हालिम ३ पान ४९५ याजवरील निवाड्याचें भाषांतर पूर्ण नाहीं. "ज्यानें चार्ज ठेविला त्यानेंच त्याजला शिक्षा दिली पाहिजे असें नाहीं" असें भाषांतर असावें. "च" घातल्यावाचून निवाड्याचा बोध होत नाहीं. कांहीं कांहीं निवाड्याचें भाषांतरावरून निवाड्याचें तात्पर्य चांगलें कळत नाहीं. उदाहरणार्थ फौजदारी पान २ कलम २२२ वरील निवाडा. पान ३ कलम २६३ वरील निवाडा. किरकोळ पान १ याजवरील ५ वा निवाडा. दिवाणी पान ६ याजवरील २१ वा निवाडा.

दिवाणी निवाडा १३ याचे सेवटील संज्ञा गैरमाहितगारास कांहीं कळणार नाहीं यास्तव ज्या वेळेस असे दाखले देण्याचे त्यावेळेस साधेल तोंवर स्पष्ट दिले असतां वाचणारास सोईचें होतें.

याप्रमाणें आह्मी आपले विचार प्रगट केले आहेत. जेथें दुरुस्ती करण्याची आहे तेथें ग्रंथकर्ते दुरुस्ती करतील अशी आह्मास आशा आहे. सरकारी ठरावाचे किंवा कायद्याचे शद्बाचे शद्बशः भाषांतर करणें आहे तर तेथें पदरचे शद्ब "अ' किंवा 'मे' न घालवितील तितकें चांगलें असें आह्मांस वाटतें.

एकंदरींत आहे असें तरी पुस्तक वऱ्हाडांत पाहिजे आहे. व आमचे विचार मानत त्याप्रमाणें पुस्तककर्ते जर विषयाची निवड करतील तर याहूनही हें अधिक महत्वाचें पुस्तक होईल. यास्तव लोकांनीं त्यांस साहाय देणें जरूर आहे. पुस्तकाची किंमत विषयांचा फेरबदल होऊन पुस्तक निघू लागलें तर कांहीं अधिक नाहीं असें आह्मास वाटतें. या पुस्तकास साहाय्य उत्तम मिळून रा. रा. अंताजी गोविंद यांनीं हातीं घेतलेले उद्योगांत हुरूप येवो. अशी आह्मी आशा करितों.

याच मासल्याचें परंतु विषयाची थोडीशी आह्मी हल्लीं ह्मणतो त्याप्रमाणें निवड करून एक मासीक पुस्तक पूर्वीं एक वेळ कांहीं उद्योगी मंडळीनें प्रसिद्ध करून चालविलें होतें. परंतु त्या वेळची वऱ्हाडची हवा त्यास मानवली नाहीं. ह्मणून त्याचा थोड्या दिवसांतच लय झाला. परंतु हल्लींची हवा थोडी निराळी आहे. तेव्हां रा. रा. अंताजीपंत हा उद्योग मध्येंच टाकून न देता अखंड चालवितील अशी आह्मास सर्वपरी आशा आहे.

---

## महाराणी साहेबांचें भाषण.

गेले महिन्याचे २० वे तारखेस नवीन मताची पार्लमेन्ट सभा भरली होती. त्या प्रसंगीं महाराणी विक्टोरिया साहेबांचें भाषण लार्ड चान्सलर यांणीं वाचिलें. त्यांतील तात्पर्य आह्मी अपल्या वाचकांस कळवितो ते येणे प्रमाणें:—

परकीय राष्ट्रांशीं आमचा स्नेहसंबंध असून त्यांच्या मदतीनें ब्रर्लिन येथील तहनाम्याची अम्मलबजावणी पूर्ण रीतीनें व लवकर होईल अशी आह्मास आशा आहे. तुर्कस्थानांतील राज्यव्यवस्थेंत चांगली सुधारणा करण्यासाठीं व सर्वांस सारखे लागू पडतील असे कायदे अमलांत आणण्यासाठीं व सरहद्दीचे संबंधाचे तंटे मोडण्यासाठीं आनरेबल जी. जे. घोसेने यांस मुद्दाम कान्स्टांटिनोपल येथें धाडिलें आहे, व ह्या सर्व गोष्टी अमलांत आल्याशिवाय पूर्व युरोपखंडांत शांतता कायम राहावयाची नाहीं. अफगाणिस्थानांतील सैन्य आपलें काम मोठ्या शौर्यानें बजावीत आहे, व सर्व व्यवस्था शांततेनें लावण्याविषयीं हिंदुस्थान सरकारची मेहेनत सतत सुरू आहे. परंतु सरकारचा इष्ट हेतु सिद्ध होण्यास अद्याप बरीच काळावधी लागेल असें वाटतें. अफगाणिस्थानांत शांतता सुरू करण्याकरतां व सदर्हू ठिकाणची रयत स्वतंत्र राहून इंग्रज सरकारच्या संबंधानें स्नेहभावानें वागेल अशी व्यवस्था सुरू करण्याकरतां सरकारचे परिश्रम सतत चालू राहतील हिंदुस्थानांतील जमाखर्चाच्या संबंधानें आलीकडे ज्या गोष्टी कळून आल्या आहेत त्या फार महत्वाच्या असल्यामुळें सदर्हू विषयाकडे पूर्ण लक्ष पोहोंचविलें पाहिजे, व ह्या प्रकरणी सर्व कच्ची माहिती पार्लमेंट सभेंत लवकरच दिली जाईल."

या शिवाय ही कांहीं भाषण झालें पण त्याचा या देशाशी कांहीं संबंध नसल्यामुळें तें ऐथें घतलें नाहीं-

---

Mr. Mayne Head Clerk of Basim Deputy Commissioner's office, has retired on pension, after having been on leave on private affairs for a year. During his absence on leave Mr. Peters the 2nd Clerk of the Deputy Commissioner's office Ellichpur (who had been transfered to Bassim vice Mr. Cotter) officiated. The appointment has now been given away to one Mr. King a clerk in the Resident's office who passed through a few day ago to assume charge of his duties at Basim, and Mr. Peters who has hitherto held the officiating post of Head Clerk will revert as 2nd clerk in the same office. It is asked if the selection has been made after weighing the claims and merits of those already in Berar. Not long ago we witnessed the appointment of a Railway Inspector in Berar which was viewed as savoring of partiality rather than fairness, as the eligibility and claims of others in the Department positively deserving, were entirely ignored. Now a "foreigner" has been imported to Basim regardless of the just claims of others in Berar. The appointment to offices in the Commission &c. is based on some recognised principle such as seniority and merit but we are not aware what is the recognised prin-

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ | अकोला, सोमवार तारीख ७ माहे जून सन १८८० इसवी. | अंक २२

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोक कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters, stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## नोटिस

मगनीराम तनसुकराय साहू दुकान तेल्हारें यास कणीराम राठी साहू दुकान तेल्हारें याजकडून कळविण्यांत येते कीं, तुह्मी तारीख १२ माहे मे सन १८८० इसवीचें पत्र टपालमार्फत पाठविलें त्यांतील मजकूर कळला त्याचें उत्तर खालीं लिहिल्याप्रमाणें:-----

आह्मी तुह्मास रुईचें ओझे देऊ केले त्यां पैकीं ११ ओझाचा अक्ता दर ओझास २० वीस रुपये प्रमाणें घेतलों. बाकी ओझे बिनअक्त्याचे देऊं केले. या अक्त्याचे व बिन अक्त्याचे ओझे मोजून देण्याचा करार फालगुन शुद्ध ५ पासून फालगुन शुद्ध १५ पावेतों मोजून देऊन रुपये घेण्याचा करार होता. त्याप्रमाणें आह्मी करारावर माल मोजून देत होतो; परंतु तुह्मी माल मोजून घेतला नाहीं. व रुपयेही दिले नाहींत. हल्लीं तुह्मी कराराविरुद्ध मागणें केलें आहे. हें गैर आहे. दिनभाव देण्याघेण्याचा मुळींच करार नाहीं. हल्लीं या नोटिशीनें तुह्मास इतकेंच कळवावयाचें कीं ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत रुईचे ओझे मोजून घ्यावे व त्याचे रुपये आह्मास रोख आणून द्यावे, नाहीं तर चालू भावानें माल फरोक्त करून नुकसानीचे रुपये तुह्मापासून फिर्याद करून घेतले जातील. कोर्टखर्च व या नोटिशीचा खर्च तुह्मापासून भरून घेऊ.

दुसरें---जवस तुमचे आह्मी घेतलें आहे त्याचा अक्ता दर खंडीस १० रुपये प्रमाणें प्रथम दिले आहेत. बाकीचे रुपये माल मोजून दिल्यावर घेण्याचा करार आहे. जवस मोजण्याचा करार वैशाख शुद्ध १५ चा होता. त्याकरारावर तुह्मास माल मागितला पण तुह्मी दिला नाहीं व रुपयेही नेले नाहींत. हल्लीं ही नोटिस तुह्मास पावल्यापासून आठ रोजाचें आंत जवसाचा माल मोजून द्यावा व तुह्मी अपले रुपये घेऊन जावे. या मुदतींत जवस मोजून न द्याल तर कायद्याप्रमाणें तजवीज करून खर्चासुद्धां रुपये घेतले जातील. या नोटिशीचाही खर्च तुह्मापासून घेतला जाईल. कळावें. तारीख ४ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) कणीराम राठी साहू दुकान तेल्हारें दस्तूर मिठाराम.

### नोटिस.

मगनीराम तनसुकराय साहू दुकान पेठ तेल्हारे यांस. शिवलाल गुलाबचंद साहू दुकान तेल्हारे याजकडून कळविण्यांत येते कीं, तुह्मी तारीख १२ माहे मे सन १८८० इसवी रोजीं टपालमार्फत पत्र पाठविलें त्यांतील मजकूर कळला. तुमचे जवळ आमचे हातचे सट्टे आहेत त्यांतील कराराविरुद्ध त्या पत्रानें मागणें केलें आहे त्याप्रमाणें आह्मी देवाल नाहीं. सट्यांत करार फाल्गुन शुद्ध ५ पासून फाल्गुन शुद्ध १५ पावेतों रुईचे ओझे तकून देण्याचा करार आहे. दीन भाव देऊ किंवा घेऊ असा करार सट्यांत मुळींच नाहीं. ह्मणून कराराप्रमाणें रुईचे ओझेही आह्मी तकून देण्यास तयार होतो; परंतु तुह्मी ओझे तकून घेतले नाहींत. ही तुमची चूक आहे. पाहिजे असल्यास हल्लींही रुईचे ओझे ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत तेल्हारे एथें सट्यांतील कराराप्रमाणें आह्मी देण्यास तयार आहो. तुह्मी तकून घ्यावे. व आजपर्यंत माल ठेविला त्याचे घराचें भाडें द्यावें. आतां सदहू रुईचा माल आह्मी न ठेवितां चालू भावानें विकून जी रकम येईल त्याप्रमाणें तुह्मांस दिली जाईल. त्याप्रमाणें तुह्मी रकम न घेऊन जाल तर व्याज वगैरे आह्मी देवाल नाहीं.

दुसरें-- आह्मी तुह्मापासून जवस घेतलें त्याचा करार वैशाख शुद्ध १५ चा होता तो टळून गेला त्या करारा प्रमाणें जवसाचा माल तुह्मी मोजून दिला नाहीं. जवसाचे सट्याबद्दल तुह्मास दर खंडीस रुपये १० प्रमाणें आह्मी प्रथम दिले आहेत. बाकीचे रुपये माल मोजून दिल्यावर घेण्याचा करार आहे. तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत जवसाचा माल मोजून देऊन रुपये घेऊन जावे. सदरीं लिहिल्या प्रमाणें न कराल तर कायदेशीर तजवीज करून खर्चासुद्धां रुपये घेतले जातील.

तिसरें--- गव्हाचा सवदा आह्मी तुह्मास देऊं केला. त्याबद्दल दर खंडीस १० रुपये प्रमाणें अगऊ घेतले. व गहू देण्याचा करार वैशाख शुद्ध १५ चा आहे. त्याप्रमाणें आह्मी गहू मोजून देत असतां तुह्मी घेतले नाहींत व रुपये मागितले असतां तुह्मी दिले नाहींत तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत गहू मोजून घेऊन आमची रकम चुकती द्यावी. तसें न कराल तर पेठ भावानें गहू विकून जें नुकसान येईल तें भरून घेतलें जाईल. कळावें तारीख ४ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) शिवलाल गुलाबचंद साहू दुकान तेल्हारे. दस्तुर मिठाराम मोकमचंद.

### नोटिस

जानकी मर्द भोनाजी माळी बंड रहाणार पारशी तालुके बाळापुर जिल्हे अकोले इला खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझे लग्नाची बायको असून तुसी लग्न लावण्यास अंदाज पंध्रा वर्षे झालीं आहेत. तूं माझेपाशीं नांदणूक केलीस हल्लीं दोन वर्षे झालीं तुझा बाप माझे घरीं येऊन तुला लग्नाचे निमित्यानें घेऊन गेला नंतर आह्माकडून तुला आणण्याकरितां दोन तीन वेळां गाडी मनुष्य पाठविले तर तूं येते येते करतेस पण येत नाहींस सबब मी जातीनें ही आलो परंतु तुझा बाप तुला फितुराच्या गोष्टी सांगतो त्याप्रमाणें तूं करितेस हें नीट नाहीं हल्लीं या नोटिसीनें कळवितो कीं, ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत तूं आप होऊन आपले घरचे जे डागिने चांदी व सोनें, पितावर व लुगडे जे जें तूं घेऊन गेलीस ते सर्व घेऊन यावे न आल्यास रीतीप्रमाणें तुजवर आणि तुझे बापावर दावा करीन व कायद्याप्रमाणें तुला तांबेत घेईन. कळावें तारीख २ जून १८८० इ०

( सही ) भोनाजी वल्लद महादाजी बंड माळी रहाणार बाभूळगाव निशाणी खुद्द हातची.

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० या वाशिम जिल्ह्यांत नुकताच डाका पडला त्याची हकीकत जी मजला समजली ती आपणाकडे लिहून पाठविली आहे. मर्जीनुरूप प्रसिद्ध करावी.

तारीख २५ माहे मे सन १८८० इसवी रोजीं रात्रीं ९ वाजतां मौजे मोप तालुके वाशीम एथील गंगाराम मारवाडी व त्याचा भाऊ यांचे घरावर सुमारें वीस लोकांनीं येऊन डाका घातला. माल व नगदी मिळून ६००।७०० रुपयांचा माल चोरीस गेला. डाकेवाले लोक हत्यारबंद होते.

ज्या समयीं ते लोक आले तेव्हां गंगाराम मारवाडी घरांत होता. तो तसाच पळून शेजारी न्हाव्याच्या घरांत दडला. त्याचा नोकर राठोड जातीचा असून त्याजपाशीं तरवार होती. त्यानें मोठ्या धैर्यानें डाकेकरी लोकांतील ४ जणांस बऱ्याच जखमा केल्या त्यांत एकाचे मांडीवर वितभर जखम लागली आहे. त्यानें ती जखम तशीच पागोट्यानें बांधून अर्धा कोस जाऊन पडला. बाकीचे इसम पळाले. गावकरी दोघा इसमांस साधारण जखमा लागल्या आहेत. राठोडास तीन जखमा लागल्या पैकी पोटावर, दंडावर एकेक आणि तळहाताचा तर तिसरा हिस्साच तुटला आहे. कांहीं जणांस गोठे लागले आहे.

जेव्हां ते डाका घालणारे लोक आले तेव्हां गावकरी लोकांनीं त्यांचेवर हल्ला करण्याचा प्रसंग आणिला ह्मणून ते पळाले. परंतु गावकरी बिचारे पडले बिनहत्यारी त्यांचा इलाज कांहीं चालेना, वरचेवर पळून जात व पुन्हा सरसावून गावांत येत. गावाबाहेर गेल्यावर गोळी घालून बंदुकीचे ९ बार केले. परंतु इजा कोणास झाली नाहीं. तसाच पाठलाग करीत असतां ज्यास्ती जखमी झालेला मनुष्य सांपडला त्यास धरून आणिला.

त्या डाकेखोरांपैकीं सांपडलेल्या जखमी मनुष्यानें प्रथम कांहीं वेळ थांग लागू दिला नाहीं. परंतु त्यास चांगली समज मिळाल्यावर त्यानें सर्व हकीकत कळविली असें ह्मणतात. डाकेकरी लोक सेवली इलाखे मोगलाई एथील व त्याचे आसपासचे कोणी मांग माहार व कुणबी वगैरे लोक होते असें त्याचे ह्मणणें आहे. १७ जणांची नांवे गावेही सांगितलीं ह्मणतात. सांपडलेला मनुष्य जातीचा कोळी असून हल्लीं तो वाशीम डिस्पेनसरी एथें आहे. तो वांचेल न वांचेल याचा भरवसा नाहीं. असें ऐकतों. सांगितलेल्या पत्याप्रमाणें दोन चीफ कान्स्टेबल, १५ कान्स्टेबल व एक पोलिस इन्स्पेक्टर इतके लोक तपासास गेले आहेत. पुढें जी हकीकत समजेल ती वाचकांकरितां विदित करीन. कळावें तारीख २७ माहे मे सन १८८० इसवी.

एक

" क्ष "

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. कसबे वणी तालुके मजकूर हा गाव मोठा असून यांत पुस्तकालय नसणें हें यास मोठें लांछन आहे; एथें पुस्तकालय स्थापण्याची पद्धी पूर्वी एक दोन वेळ खटपट होऊन कांहीं सुरूही झाली होती परंतु ते फार दिवस चालली नाहीं पुढें मार्च १८७९ त एथें रा. रा. गंगाधर सिताराम याची इंग्रजी मराठी शाळेवर नेमणूक झाली त्या दिवसापासून याणीं या गावचें हें व्यंग काढण्या विषयीं मनावर घेऊन हर प्रसंगीं थोडा थोडा यत्न चालू केला त्यास एथील मंडळीस पुस्तकाल्यापासून फायेद काय काय होतात हें

ciple in Berar as far as subordinates are concerned. We would advocate a standerd of examination to be established as in the central Provinces and the whole of the Deputy commissioner's offices in Berar, together with the commissioner's and that of Judicial commissioner's be considered as one Department. end vacancies filled up in the order of merit of those examined and pronounced fit. All existing Head Clerks being obliged to undergo the examination. A list of these being kept by the Commissioner or (2) each office be considered a separate department in itself, and vacancies filled up in each office by promotions, in the order of seniority in the office in whic the vacancy occurs. [3] In the absence of any well qualified candidate] in Berar to fill a vacancy, we would recommend then, and then only that an outsider be imported.

At present there is no regular principle recognised and weare not surprised at the talent dissatisfaction thatassuredly exists of the arbitrary system adopted. The importation of a "foreigner" to Basim would have been justified had no good material been at hand. While promotions of those in Berar are stagnant the appointments in Barar are viewed as a slough of despond. We would invite the attention of the Resident to the present state of things in Berar, and we do not hesitaete to say that we cordially approve of the steps taken to provide for Clerk of Courts; and Deputy Clerk of Courts, and in the cause of justice, we would be glad to see a similar provision made for Head Clerks and 2nd clerks of Deputy Commissioners offices.

---

We are informed that during last week, inside the Judicial Commissioner's office a fire broke out accidentally, consuming some waste paper, a table as well as a portion of the matting. The fire was soon diseovered and immediate steps taken to put it out before it became unmanagagable. We would be glad if our information is incorrect; but if other-wise the origin and cause of the fire should certainly be carefully investigated and measures adopted which fill prven at recurrencee.

---

## वऱ्हाड.

हवामान — गेले सोमवारी दिवसा चार वाजतां एकाएकी आभाळ येऊन एक क्षणभर बराच जोरानें पावुस पडला. व हा पाऊस पुण्यास ही पडला असें ज्ञा. प्र. वरून समजतें. तेणे करून कांहीं वेळ गारही गार झालें होतें त्याच प्रमाणें गेलें बुधवारीं ही एक दोन वऱ्याशा सरी आल्या त्यानंतर ह्मणण्या सारखा पाऊस नाहीं. दिवसा कडक उष्ण पडून रात्रीस आकाश मेघाच्छादित असते व वारा बहुतकरून बंद असतो तेणें करून दिवस रात्र सारखी तल्खी होते काल रात्री थोडी पावसाची बुरबुरी आली.

---

डाके----मेडसीकडे डाका पडून फार दिवस झाले नाहींत व त्यापैकीं सांपडलेला एक इसम अजून एथील दवाखान्यांत आजारीच आहे व पुढें तपास करणें सुरू आहे तोंच वाशीम जिल्ह्यांत मेंप या गावीं एका मारवाड्याच्या घरावर गेले महिन्याचे २९ वे तारखेस एक दुसरा डाका पडल्याचें वर्तमान आलें आहे. या दुसऱ्या डाक्यांत २० असामी असून ते सर्व हत्यारबंद होते व त्यापैकीं एक कोळी जातीचा मनुष्य घायाळ होऊन सांपडला आहे व त्याचे सांगण्यावरून बाकीच्या इसमांचे तपासाकरितां १ पो० इन्स्पेक्टर, २ चीफ कान्स्टेबल, व सोळा कान्स्टेबल इतके लोक मोगलाई इलाख्यांत गेले आहेत असें तिकडील वातमीचे पत्र आल्यावरून समजतें. तें पत्र आजच्या अंकीं पहिल्या पृष्ठावर आह्मी आपल्या वाचकांकरितां छापून प्रसिद्ध केलें आहे. त्यावरून इत्थंभूत हकीकत कळेल.

---

आग----गेले आठवड्यांत एके दिवशीं एथील जुडीशियल कमिशनर आफिसांतील फाडून टाकलेलें रद्दी कागद एका एकी पेटून त्याची आंच टेबल खुर्चीं वगैरेसही लागली होती पण तिकडे आफिसांतील लोकांची लौकर नजर पोचून सर्व विझविलें गेलें व मोठी खैर झाली. त्याच प्रमाणें गेले बुधवारीं रात्रीं एथील शेट टिकमदास ताराचंद यांचे दुकानांत रॉकआईल तेलाचा दिवा जळत होतां त्यावरील चिमणी फुटून कीं काय न जाणो पण त्याचा एकदम भडका होऊन आंतील अंगरखा दुपेटा वगैरे खुंटीवर ठेवलेले कपडे पेटले व त्या योगें वरील छत पेटून लाकडी इमारत शिलगू लागली होती. इतक्यांत बीट फिरत असणाऱ्या पोलिस शिपायाची नजर पोचून त्यानें गलबला करून सर्व लोक जागविले व पाण्याचा पुरवठा करून ती आग विझविली. यावेळींही मोठें अरिष्ट टळलें असें ह्मटलें पाहिजे. नाहींपेक्षां मोठा कहर उसळावयाचा. कारण ही दुकान कापड, किराना, आणि धान्य यांचे नाक्यावर असून आसपास लाखो रुपयांचा माल पडलेला आहे. या केरोसिन तेलाच्या संसर्गानें कोणत्या प्रसंगी कसा परिणाम घडून येईल हें सांगवत नाहीं कारण हें तेल पहिल्या नंबरचें ज्वालाग्राही असून याच्या सवंगपणामुळें आपल्या वऱ्हाड प्रांतांत याचा बराच प्रसार होऊं लागला आहे. इतर ज्वालाग्राही पदार्थ आपण विस्तवापासून हावे तितके दूर ठेवूं शकतों तरी केव्हां केव्हां अपघात घडून येतातच. मग या रॉकआईल तेलाचें तर काय सैदव अग्नीशी सान्निध्य ह्मणून याचा उपयोग करणारांनीं याविषयीं फार सावधगिरी ठेवली पाहिजे.

---

बुलढाण्याचे पोलिस सुप्रिन्टेंडेंट मि. एच एफ काटग्रेव्ह हे २९ आप्रिल पासून प्रिव्हिलेज लीव्हवर गेल्यामुळें मि० एच ए हॉथ डिस्ट्रिक्ट सुपिंटेंडेंट पोलिस हे फोर्थ क्लास होते ते थर्ड क्लास पो. सु. झाले.

---

मि. डनलप साहेब खामगावचे स्माल्काज जडज या आठवड्यांत एथें आले होते. ते दिवशीं एथील टाऊन हालांत युरोपियन लोकांची कमिटी भरली होती त्यांत पुढें होणारे खानेसुमारीबद्दल कांहीं विचार झाल्याचें कळतें.

---

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी उमरावती हायस्कूलचे हेड मास्तर हे एथें मित्र मंडळींचे भेटीकरितां उतरले आहेत.

---

मि. देविस साहेब एथील आसि. कमिशनर हे या आठवड्यांत मुंबईकडे रजेवर गेले.

---

उमरावतीचे फर्स्ट क्लास हास्पितल असिस्टंट मि० अय्या कलू हे ३ महिन्याचे रजेवर गेले व त्यांचे जागीं मि० कुंजबिहारी यर्ड क्लास हास्पिटल असि० यांस नेमिलें असें रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झाले आहे.

---

मेजर बुलक साहेब हे विलायतेस रजेवर आहेत त्यांनीं अधिक तीन महिने रजा वाढविल्याचें समजतें व डा. आबट साहेब या प्रांताचे कायमचे स्यानिटरी कमिशनर यांनीं ही अधिक ६ महिने रजा वाढविली.

---

हैदराबाद कंटिंजंटची पांचवी पलटण काबुलावर जाण्याकरितां एथें येऊन आज बरेच दिवस तिचा एथें मुक्काम आहे हें आमचे वाचकांस माहित आहेच. ही बरसातीचे चार महिने काढण्याकरितां उमरावतीस जाणार असेंही उ. अ. चे आधारें आह्मी आपले वाचकांस मागें कळविलें होतें पणतें सर्व खोटें ठरलें. आज ही पलटण हिंगोलीस जाण्याकरितां सकाळीं ४ वाजतां निघून गेली आहे.

---

सन १८७८ इसवीचा आफुविषयीं अक्ट १ ला यांतील कलम १४ अन्वय वऱ्हाड प्रांतांतील सर्व डिपुटी कमिशनर, आसिस्टंट कमिशनर, तहाशिलदार, नायब तहशिलदार व पोलिस आफिसर ( चीफ कान्स्टेबल व इन्स्पेक्टर यांचाहून कमीं दरजाचे नाहींत असें ) यांस रेसिडेन्ट साहेब बहादूर यांणीं अधिकार दिले आहेत.

---

तेल्हारें एथील पोलिस स्टेशनाचे इमारतीकरितां सर्वे नंबर या पैकीं कांहीं जमीन सरकारानें घेतली

---

( पुसद मित्राकडून. )

२ आठवड्यांपूर्वीं पुसद एथील सरकारी मराठी शाळेंत शेट सावकार व इतर संभावित गृहस्थ यांची सभा भरली होती. येथील हल्लींचे आफीशियेटिंग तहाशिलदार रा, रा. कृष्णराव आनंत यांनीं ही सभा भरवून या ठिकाणी लायब्ररी असावी असा आपला हेतु सर्व लोकांस प्रगट केला. त्यावरून अशा स्तुत्य कृत्याकरितां सर्व लोकांनीं आपला उदार आश्रय द्यावा अशा मतलबाचें बोधपर भाषण दामोधरपंत अण्णा पेशकार यांनीं करून जमलेल्या लोकांचीं मनें वळविलीं, आणि लागलीच वर्गणीची यादी सुरू झाली. तेव्हां चारशें रुपयांवर वर्गणीचे आंकडे पडले. हल्लीं वर्गणी वसूल करण्याचें काम जारी असून दोनशें रुपयांवर वसूल आला आहे. तहशिलदार साहेब लायब्ररीकरितां इमारत बांधण्यास चांगली जागा पाहतें आहेत. हें कृत्य निर्विघ्नपणें शेवटास जाईल व सर्व लोकांस उत्तम प्रकारचीं पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचण्यास मिळतील अशी उमेद आहे. ह्या ठिकाणीं बरेच तहाशिलदार झाले परंतु विद्यावृद्धीच्या ह्या कामाकडे आजपर्यंत कोणीच लक्ष पुरलें नाहीं. रा. रा. कृष्णराव आनंत हे मे. डिपुटी कमिशनर साहेब जिल्हा वाशीम यांचे मराठी आफिसांतील ९० रुपयांचे क्लार्क असून फार हुशार असल्यावरून त्यांस एक महिन्याचे बदलीवर एथें नेमिलें आहे. इतक्या अल्प काळांत त्यांनीं लोकप्रीयता संपादन करून ह्या स्तुत्य व सार्वजनिक कामाकडे लक्ष पुरविलें यावरून आह्मी त्यांची तारीफ करितो.

---

सन १८७७ इसवींत गहाळ झालेल्या २०० रुपयांच्या नोटिचे अर्धे भाग नगर एथील एका गृहस्थाकडे सापडले त्याचा मुकद्दमा एथील डि. क. पुढें चालू होता त्याचा निकाल होऊन नगरकरास २९० रुपये दंड झाला. सांग्र हकिकत पुढें लिहू.

---

मि. व्हेम्पर पश्चिम वऱ्हाडाकडील पोष्टाचे इन्स्पेक्टर हे ह्या आठवड्यांत वाशिमास गेले. मि. हेम्पर ह्यांची बदली वर्ध्याकडे बढतीवर इन्स्पक्टरचेच जागीं झाली.

वऱ्हाडांत बुलढाणें, वाशीम, इलिचपुर व अकोला ह्या चार टिकाणीं दोन दोन वळू घोडे एक पेगूजातीचा व एक आरबी असे ठेवण्याचा सरकारचा विचार झाला आहे. यंदाच्या अकोल्याच्या शर्यती होण्याच्या पूर्वीं घोड्यांचें प्रदर्शन होणार आहे. उत्तम घोड्यांस मोठालीं इनामें दिलीं जातील. ह्याचे नियम लवकरच बाहेर पडतील. डाक्टर लिटल ह्यांस ह्या प्रदर्शन कमेटीचे प्रेसिडेंट नेमलें आहे. सरकारचे एकंदरींत देशीं घोड्यांची सुधारणा करण्याकडे फार लक्ष लागले आहे. व पुढें पलटणींतून चांगल्या देशी घोड्यांचा जितका उपयोग करवेल तितका करण्याचा सरकारचा इरादा आहे. उ

---

## वर्तमानसार.

गेल्या सोमवारीं ह्मणजे तारीख ३१ मे रोजीं वायसराय लार्ड रिपन हे मुंबईस आले. त्यांची आगबोट ३ वाजतां बंदरांत दाखल झाली. साहेब मजकूर यांची आगत स्वागत करण्याची तयारी व्हावयाची होती ह्मणून त्यांस दोन अडीच तास आगबोटीवरच राहावें लागलें. नंतर सुमारें ६ वाजतां कांहीं साहेब लोकांनीं जाऊन त्यांस किनाऱ्यावर आणिलें तेव्हां मुंबईचे गवर्नर व युरोपियन व एतद्देशीय गृहस्थ यांनीं त्यांचें आगत स्वागत केलें. त्यांच्याकरितां सुंदर मंडप घातला होता. आणि ज्या ज्या रस्त्यानीं ते जाणार होते त्यांच्या दुतर्फा गोऱ्या व काळ्या पलटणीचे लोक उभे केले होते. त्यांस पाहण्याकरितां शहरचे लोक व विशेष करून रोमन क्याथोलिक लोक पुष्कळ जमले होते. साहेब मजकूर वाळकेश्वराच्या सरकारी बंगल्यांत उतरले होते. ता. ३ रोजीं ते सिमल्यास जाण्याकरितां निघून गेले

आनंदकारक वार्ता —विलायत वगैरे बाहेर प्रांतीं जो एथून कापूस रवाना होतो, त्यांत भेसळ फार असते अशा समजुतीनें जो फार वर्षांपूर्वी "काटन फ्राड्स" आक्ट झाला होता तो अनावश्यक आहे. अशी सरकारची खात्री होऊन त्यांनीं सदहू संबंधाचें कुलाबा मुंबई एथें असणोंरें आफिस अजी बद केलें.

आनंदकारक बातमी—सोलापुर जिल्ह्याचे कलेकटर यांणीं त्या जिल्ह्यास जेवढी सूट मिळावी ह्मणून रिपोर्ट केला होता तेवढी सूट सरकारानें उदारत्वानें दिली असें कल्पतरूवरून कळतें.

गेल्या १० वर्षांत एकंदर २४ मुसलमान विलायतेस विद्याभ्यासानिमित्त गेले असें समजतें.

रमाबाई—प्रख्यात विदुषी रमाबाई हिचे बंधु श्रीनिवास शास्त्री डोंगरे हे बंगाल्यांत तारीख १९ मे रोजीं स्वर्गस्थ झाल्याकारणानें रमाबाई तूर्त परदेशांत एकाकिनी अशी मोठ्या पेचांत पडली आहे. हिच्या वडीलांस तिच्या पत्रिकेवरून वैधव्यप्राप्तीचा योग दिसूनें आल्या कारणानें त्यांनीं मरणधर्मी पतीशीं रमाबाईचा विवाह न लाविता पांडुरंगाबरोबर लाविला असें ह्मणतात. त्यामुळें दक्षिणेंतील सर्व सजातीय आप्तांत सहजच त्यांनीं विद्विष्टत्व संपादिलेंसें होऊन शेवटीं त्यांस स्वदेशत्याग करावा लागला, व त्याचा परिणाम या थरास येऊन पोंचला. हल्लीं एका बाबूनें तिला सांभाळ करण्याचें अभिवचन दिलें आहे असें कळतें. "यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीं नाचरणींयम्" या लोकोक्तीची सार्थकता या स्थळीं झाली.

श्री. तात्यासोहब सांगलीकर यांची साली ना ९५ हजारांची नेमणूक कायम झाली.

काबुलाकडील लढाईंत वगैरे ज्या शिपायांचें व सोजरांचे प्राणनाश झाले त्यांच्या कुटुंबांच्या उपयोगार्थ गायकवाड सरकार व त्यांच्या मातुश्री श्री. जमनाबाई साहेब यांनीं १०,००० रुपये हिंदुस्थान सरकाराकडे दिले. १८७९ सालीं काबूल रेसिडेन्सीचें रक्षण करण्याचें कामीं मेलेल्या शिपायांचे कुटुंबांस देण्याकरितां वगैरे श्री. होळकर सरकार यांनीं ९००० रुपये दिले. बळरामपुरचे महाराज यांनीं सदहू उद्देशानें व शिवाय ज्या शिपायांनी शूरपणाची कृत्यें केलीं असतील त्यांस बक्षिसे देण्याकरितां १ लक्ष रुपये दिले. रामपुरच्या नबाबांनीं आफगाणिस्थानच्या लढाईंत जखमी व जाया झालेल्या लोकांच्या मदती दाखल १ लक्ष रुपये दिले. शितापुरचे तालुकदार ठाकूर प्रताप रुद्र सिंव्ह यांनीं मेलेल्या शिपायांच्या कुटुंबांस देण्याकरितां ४०० रुपये दिले. फरकाबादच्या लोकांनीं काबुलाकडील सैन्यास गरम कपडे पाठविण्याकरितां २,८८८ रुपये वर्गणी जमा करून दिले. या सर्व रकमा हिंदुस्थान सरकारानीं आभारपूर्वक स्वीकारिल्या असून शिवाय बंगाल प्रांतांत याच उद्देशानें आणखीही फंड गोळा व्हावा एतद्विषयीं सरकारांतून तजवीज चालली आहे.

अन्नाकरितां आत्महत्या.—गेल्याच्या मागील रविवारीं ठाणें एथील एका ३९ वर्षांच्या कुणब्यानें लाल बागेंतील एका आंब्याच्या झाडास फांस लाऊन घेऊन आत्महत्या करून घेतली. हें समजल्या नंतर सुमारें १० वाजतां पोलिसाकडून चौकशी झाल्यावर जुरी होऊन प्रेतसंस्कार झाला. असें करण्याचें कारण असें समजतें कीं, उदरपोषणार्थ अन्नाच्या भ्रांतीमुळें त्यानें त्रासून आत्महत्या केली. इं. प्र.

विलायतेंतील नवीन प्रधान मंडळीनें उद्या एथें येऊन पोंचणारे नवे व्हाईसराय यांस असें सांगितलें आहे कीं देशी वर्तमानपत्रांविषयींचा कायदा आणि लैसेन्स टाक्स याबद्द तुह्मी लौकरच रिपोर्ट करावा. यावरून वर्तमानपत्राविषयींचा कायदा रद्द करावा असें विलायत सरकारच्या मनांत आहे असें दिसतें. या देशांतील लोकांकडून नवीन अर्ज वगैरे जाण्याच्या पूर्वींच नवे प्रधान आपण होऊनच हा कायदा रद्द करण्याविषयीं तजवीज करूं लागले ही गोष्ट त्यांस खरोखर भूषणास्पद आहे आणि यावरून ते अधिकारावर येण्यापूर्वी बोलत असत त्याप्रमाणें अंशतः तरी आतां करून दाखविण्याचें त्यांचे मनांत आहे असें दिसतें. आमच्या लोकांस उमेद वाटण्यास हें खचित चांगलें कारण आहे, आणि यावरून या देशास दाद मिळण्याची अशा उत्पन्न होते.

काश्मीरच्या महाराजांच्या विरुद्ध एक मोठी याद हिंदुस्थान सरकारानें विलायतेस पाठविल्याचें ता० २० एप्रिलच्या लंडन टैम्स पत्रांत छापलें आहे तें खोटें असें पायोनियर कर्ते ह्मणतात

ठकविद्या— एक मनुष्य जर्मनी देशांत म्यूनिच एथें औरांगोतांग जातीचा मोठा वानर दाखवीत फिरत होता, तो वानर सारंगीवर कठीण कठीण चाली बिनचूक वाजवीत असे. यावरून त्या मनुष्यास पुष्कळ मिळकत असे. एका दिवशीं संध्याकाळीं ही मौज पहाणारां पैकीं एका संशयग्रस्त मनुष्यानें चाकू काढून वानरच्या अंगावर चालविला, तेणेंकरून कातडें कापलें तरी वानराला कांहींच वाटले नाहीं. ह्मणून त्या संशयग्रस्तानें त्याचें शेंपूट धरून जोरानें ओढलें तेव्हां शेंपूट उपटून हातीं आलें, आणि त्याच्या बरोबर त्याच्या कमरेवरील बरेंच कातडें फाटून निघालें. त्यावरून आंत एक मनुष्य व तो दाखवीत फिरणाराचा बाप आहे असें समजलें. हें सोंग इतके दिवस कोणाच्या समजण्यांत आलें नाहीं. यावरून बहुतांस नवल वाटलें, पण पुढें त्या मनुष्याची मिळकत बुडाली. याप्रमाणें ढोंग बारा वर्षें छपले तरी शेवटीं उघडें पडतें.

लार्ड लिटन यांची शेवटची भेट घेण्यासाठीं झिंद, नाभ आणि काशीपूरचे राजे सिमल्यास गेले आहेत. पतियाळाचे राजे लौकरच जाणार होते. तसेच दुरभंग्याचे राजे, जयपुरचे महाराज व शिंदेही जाणार आहेत असें समजतें.

ब्रिटिश ब्रह्मदेश व मांडले यांजमधील तारायंत्र अनेक ठिकाणीं तोडून टाकलें आहे. तें तोडणारा आपणास राजपुत्र ह्मणवीत असून बंड करण्याचा उद्योग करीत आहे असें समजतें. सु. प

वेदशाळा—नाशिक एथील मैत्रायणी शाखेंतील सभ्य गृहस्थांनीं आपली शाखा पढविण्याकरितां एक शाळा असावी असा बेत करून आपसांत वर्गणी केली व त्याप्रमाणें शिक्षक नेमून सदहू शाळा वैशाख वद्य ९ पासून सुरू होणार होती असें ऐकतों.

अबदुल रहमान हे १ लक्ष रुपये जुलुमानें कर्ज काढीत आहेत, व हें कर्ज मिळेतों पर्यंत त्यानीं सर्व व्यापार बंद केल्यामुळें लहान सहान व्यापारी फार नाखूष झाले आहेत. काबूल येथें अशी खबर आहे कीं, अबदुल रहमान दोन महिनेपर्यंत तुर्कस्थान सोडीत नाहींत व काबूल येथील आपला अम्मल बसण्याकरतां आपल्या बरोबर ते एक मोठें सैन्य आणणार आहेत. अबदुल रहमान यांणीं आपले सैन्यास पगाराचे थकलेले पैसे दिले ही गोष्ट खरी आहे. मझर इशरीफ येथें बेबंद पादशाई सुरू असून सैन्यास पगार देण्यापुर्ते पैसे इशकखान यांचेपाशीं शिल्लक नाहींत. सदहू ठिकाणीं काबूल येथून जे लोक जातात त्यांचा झाडा घेण्यांत येतो. मुष्टफी हाबबुल्ला यांचे विरुद्ध भरपुर पुरावा मिळाला असून त्यांस झालेल्या शिक्षेनें चांगला परिणाम घडून आला आहे. लागोरी लोकांनीं चराशीया एथें जी गडबड केली तिचें कारण मुष्टफी असून ते व वर्धर्क आणि गझनी एथील लोकांत पत्रव्यवहार चालू होता व अबदुल रहमान यांणीं काबूलाकडे येऊं नये अशाबद्दल त्यांची खटपट सुरू होती. वली महमद व हशीमखान वगैरे मंडळी अबदुल रहमान यांस अमीर कबूल करतील असें सरकारी अधिकाऱ्यांस वाटत आहे, परंतु काबूल एथील रयतेचा अभिप्राय निराळ्या प्रकारचा आहे. अबदुल रहमान हे कोहिस्थानी लोकांस फार प्रीय आहे. ज्ञा. प्र.

## चालूसालच्या जमाखर्चाच्या अजमासांत सांपडलेली चूक.

वाचकांस कदाचित खरें वाटणार नाहीं परंतु नुकत्याच सुरू झालेल्या सालच्या जमाखर्चाच्या अंदाजांत सुमारें चार कोटी रुपयांची लढाईचे खर्चांत चूक लागली आहे. गेल्या फेब्रुवारी महिन्यांत सर जान स्ट्रेची यांनीं सन १८८०—८१ सालचा अजमास सादर केला तेव्हां असें कळविलें कीं चालू सालअखेरपर्यंत लढाईचा खर्च सुमारें दहा कोटी रुपयांत अटपेल. परंतु अलिकडेस असें समजलें आहे कीं, इतक्या रुपयांत हा खर्च अटपावयाचा नाहीं. चूक लागण्याचें कारण काय याविषयीं हिंदुस्थान सरकारानें जी माहिती प्रसिद्ध केली आहे तींत असें लिहिलें आहे कीं, कदाचित चार कोटींनींही खर्च अटपावयाचा नाहीं. दर महिन्यास हल्लीं सुमारें दीड कोटी रुपये खर्च होत असल्याविषयीं बोलवा आहे. आणखी सुमारें चार महिन्यांचे अवकाशांत लढाई अटपेल अशी कल्पना केली तरी असें वाटावयास लागतें कीं लढाईचा एकंदर खर्च वीस कोटी रुपयांतही अटपावयाचा नाहीं.

लढाईच्या खर्चाचे अजमासांत एकदम चार कोटी रुपयांची चूक लागली, ह्मणून सर्वत्रांस आश्चर्य वाटत आहे. जमाखर्चाचा अजमास गेल्या फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस प्रसिद्ध केला व लागणाऱ्या खर्चाची थोडी माहिती अगदीं अखेरीस मागवून त्या माहितिवर खर्चाच्या अजमासाचा आंकडा कायम केला असें असतां सुमारें तीन आठवड्यांच्या आंतच चार कोटींची चूक सांपडली त्यामुळें अनेक लोक अनेक प्रकारच्या कल्पना करीत आहेत, कारण कित्येकांची कल्पना अशी आहे कीं झालेला प्रकार सर्वांशीं चुकीचा नसावा. बजेट सादर झाल्यानंतर थोड्यादिवसांनीं पार्लमेंट सभा बंद व्हावयाची होती, करितां अजमास करतेवेळीं नजर रहावी तशी राहिली नसावी, हिंदुस्थान सरकारचें ह्मणणें असें आहे कीं, बजेट प्रसिद्ध झाल्यानंतर मार्च महिन्याचे पंधरावे तारखेच्या सुमारास लढाईकडेस खजिन्यांतील पैसा अजमासापेक्षां जास्त जात आहे असें समजलें व त्यावरून चौकशी करितां असें कळून आलें कीं, निदान चार कोटी रुपये अधिक खर्च झाल्यावाचून राहणार नाहीं. आतां ही चूक कशी जरी झाली असली तथापि ती हिंदुस्थान सरकारास पदरांत घेतल्यावाचून दुसरा मार्ग नाहीं. लढाईच्या संबंधानें जे हुकूम फर्माविले गेले ते हिंदुस्थानसरकाराखेरीज दुसरें कोणी केले नाहींत असें आहे तर आपण केलेल हुकूम अमलांत आणण्यास खर्च काय लागेल याचा बरोबर अजमास करणें हें हिंदुस्थानसरकारचें कर्तव्य होतें. तें त्यांनीं योग्य रीतीनें बजाविलें नाहीं हें तरी निदान सदर सरकारानें पदरांत घेतलें पाहिजे.

चूक कशी झाली या बद्दलची जी हकिकत हिंदुस्थानसरकारानें प्रसिद्ध केली आहे ती विलायतेंतील अधिकाऱ्यांस सर्व प्रकारें कबूल नाहीं असें दिसतें. कारण तसें असतें तर या गोष्टीची चौकशी करण्याकरितां विलायत सरकारानें कमिशन नेमलें नसतें. आतां नेमलेल्या कमिशनापासून वास्तविक उपयोग होणें आहे तर झालेल्या गोष्टीची चौकशी करून होणार आहे असें नाहीं. चूक झाली ती झाली. ती परत येत नाही. चुकीची चौकशी करीत बसण्यापेक्षां अशी चूक पुन्हां होऊं नये अशाविषयीं कांहीं तरी योग्य तजवीज केली पाहिजे.

सर जान स्ट्रेची व लार्ड लिटन यांचे अमलांत हिंदुस्थानच्या जमाखर्चाची अतिशय अव्यवस्था झाली आहे व त्याचे करण्यावर प्रजेचा भरंवसा पूर्ववत राहिला नाहीं. करितां कमिटी नेमिली आहे तिनें सदहू चूक कशी झाली हें शोधून काढण्यापेक्षां अशी अव्यवस्था काय केलें ह्मणजे होणार नाहीं ह्या गोष्टीचा विचार करणें अधिक जरूरीचें आहे. सर्व साधारण नियम असा आहे कीं, राज्याच्या उत्पन्न व खर्चाचे कामांत प्रजेचें अनुमत घेतल्याखेरीज व्यवस्था नीट राहत नाहीं. युरोपांतल्या देशांतही जर ह्या गोष्टी अनुभवास येत आहेत तर आमचे देशांत येईल यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. येथें तर पैसा देणारे एक व खर्च करणारे एक असा प्रकार आहे. युरोपिअन लोक कितीही हुषार असले तरी ते नेटीव लोकांच्या संमतीनें चालल्याखेरीज या कामांत त्यांस यश यावयाचें नाहीं. करितां या गोष्टीचा विचार करणें अधिक जरुरीचें आहे. ने.ओ.

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत रा० रा० खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख १४ माहे जून सन १८८० इसवी. अंक २३


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ऽ४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १ऽ८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ऽ१ऽ६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ऽ१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ऽ३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ऽ२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## न्यायसार.

## इंडियन लॉरिपोर्टांतील निवाडयाचें सार व वऱ्हाडांतील सर्क्युलरें वगैरे.

पुस्तकाची किंमत व टपाल हशील.

| | | |
|---|---|---|
| एक वर्षाची | ४ रुपये | ऽ६ आ. |
| सहामाही | २ऽ८ | ऽ३ |
| तीन माही | १ऽ८ | ऽ१ऽ६ |

फुटकळ अंकास ऽ८ आ. ऽऽ७ पै.

वर्गणी आगाऊ आल्या विरीजे पुस्तक पाठविलें जाणार नाहीं. यां संबंधी पत्रव्यवहार ठेवणें तो " उमरावती एथें प्रमोदसिंधु छापखान्यांत न्यायसार कर्ते " या पत्त्यावर ठेवावा.

### पुस्तकांतील विषय.

भाग १ —दिवाणी

,, २ —फौजदारी.

,, ३ —हिंदु धर्मशास्त्र व मुसलमानी शरा; महत्वाचा ठराव सावंत देण्यांत येईल.

४—प्रमाण शास्त्र व करार शास्त्र.

५ —किरकोळ ( स्त्यांप, कोर्ट फी. नोंदणीचा व मुदतीचा कायदा.

६ —वऱ्हाडची सर्क्युलरें वगैरे

कायद्या संबंधी उपयुक्त शंका व पत्रव्यवहार कोणी पाठविल्यास तो पुस्तकांत घेतला जाईल.

अंताजी गोविंद वकील.

COMEDY OF ERRORS.

## कामेडी आफ एरर्स.

अथवा

## भ्रांतिकृतचमत्कार.

या नावाचें शेक्सपियरच्या इंग्लिश नाटकाचें भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरलेला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हशिलाबद्दल अर्ध आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचें औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें किंमत ऽ६ आणे.

हें औषध गजकरण शिवायकरून खरूज व नायटे यांजवरही चांगलें प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षांपूर्वी आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यांपासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलिकडे सदरहू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिलक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी त्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत.

## कौमुदीमहोत्साहः.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें " सिद्धांत कौमुदी " संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षडलिंग. अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें, पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शद्बांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च माहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस " पोष्टपेड " पत्रानीं कळवावें ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर
कौमुदीमहोत्साहकर्ते.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८

## सुबोधसार.

भाग पहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारज्ञांस विशेषेंकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषासही व्यवहारांत समयविशेषीं कसें बोलावें व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखें आहे हा ग्रंथ जाड कागदावर खिळेछापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ऽ१० आणे टपाल खर्च ऽऽ६ आह्माकडे पाठविल्यास पुस्तक ताबडतोब रवाना केलें जाईल. कळावें. ता. २६ आक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

## नादारी प्रकरणीं नियम.

वऱ्हाडांत नादारी संबंधी जो कायदा हल्लीं चालू आहे व ज्याच्या प्राति मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं सरकारी कचेऱ्यांतून वहिवाटीकरितां छापवून दिल्या आहेत तीं पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत आठ आणे. बाहेरगावीं पाठविण्यास एक आणा अधिक लागेल.

## नोटिस

उकर्डा वल्लद पुरणाजी चव्हाण रहणार मौजे तिव्हाण टाकळी तालुके खामगाव यास चंद्रभान वल्लद विक्रमशी पाटील मौजे वलखेड नजीक चितोड. तालुके खामगाव याजकडून नोटिस देण्यांत येते की, आमची कन्या नामे रुखमी इचे तुह्माशी लग्न झाल्यास सुमार २० वर्षे झालीं व तिला सेव पदर येऊनही सुमारें १० वर्षे झालीं एकंदरींत तिचे बागविण्याचे कामांत तुह्माकडून सर्वकाळ दगदगच सुरू आहे तुह्मास घरादाराची फिकर नसून बाहेर बाहेर कोल्हाटीण वगैरेच्या घरोघर फिरतां. एक वेळ तर तुह्मी माझे मुलीस विहिरींत लोटून दिलें होतें. अशा तुमच्या दुर्वतनामुळें तुमची बायको निरंतर माझे घरीं रहाते. दोन तीन वर्षांनीं एकादे वेळेस तुह्मी नेऊन महिना पंध्रा दिवस ठेविता पण तुमच्यानें तिची बरदास्त होत नाहीं या योगानें मला नेहमी खर्चाचे पेचांत यावें लागतें. ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून आठ दिवसांचे आंत रुखमीचे आन्नवस्त्राकरितां मला १०० रुपये खर्च आला आहे ते रुपये देऊन तिला घेऊन जाऊन आपला सुखानें संसार करावा. नाहीं पेक्षां फारकती द्यावी. यां प्रमाणें मुदतीचे आंत न केलें तर रुखमीवरील तुमचा लग्नाचा हक्क कायदेशीर रीतीनें रद्द करण्याची तजवीज करून तिला दुसरा घरठाव करून देण्यांत येईल. व खावटी खर्च, कोर्टखर्च, व या नोटिशीचा खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल. कळावें. तारीख ६ माहे जून सन १८८० इसवी,

( सही ) चंद्रभान वल्लद विक्रमशी
पाटील निशाणी मोहोर.

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

फत्तेखेडा — ता० ७।६।८० इ.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० आपणाकडे चार ओळी पाठविल्या आहेत तरी त्यांस आपल्या पेपरा सुंदर पत्रीं जागा मिळेल अशी आशा आहे.

कसबे फत्तेखेर्डा तालुके मेहकर जिल्हा बुलढाणा एथें रोहिणीचा पाऊस बराच पडला व हल्लीं मृग नक्षत्र लागल्या दिवसापासूही पर्जन्यानें बरीच धूम मांडली आहे. तरी अद्यापि उन्हाळ्याचें तोंड बुजलें नाहीं. दोन प्रहरीं ऊष्मा अतिशय होतो. तिसरे प्रहरीं वारा धुंद सुटून नंतर पाऊस पडण्यास आरंभ होतो, शेतकीचें कामही बऱ्याच झपाट्यानें चालू आहे.

पत्रकर्ते महाराज मला लिहिण्यास फार आनंद वाटतो कीं एथील हिंदुस्थानी हेड मास्तर मि० सय्यद अली हसन यांची बदली कसबे देऊळघाट एथें पंधरा रुपये पगारावर झाली. यांस एथें इतके दिवस १२ रुपये मिळत होते. आतां सदर्हू इसमाची बदली तीन रुपये बढतीं पगारावर झाली हें लिहिण्यास मात्र आनंद वाटतो; परंतु यांचा स्वभाव, यांची मुलांस शिकविण्याची शैली बरी आहे. ह्मणून त्यांचा आणि या फत्तेखेर्डा वस्तींतील लोकांचा वियोग झा ल्यामुळें सर्वांस वाईट वाटत आहे. असो सरकारी नोकरां पुढें इलाज नाहीं. हल्लीं त्यांचे जागेवर देऊळघाटाहून आलेले नवीन हेड मास्तर यांचाही स्वभाव पूर्वींचे मास्तर प्रमाणेंच दिसतो यांचें नाव सेख अबदुल रहीम आहे याणींही पूर्वीं कांहीं दिवस एथें अक्टिंग काम पाहिले होतें तरी वियोग झालेले मास्तर

प्रमाणे वर्तणूक ठेवून एयील रहिवासी लोका स पूर्वीचे मारत्याची आठवण येऊं देणार नाहींत अशी तजवीज ठेविल्यास आह्मास फार आनंद होईल. आतां पत्रविस्तार भयास्तव पुरे करितों. कळावें.

एक रहिवासी

वऱ्हाडसमाचार.

मिति ज्येष्ठ शुद्ध ६ शके १८०२

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा बचाव.

दोन वर्षों पूर्वी सतत तीन वर्षे दक्षिण प्रांती जो भयंकर दुष्काळ पडला तेणेंकरून शेतकरी लोकांची वाताहत झाली ते पुन्हा पूर्व स्थितीवर यावे, जमीनीची आबादी व्हावी, व सावकारांच्या कर्जदारीची त्यास तोशीस लागू नये ह्मणून सरकारानें एक नवीन कायदा नुकताच केला आहे. व त्याप्रमाणें या महिन्यापासून काम सुरू झालें आहे. मुंबई इलाख्यांत पुणें, सोलापुर, सातारा व अहमदनगर या चार जिल्ह्याकरितां ही विशेष तजवीज आहे. व हे ४ जिल्हे मिळून सरकारानें नवीन १२ मुनसफकोर्टें स्थापन केलीं आहेत. पूर्वीचीं कोर्टें दोन दोन तीन तीन तालुक्यांनां एकेक अशीं होतीं तीं वाढविण्याचें कारण असें आहे कीं शेतकरी लोकांनां लांब जाण्याचा व साक्षीदार वगैरेचा खर्च वाढू नये. सरकारानें आपणाकडून ही योजना फार चांगली केली पण तिजापासून रयतेस सुख किती होतें हें पाहिलें पाहिजे.

सावकार लोकांचे शेतकरी लोकांवर जे दावे कोर्टांत येतील त्या कामीं शेतकऱ्यास सुलभ असे ठराव करीत जावे असें नव्या अक्टांत आहे ह्मणजे शेतकऱ्यांवर फैसल झाला तर अगदी थोड्या रकमेच्या हप्तेबंद्या करीत जाव्या असें झाल्यानें सावकार लोक नाखुश झाले आहेत. व ते शेतकरी लोकांस नवे कर्ज देत नाहींत त्यामुळें त्याचा बचाव कसा होईल तें समजत नाहीं. कित्येक शेतकरी सावकारास राजी राखावें व पुढें आपणास त्यापासून कर्ज मिळावें ह्मणून त्यास कोर्टांत न जाऊं देतां अपसांत त्याची तडजोड करितात असे समजण्यांत आलें आहे. असें झाल्यानें ते सावकाराच्या कचाट्यांतून कधीं सुटणार नाहींत व ते असें करणार नाहींत तर त्यांचा चरितार्थ चालणार नाहीं. कारण शेतांच्या लागवडीस व मेहनत मशागतीस पैसा पाहिजे तो एरवी त्यांस कसा मिळावा? सबब आह्मांस असें वाटतें कीं, सरकारानें ज्याप्रमाणें शेतकऱ्यांस मदत करण्याकरितां कायदा केला आहे त्याचप्रमाणें त्यांस खर्चास तगाई देण्याचा ठराव करावा. ह्मणजे खरोखर त्यांचा बचाव होईल. नाहींपेक्षां कांहींच होणार नाहीं. असें त्या प्रांतांतील कित्येक अनुभवी लोकांचे तोंडून आह्मी ऐकिलें आहे सबब हा विचार सरकारापुढें ठेविला आहे.

## हिंदुस्थानांत उपयुक्त कलाकौशल्याची अवश्यकता.

हें वरील सदर वाचून आमचे वाचकांपैकीं कांहीं जणांस तरी नवल वाटेल व ते ह्मणतील कीं "आमचे देशांत कलाकौशल्य नाहीं कीं काय? ह्मणून त्याची जरूर पडली" यावर समर्पक उत्तर देणें ह्मणजे मोठें आवघड काम आहे. कारण हिंदुस्थानांत कलाकौशल्य नाहीं असें ह्मणावें तर सर्व जगांतील कौशल्यास मागें पाडणाऱ्या अशा इमारती व इतर वस्तु अजून आपल्या नजरे समोर उभ्या आहेत. जसा आग्र्याचा ताजमहाल, वेरूळ व घारापुरीचीं लेणीं, टिकठिकणीं पडलेल्या महाकाळीसारख्या तोफा इत्यादि. बरें, आतां हिंदुस्थानांत कलाकौशल्य आहे असें ह्मणावें तर आमचे देशांतील प्रत्येक घरांतून बहुतेक पदार्थ पर देशांत तयार झालेलेच दृष्टीस पडतात. तेव्हां आमच्या इकडच्या कलाकौशल्याचा काय उपयोग? तें हल्लीं नाहीं ह्मणण्यासारखेंच झालें आहे असें ह्मणण्यास फारसा बाध येणार नाहीं. ह्मणून उपयुक्त कलाकौशल्याची आपले देशांत हल्लीं अवश्यकता आहे असें आह्मास वाटतें.

हल्लीं विद्याशाळा जशा ल्हान खेडें गावांतून सुद्धां स्थापन होऊन अठराही वर्णांच्या लोकांस विद्यामृत पान करण्यास सांपडतें. व त्या योगें सरकारास ६।८ रुपयांपासून १०।१२ रुपयपर्यंत चांगले सवंग मास्तर, पोस्ट मास्तर व इतर कारकून मिळूं शकतात त्याचप्रमाणें नानाप्रकारचे हुन्नर शिकविण्यासाठीं उद्योग शाळा स्थापन झाल्या पाहिजेत व त्यापासून उत्पन्न झालेला माल इतका सवंग झाला पाहिजे कीं तो पर देशांत ही नेऊन विकतां येईल. व तेव्हां या देशांतील कलाकौशल्याला पूर्ण देशेस आला असें सिद्ध होऊन तोच या देशास उर्जित दशेचा दिवस मानिला जाईल; पण ही कल्पना हल्लींच्या मानानें केवळ आकाशास हात पुरविण्याप्रमाणें होईल. तथापि अशा प्रकारच्या उद्योगशाळांचा व कलाकौशल्याचे शाळांचा प्रसार व्हावा हे अति अवश्य आहे.

आह्मास कळविण्यास अति आनंद वाटतो कीं, आपल्या देशांतील या उणीव गोष्टीकडे आपल्या दयाळु इंग्रज सरकारचें लक्ष्य पोंचून या स्तुत्य उद्योगास आरंभ केला आहे. ह्मणजे बंगालचे लेफ्टनेंट गवर्नर सर आश्ले ईडन यांणी उत्तर हिंदुस्थानांत कलकत्ता नजीक हौरा एथें हुन्नर व कसब शिकविण्याची शाळा नुक्तीच स्थापन केली असें हिंदुपेट्रियट वरून समजतें. त्या शाळेंत सरकारच्या हुकुमानें कित्येक स्कालरशिपा ठेविल्या आहेत आणि प्रेसिडेन्सी कालेजांतील सिव्हिल इंजिनियरिंगचा वर्गही त्या शाळेला जोडला आहे. जे म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेत पसार झाले असतील त्यांसच या शाळेंत घ्यावें व त्यांस पांच वर्षे शिकवावें असा नियम केला आहे. पहिल्या ४ वर्षांत कसबाचें ज्ञान व थोडी कृति शिकवून शेवटल्या वर्षांत केवळ कृतीच शिकविणार. या उद्योग शाळेंत हल्लीं ४०० विद्यार्थी अभ्यास करित आहेत. ते चांगलें यशस्वी होवोत.

या वरील उदाहरणाकडे मुंबई, मद्रास व इतर प्रांता प्रांताचे मुख्य अधिकारी यांस लक्ष्य पुरविण्याविषयीं आह्मी शिफारस करितो व असें सुचवितों कीं, अशा प्रकारची निदान याहून कनिष्ट प्रतीची शाल्यासेंही हरकत नाहीं पण प्रांतांतून मुख्य मुख्य ठिकाणीं एक एक तरी उद्योग शाळा स्थापन करावी. यापासून देशाला उर्जित कळा येऊन त्या योगें सरकारचाहीं मोठा फायदा होण्याचा संभव आहे. या शिवाय दुष्काळाचें वेळीं सर्व प्रकारच्या लोकांचा बोजा सरकारावर पडतो त्यांत निरुद्योगी लोकांचाच फार असतो पण एक वेळा त्यांस कलाकौशल्याचा उद्योग शिकवून तरबेज केले ह्मणजे मोठ्या काळा दुष्काळांत सुद्धां ते आपला उदरनिर्वाह तरी सहज करू शकतील. ह्मणून अशा प्रकारच्या शाळांची ठिकठिकाणी स्थापना व्हावी असें आह्मी मनःपूर्वक इच्छितों.

The Government of India has passed a resolution whereby young native gentlemen of good position and learning may be admited as probationers in the Forest Department. This resolution is now in circulation among Heads of Departments through Commissioners of Divisions. The Forest Department is divided into three distinct branches viz

(1) officers of the controlling staff incharge of forest divisions.

(2) Officers of the executive staff incharge of forest ranges.

[3] Officers of the protective staff incharge of feats.

At present the controlling staff is recruited by officers who have underwent a professional training in Europe under arrangments made by the secretary of state for India. Native gentlmen may now offer their services for this branch of the service either by passing this examination at the India office or by entering the executive staff and there exibiting their talents by distinguished service and thus gain access to the controlling staff.

The forest school at Dehra Doon has been selected for training youths for service in that Department and to make easy the path to enter it and nothing would be more gratifying than to see the Beraree native gentlemen emboldened by this opening to come forward to undertake the labors attending tuition, in order to qualify for advancement to posts of responsibility in the administration. The pleasures of a forest life have a distaste to the urbanly cultivated mind, but these scruples should be overcome in order that the advantages deriving to the native may not be stultified by backwardness in entering the forest service. "Let us make hay while the sun shines."

The anniversary of the 61 st birthday of Her majesty the Queen Empress of India, was celebrated on the 29th morning with becoming eclat, by the military in the station. The companies of the IV Infantry, as well as the V regiment, paraded on the esplanade and the Royal salute was fired after the "present arms' and the whole battation vociferated a luscious hip! hip! hurrah! three times which reverberated like thunder. Then the "march past" and the usual ceremony of saluting was proceeded with. The band played a delightful tune during the "march past. The ceremoney was concluded immediately after. There were numerous spectators on the ground.

Mr. Shriram Bhikajee Jatar lost two halves of currency notes in 1877. On the remaining halves he recovered the money due there on. It is now discovered that the lost halves have been presented for payment at the Akola Treatreasury by one Abdul Rahman a broker of Chandod. His version of the manner in which he became possessed of the lost halves not being considered satisfactory, and the intention of fraud palpable, the man had been arrested and placed in custody. He was subsequently put on his trial and being found guilty was sentenced to pay a fine of Rs. 250.

An Instance of conjugal bliss, how it may be suborned to suit convenience where morality is at a lowebb has been exemplified in the case of two Dhungars of Khandalla Talook Akot. The facts of the case are, that a woman who did not appreciate the spouse she was linked to through the medium of infantile marriage resolved to break off the chains of matrimony by obtaining a legal declaration of divorce and to this end petitioned to the magistrate at Akola for a divorce. The husband a juvenile scarcely out of his teens was easily pacified by a fee of Rs. 100 and with a highly jubilant contenance acquiesced in permitting his wedded wife to be separated from him. A claimant who supplied the 'sop of cerberus' carried away the young spouse to be wedded to him in his village. The simpleton who received the consideration hastened to the market, and the first act of his prudence if it may be so called was to invest a portion of the gain in the purchase of a buffeloe. A happy thought!

Our readers are well aware that the system of working Money Order offices in India was changed from the beginning of this year, and the Postal authorities entrusted with their manageement. We are not aware if any securities or guarantees had been taken from

the officials who undertook the work, however it may be, the post office at Ellichpur collected a considerable sum of money on account of Mmoney Orders. We are informed that the key of the safe in which this money was kept was in the hands of the Post Master and without any assignable cause the large sum of nearly Rs. 3000 is said to have mysteriously disappeared during last week. A startling incident no doubt. It is asserted that the money was counted and found correct at the closing of the office; but the following morning the deficiency was noticed. The authorities are engaged in making an investigation. and we hope soon to receive further particulars.

A Mahomedan named Sheik Chand of the city of Hyderabad is said to have purchased a large quantity of gunpowder, the bags of which bear the mark of a Battery of artillery stationed at Secunderabad. The stores were checked and no deficiency detected, on the contrary a small surplus was found. The man is now in the custody of the Police, and endeavour is made to trace the origin whence he obtained the government powder.

A telegram announce Lord Lytton has advocated the abolition of the Indian Civil service. Does this meditate an opening for men in India. Eurasians and natives as well. Posibly the desire to effect a saving in matters of finance prompted this measure as no doubt the probability is that men of India will accept these posts on less remunerative salary than would the covenanted men who are sent out nowa days. It is a question whether this policy would be carried out. as it is doubtful how the proposal will be received at home. Unless it had assumed a magnitude approaching a fait accompli long before the defunct ministry lost its power there is the very remotest prospect of the question being revived.

## वऱ्हाड.

हवामान- ह्या आठवड्यांत पाऊस बिलकुल आला नाहीं उष्णतेचा प्रखरपणा बराच कमी झाला आहे. दिवस रात्र वारा सोसाट्याचा वाहत असतो. आकाश केव्हां मेघाच्छादित, केव्हां दिशा धुंद झालेल्या अशा असल्यामुळें बहुत करून मृगनक्षत्राची छाया असते. क्वचित् उष्णताही कडक असते. एकंदर हवा निरोगी व सौम्य आहे.

मे. जुडिशियल कामिशनर साहेबांची स्वारी ता. १९ जून रोजीं इलिचपुरास सेशनचा मुकदमा करून ता. २१ जूनला उमरावतीस येईल व नंतर ता. २३ जून रोजीं साहेब बहादुरांची स्वारीं अकोल्यास येईल असें समजतें.

थोड्या दिवसांपूर्वी एथील पोस्टांत मनीआर्डर करण्याकरितां एथील जेलर यांनीं आपले नोकराबरोबर २७ रुपये पाठविले असून २५ रुपयांचीच मनीआर्डर केली व बाकीच्या दोन रुपयांचा पत्ता नाहीं ह्मणून एथील जेलर यांणीं विचार पूस चालविली होती व त्याचप्रमाणें पोस्टांतील मनीआर्डर घेणारांनींहो आपले वरिष्ठांस रिपोर्टानें कळविलें होतें; परंतु ही गल्ती कशी झाली असेल हें कळत नाहीं. नोकरानें घरूनच पुरे रुपये मोजून आणिले नाहींत, किंवा रस्त्यांतून सांडले अगर पोस्टांत गहाळ झाले यांतून कांहीं तरी एक खरें असलें पाहिजे. जेलर साहेबांनीं आपले हातून रुपये मोजून नोकराजवळ दिले नसल्या कारणानें अधिक खटपट केली नाहीं.' व पोष्टाचे वरिष्टाधिऱ्यानीं " यांत लक्ष देण्यासारखें कांहीं नाहीं असें ह्मणून सोडून दिल्याचें कळतें.

रा. रा. वासुदेव बळवंत एथील पोस्टाकडील सब इन्स्पेक्टरचे हेड क्लार्क यांस तूर्त पूर्व वऱ्हाडेच सब इन्स्पेक्टर नेमिलें व त्यांचे आफिस नागपुरास राहील. त्यांचे जागेवर अवरंगाबादचे रा रा. बळवंतराव तेथील इन्स्पेक्टरचे क्लार्क यांस एथें क्लार्क नेमिलें.

गेले शुक्रवारीं सायंकाळीं ८।९ वाजतां ताजनापेठेंतील एका मुसलमानाचे झोपड्यास बैदपुऱ्यांत आग लागली पण तें झोपडें सडकेच्या बाजूनें व एकीकडे असल्यामुळें अधिक प्रसार झाला नाहीं. त्यावेळेस वारा मोठ्या सोसाट्याचा वहात होता तरी लोकांचा बराच जमाव झाल्यामुळें ही आग लवकर विझली एवढें चांगलें झालें तसेंच शनिवारीं मध्यरात्रीचे सुमारास नवाबपुऱ्यांत एका गवतीं झोपड्यास लागली होती ती पोलिसच्या लोकांनीं मोठ्या सिताफीनें विजविली. कारण सर्व लोक निद्रिस्थ होते, वारा सोसाट्याचा होता व आग भरवस्तींत होती ह्मणून या आगीची फारच भीति पडली होती तरी जागच्या जागीं विजली ह्मणून बरें झालें.

बाळापुर तालुक्यांतील मांडली नावाचे गाव गेले आठवड्यांत आग लागून सर्व जळून खाक झालें.

सहा महिन्याचा गर्भपतन करून एथील नदींत टाकलेला गेले आठवड्यांत बाहेर काढला. गर्भपात करणारी स्त्री अजून सांपडला नाहीं पोलिसचा तपास चालू आहे.

एथून वायव्य दीशेस बाळापुर तालुक्यांतील टाकळी ह्मणून एक खेडें आहे तेथील एका कुणब्यानें आपल्या आप्त सोयऱ्यांस व मित्रमंडळीस आंब्याच्या रसाची मेजवानी दिली पण मंडळी जेवून उठतांच १० मनुष्यांस वांती होऊन त्यापैकीं २ इसम लागलींच मरण पावले. याचें कारण त्या कुणब्यानें आंब्याचा रस तांब्याचे परातींत केला तेणेंकरून त्या तांब्र पात्राचा कलंक आंब्याचे रसांत उतरल्या जाऊन तो रस विषारी होऊन त्याचा एवढा भयंकर परिणाम झाला असें ह्मणतात पण एवढ्याच कारणानें तावडतोब मनुष्यें मरूं नयेत मग खरें काय असेल तें असो.

मे० दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब सी. आय. ई. हे लवकरच एथें येतील.

मूर्तिजापुरचे कै० विश्वनाथ शास्त्री यांचें कुटुंब व एक विष्णु नावाचा तरुण मुलगा गेले मंगळवारीं एकाएकी मरण पावला शिवाय ४ मनुष्यें बेजार आहेत असें दुःखकारक व भयंकर वर्तमान एथें आलें आहे. या उभयतांचे मरण विषप्रयोगानें झालें असावें असा संशय घेऊन पोलिसानें चवकशी करून डाक्टरनीं त्या सदहू उभय प्रेतांचा फाड वगैरे करून परीक्षा केली व त्यात विषप्रयोग च झाला असें पंचानुमतें ठरलें. मैत विष्णु याचे बायकोस तूर्त अटकेंत ठेविलें आहे. कारण ती बरेंच दिवसांपासून वाईट चालीची आहे. ह्मणून तिनेंच विषप्रयोगाचें साहस कर्म केलें असावें असा संभव आहे या साठीं पोलिस अधिकारी वगैरे तेथें येऊन तपास चालू आहे पुढें हें प्रकर्ण तिच्या वाईट चालीच्या योगानें कोठवर लांबेल हें पाहिलें पाहिजे.

रा० रा० श्रीराम भिकाजी जटार बी. ए, एजुकेशनल इन्स्पेक्टर यांच्या जवळून सन १८७७ इसवी सालांत २०० रुपयांच्या नोटीचे दोन अर्ध भाग गहाळ झाले होते तेव्हां त्यांनीं लागलीच एथील करंसी आफिसाकडे अर्ज देऊन गव्हर्नमेंट ग्याझेट मध्यें जाहिरातही दिली होती. त्यावरून ५।६ महिन्यानीं त्या नोटाचे रुपये रावसाहेब जटार यांस मिळाले. नंतर वर्ष दीड वर्षानीं चांदवडच्या अबदुल रहमान नावाचे मुसलमानानें त्याच नंबरच्या नोटाचे अर्ध तुकड्या बद्दल रुपये मिळोव ह्मणून अर्ज केला. त्यावरून गेल्या आठवड्यांत तो मुकदमा मि. किट्स साहेब असिस्टंट कमिशनर यांचे पुढें चालून गेले सोमवारीं अबदुल रहिमान यास २५० रुपये दंडाची शिक्षा झाली. प्रथम अबदुलरहिमान यानें अशी बतावणी केली होती कीं "ह्या सबंध नोटा मजजवळ होत्या व त्याचे अर्ध भाग मजजवळून गहाळ झाले." परंतु त्याच नंबरच्या नोटांबद्दल रावसाहेब जटार यांणीं सुमार दोन वर्षापूर्वींच रुपये घेतल आहेत व त्या पूर्वीं या नंबरच्या सबंध नोटा त्यांजपाशी होत्या या प्रत्यक्ष प्रमाणावरून त्याची बतावणी उघडकीस आली, आतां ह्या नोटांचे अर्ध भाग या अबदुल रहिमान याच्या हातीं कसे गेले असतील याविषयीं कल्पना करवत नाहीं. कदाचित् ह्या नोटाचे अर्ध भाग त्याला अगर दुसऱ्या कोणाला सापडून त्याचा त्यानें अडाणीपणानें व द्रव्यलोभानें आजवर संग्रह करून ठेविला असावा. ह्मणून त्याला यथायोग्य प्रायश्चितही मिळालें,

मोपचे डाकघरांतील चोरट्याचे शोधासाठीं वाशिमाहून पोलिसचे लोक गेले होते त्यानीं सर्व लोक पकडून आणले असें समजतें.

मि० यादअली पेन्शनर तहशिल्दार गेले आठवड्यांत मरण पावले उ. अ

चोरी--इलिचपूर एथील पोष्ट आफिसांतील मनी आर्डर पैकीं रुपये सिल्लक होते ते ता. ९ रोजीं रात्री चोरीस गेले ते रुपये सुमारें ३००० होते. चोरीचा प्रकार असा समजण्यांत आला कीं किल्या कुलुपास लाऊन कुलुपें काढून रुपये घेऊन पुन्हा आंतील पेटीचें कुलुप जसेचे तसेच लाविलें व बाहेरील दरवाजा उघडा टाकला व रुपया बराबर कागदपत्र ही नेलें. चोरानें भिंत वगैरे कांहीं फोडली नाही व पोष्ट आफिसाचे पेष्ट मास्तर युरोपियन आहेत तेव्हां आशा बंदोबस्तांतून चोरी होणें ह्मणजे मोठें आश्चर्य आहे व चोरी करणारा चोर मोठा बिलंद असला पाहिजे पुढें काय चोरीचा प्रकार होतो तो पाहूं पोलिस तपास करीत आहे.

व. मि.

इलिचपुराकडे अष्टी पासून थुगांवापर्यंत पुष्कळ पर्जन्य वृष्टी झाल्याचें कळतें.

निजाम सरकारांनीं आपले मुलखांत ज्या खाणी आहेत त्याची पहाणी करून रिपोर्ट करण्याकरितां आस्त्रियांतील हंगारी प्रांतांतील एका गृहस्थाची नेमणूक केली आहे असें टे. टा. वरून कळतें.

परतवाड्यास एक बंगला जळून सुमारें ३ हजारांचे नुकसान झालें असें समजतें.

गेल्या एप्रील महिन्यांत उमरावती स्टेट रेलवे वरून ३८२३ टन माल गेला व त्याचे भाड्याचें उत्पन्न ६६५६ रु. झालें. खामगांव स्टेट रेल्वे वरून ३१७८ टन माल गेला व उत्पन्न ४५३० रु. झाले.

उमरावतीचे रा. रा. सखाराम गणेश वकील यांस गेल्याचे मागील शनवारीं रात्री देवाज्ञा झाली. प्र. सि.

## वर्तमानसार

उपयुक्त होणें--- तुह्मी गत झाल्यावर जगास तुमचें स्मरण होईल अशा प्रकारें उपयुक्त होण्यास प्रयत्न करा. अथवा ह्या जगास तुमची आठवण होवो अथवा न होवो उत्तम लोकीं तुह्मी ज्या वेळेस प्रवेश कराल त्या वेळेस बहुत लोक तुह्मास सामोरे येतील व तुमचें आगतस्वागत करतील आणि तुह्मी तेथें जाऊन पुष्कळ काळ वस्ती केल्यावर बहुत लोक तुमचें अनुकरण करतील अशाप्रकारें उपयुक्त होण्यास तुह्मी प्रयत्न करा.

गेल्या महिन्याच्या १२ व्या तारखेस मुंबई एथील न्यू प्रिन्स आफ वेल्स गिरणींत बायलर फुटून झालेला अपघात त्या गिरणींतील इंजिनियर मि. फ्रीवरी यांच्या हयगयीनें झाला असें कारोनरच्या जुरींत ठरून त्या इंजिनियरावर पोलिसानें समन्स काढलें आहे आणि हा मुकदमा बहुधा ११ वीस पोलिस कोर्टांत उभा राहील.

आमचे प्रख्यात डा० आत्माराम पांडुरंग यांची कन्या आनाबाई लिट्लडेल यांस श्री. गायकवाड सरकारच्या तरुण राणीसाहेब यांच्या शिक्षक नेमल्याचें वर्तमान ऐकून आह्मांस फार संतोष वाटला. आनाबाई या कामास फार योग्य असून त्यांच्या सुज्ञ पित्यानें त्यांजकडून इतकी विद्या करविली तिचा या योगानें स्वदेशोन्नतीच्या कार्यार्थ कांहीं उपयोग होण्याचा संभव आहे.

पोलंड देशाची राजधानी वारसा एथें एक गृहस्थ ११८ वर्षांचा होऊन मरण पावला. त्याच्या प्रेताबरोबर त्याचेच वंशज २१५ होते असें समजतें.

विलायतेंत मिस बेक्विथ नामक एका

स्त्रीनें ३० तासपर्यंत एकसारखें पाण्यांत पोहत राहून दाखविलें.

पंखेवाले माकड--- बंगाल्यांत तारायंत्र खात्यांतील बाबू बी. पाइन नावाच्या गृहस्थानें एका माकडास पाळून; पंखा ओढण्याचें काम शिकाविलें तें माकडास साध्य होऊन कांहीं दिवस काम केल्यावर तो माकड आजारानें मरण पावला. ह्मणून त्यानें दोन नर व दोन मादा यांस शिकाविण्याचा यत्न केला त्यांत माद्यांस शिकाविण्याचे यत्न व्यर्थ जाऊन नर मात्र चांगले शिकले व हल्लीं पाळीपाळीनें तेंच काम करीत आहेत. शिकविण्याची युक्ति अशी केली कीं शिकाऊ माकडास इकडे तिकडे उड्या मारतां किंवा हालतां येऊं नये अशा रीतीनें खांबास बांधून जी पंख्याची दोरी हमाल ओढीत असे तिचें शेवट माकडाच्या हातास बांधीत ह्मणजे ज्याप्रमाणें पंखा मागेंपुढें होई त्याप्रमाणें माकडाचा हातहीं मागेंपुढें होई. असें कांहीं दिवस करून मग हमालास एकीकडे करून पाहिलें तों माकडानें हमालाप्रमाणें काम चालविलें. सु. प.

रंपा येथील दंगा पुन: तेथील लोक परत येतांच सुरू झाला असें ह्मणतात.

वेदशाळा.— नासिक येथील मैत्रायणशाखेतील सभ्य गृहस्थांनीं आपली शाखा पढविण्याकरितां एक शाळा असावी असा बेत करून आपसांत वर्गणी केली व त्याप्रमाणें एक शिक्षक नेमून सदरहू शाळा येत्या वैशाख वद्य ५ पासून सुरू होणार असें ऐकतों. हें उदाहरण इतर ब्राह्मण शाखेच्या लोकांनीं आपल्या वेदविद्येच्या उत्तेजनार्थ ग्रहण करावें ह्मणजे वेदविद्येचा चांगला प्रसार होईल.

कलादगी एथें व आसपास हिंवतापाचा चमत्कारिक रोग फैलावला आहे. या तापानें मनुष्याचा एक दोन दिवसांतच बहुधा निकाल होतो.

लार्ड रिपन साहेब तारीख ८ मिनहू रोजीं सिमल्यास पोंचतील व लागलीच एकदोन दिवसांत आपल्या कामाचा चार्ज घेतील. तोपर्यंत सर्व शिल्लक काम पार करावें असें लार्ड लिटन यांच्या मनांत आहे. लार्ड लिटन साहेब येत्या आगष्टपर्यंत सिमला एथें राहतील. आजपर्यंत जे वैइसराय झाले त्यांनीं नवीन वैसरायास कामाचा चार्ज देतांच कूच केले, पण लार्ड लिटन साहेब काम सोडल्यावर दोन महिने भाड्याचा बंगला घेऊन साधारण गृहस्थाप्रमाणें राहणार ही नवीनच गोष्ट आहे.

लार्ड रिपन साहेब रोमनक्याथोलिक आहेत ह्मणून ते येण्याच्या अगोदर सरकारानें एका निवडक रो. क्या. पाद्रीची नेमणूक सिमला एथें चापलेनच्या जागेवर केली त्यांचें नाव फादर पाट्रिक, हा ऐरिश असून पूर्वीं अलाहबादेस चापलेन होता व हल्ली रावलपिंडी एथें आहे. लार्ड रिपन यांनींही रे. फादर केर नामें एका रो० क्या० पाद्रीस विलायतेहून आपल्याबरोबर प्रायवेट चापलेनच्या कामावर आणिले आहे, बडे लोकांपाशीं असें घरगुती उपाध्याय असतात.

हिंदुस्थानचे कमांडर इन चीफ सर फ्रेडरिक हेन्स यांनीं आपल्या कामाचा राजीनामा दिला अशी जी बातमी बहुत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली ती खोटी आहे, असें टैम्स आफ इंडियास सिमल्याहूनन आलेल्या तारेवरून समजतें, ब्रा. द.

मागच्या आठवड्यांत बदलापूराचा स्टेशनमास्तर आगगाडीखाली सांपडून मरण पावला असें समजतें.

रत्नागिरी जिल्ह्यांतील एकंदर १३ गृहस्थांनीं परवाना घेतल्यावाचून हत्यारें बापरावीं असें सरकारानें ठरविलें आहे. यांत ५ म्युनिसिपाल कमिशनर, १ लोकलफंड मेम्बर, १ पेन्शनर, २ जमीनदार व ४ इनामदार असे आहेत. धारवाड जिल्ह्यांत ८ गृहस्थांस तशी मोकळीक दिली असून त्यांत ५ म्यू. कमि., व बाकीचे जमीनदार आहेत.

पनवेलीपासून पाच मैलांवर भिंगार नावाचें एक गाव आहे त्यास गेल्या मंगळवारीं रात्रीं आग लागून ८० घरें जळालीं व सर्व गावांत फक्त सहा घरें मात्र कायम राहिलीं आणि त्यांत कांहीं जनावरेंही जळालीं हे सर्व शेतकरी लोक असून बरसातीच्या बेगमीनें भरलेलीं घरें असल्यामुळें त्यांचें आज सर्वस्वी नुकसान होऊन त्यांस आज राहाण्यास जागाही नाहींशी झाली आहे व पाऊस तर अगदीं डोक्यावर येऊन पोंचला तेव्हां त्यांचे हाल कसे असतील हें सहज दिसतें. आपचे कलेक्टर साहेब याचा विचार करून त्यांस तावडतोब कांहीं तरी मदत करून आपल्या नावाची कीर्ती करतील अशी आशा आहे. हा गाव गेल्या वर्षींही असाच जळाला होता असें समजतें.

हीरात येथें काबुली व हीराती पलटणींच्या लढाया सुरूच आहेत व अयुबखान हा घोटाळ्यांत सांपडला आहे. मध्यंतरीं कंदाहारावर स्वारी करण्याचा अयुबखानानें जाहिरनामा लावला व त्याप्रमाणे हुकूमही सोडले, पण त्याची फौज फार अव्यवस्थित असल्यामुळें त्याचें करणें अमलांत आलें नाहीं. इकडे कंदाहारचा राजा शेरअली हा आपल्या मुलाच्या ताब्यांतली आपली जी मोठी फौज पूर्वेकडील सरहद्दीवर आहे त्या फौजेस मिळण्याकरतां गेला व त्याचें हे जाणें, अयुबखान कंदाहारावर स्वारी करण्याचा जो बेत करीत आहे त्यास बरेंच प्रतीबंधक होणार आहे.

क. कालेट हे ३०० पायदळ व कांहीं स्वार आणि पुष्कळ दारूगोळा असें घेऊन गिझनीस जाण्याकरतां ता. ४ रोजीं काबूलाहून निघाले.

ब्रह्मीराजा व बंडखोर राजपुत्र यांच्या लोकांची ता. १ रोजीं लहानशी लढाई झाली व त्यांत राजाचे लोक पळाले आणि बंडखोरांनी पाठलाग करून एकास पकडून त्याचें डोकें उडविलें.

रशियनमहाराणी ता. ३ रोजीं मरण पावली.

गेल्या एप्रिल महिन्यांत मुंबईबंदरांतून ८५,३६९ खंडी किंमत रुपये १,९३,८४,४७२ चा कापूस बाहेर गेला. व त्याच महिन्यांत ९,४०,७९४ रुपयांचे गहूं बाहेर गेले.

राणीसाहेबांच्या वाढदिवसाकरतां ता. २९ रोजीं इंदूर येथें मोठी कवाइत होऊन नंतर ज. डाली यांणीं दरबार करून होळकर व दुसरे राजे यांच्या भेटी घेतल्या.

बंगाल इलाख्याची सालिना जमा १७,२९,२५,००० रुपये असून खर्च रुपये ६,९८,२९,००० आहे. यावरून एकट्या त्या इलाख्यापासून १०२०,९६,००० रुपये निवळ नफा आहे असें होतें. अ. द.

पुणें एथील सरकारी तिजोरींतून दोन लक्ष रुपयांची रक्कम मुंबईस नुक्तीच रवाना झाली ह्मणून समजतें

श्री. पंत सचीव साहेब संस्थान भोर यांची स्वारी श्री. विंचुरकर यांच्या एथें लग्नसमारंभाकरितां आली होती ती परत आपले संस्थानीं गेली.

हल्लीं मावळांत पर्जन्यवृष्टीस सुरुवात झाली असून भात व नाचणीचे पेरे त्या पावसानें सुरू आहेत ह्मणून समजतें.

श्री. आनंदीबाई साहेब अक्कलकोटकर यांची स्वारी महायात्रेस गेल्याचें पूर्वीं आह्मी लिहिलेंच आहे. त्यांची स्वारी गेल्या आठवड्यांत परत पुणें एथें येऊन दाखल झाली. चालीप्रमाणें गंगापूजन करून त्याणीं शिष्ट ब्राह्मणास देकारही दिला.

नेक नामदार जनरल बार कम्यांडर इन् चीफ यांची स्वारी नेक नामदार लार्ड रिपन साहेबांच्या मुलाखतीसाठीं महाबळेश्वराहून मुंबईस गेली होती ती बरसातीकरितां गेल्या गुरुवारीं मेल ट्रेनीनें आपल्या मंडळी सह पुण्यास येऊन दाखल झाली. नेक नामदार साहेबांच्या पत्नी महाबळेश्वराहून पुणें एथें येऊन दाखल झाल्या.

रा० ब० महादेव गोविंद रानडे हे सुट्टी संपल्यामुळें गेल्या शनवारीं पुण्याहून निघून धुळ्यास गेले. रा० ब० यांस दरमहा २४०० रुपये पगार देऊन बडोदें संस्थानांत हायकोर्ट जज्जाची जागा देण्याचा विचार नेक नामदार राजे सर टी माधवराव यांणीं करून त्यांस पत्रही लिहिलें होतें, परंतु रा० ब० यांणीं ही जागा पत्करण्याचें नाकबूल केलें ह्मणून समजतें.

विलायती वर्तमानपत्रांस महत्व---विलायतेंतील मोठमाल्या बहुतेक वर्तमानपत्रांचे मालक यांची नवीन पार्लमेंटांत निवडणूक झाली आहे. त्यामुळें सध्याच्या पार्लमेंटाच्या कारकीर्दींत विलायती वर्तमानपत्रांची योग्यता वृद्धिंगत होईल असें वाटतें.

डोंगरास वणवा लागला असतां तो विझवण्याकरितां गावकऱ्यांनीं मदत करावी असें सरकारचें ह्मणणें आहे. परंतु गावकऱ्यांकडून तसें न झाल्यास भरण्याची राख रांगोळी होईल, तर जसा चोरीच्या बंदोबस्ताकरितां गावकऱ्यांवर पोलिस खर्च पडतो तसा या वणव्याच्या संबंधानें गावकऱ्यांवर नुकसानीचा खर्च पडावा अशा प्रकारचें कांहीं दुष्ट तर्कनिर्घ लागले आहेत. आणि ते कदाचित "पिशाचाच्या हातांत कोलीत" या ह्मणीप्रमाणें खरेंही ठरण्याचा संभव आहे. परंतु या उदार बुद्धीच्या नव्या कारकीर्दींत हे दुष्ट तर्क खरे होतील असें स्वप्नांतही कोणास वाटणार नाहीं मग पुढें पहावें काय होतें तें. ज्ञा. प्र.

अमेरिकेहून एक्सपोर्टर नावाचें तारू मुंबईस आले त्यावरून २०२११ केरोसिन तेलाच्या पेट्या आल्या.

हिंदु पेट्रियट पत्राचे कर्ते भानरबल क्रिस्तोदास पाल हे अतिशय आजारी असल्याचें दु:खकारक वर्तमान गेल्या सोमवारच्या टैम्स आफ इंडियावरून समजतें. त्यांस लौकर आराम होवो.

नुकतीच जी वैंगुर्ली नावाची आगबोट बुडाली तिजवरून सार्जंट सी. व्हील या नावाचे गृहस्थ कंदाहार रेल्वे खात्यांत नोकरीवर जात होते. त्यांचें सामान आगबोटीबरोबर नाहींसें झाल्यावरून मुंबई सरकारानें त्यांस ६९९ रुपये मोबदला देण्याचा ठराव केला तो ठराव हिंदुस्थान सरकारानें मंजूर करून ती रकम कंदहार रेल्वेनें द्यावी असें ठरविलें आणि या संबधानें शेरा लिहिला कीं अशा प्रकारच्या अपघातानें नुकसान होईल तेव्हां ज्यांचें नुकसान होतें तो सरकारच्या चाकरींत होता एवढ्याच सबबीवरून त्याचें नुकसान भरून मिळालें पाहिजे ही गोष्ट सरकार मान्य करण्यास सिद्ध नाहीं. सरकारी नोकरींत असतांना सरकारी नोकरास नुकसान होईल तेवढें भरून देण्याचा जिम्मा सरकाराच्यानें घेववत नाहीं आणि या पुढें सरकारी अमलदारांचे अपघातामुळें होणारें नुकसान भरून मिळूं नये.

ग्रीस देशाच्या सरहद्दीच्या प्रकरणाचा विचार करण्यासाठीं युरोपांतील प्रमुख राष्ट्रांच्या वकीलांची सभा तारीख १५ जून रोजीं बार्लिन एथें भरणार आहे.

मुस्तफीस हद्दपार करण्याचा परिणाम चांगला झाला आहे. इंग्रजांच्या विरुद्ध सतत कांहीं तरी गडबड चालू ठेवण्याच्या कामीं हुशार असा तो एकटाच होता हें सर्व कबूल करितात. त्याजवरील अपराध स्पष्ट स्थापित झाला आहे.

तारीख २१ मिनहू रोजीं मनमाडाहून दौंडास प्यासेंजर गाडी येत असतां मार्गांत एक गाय, २ बैल. व एक ह्मशीचें पारडूं रुळामध्यें सांपडून गाडीस अपघात झाल्याचें नगरसमाचारकर्ते ह्मणतात. ने. ओ.

द्रव्य लोभाचा परिणाम— पुणें नजीकच्या आळंदी येथील राहणारा ग्यानु कुऱ्हाडे या इसमास कोणी एका देवरुषीनें असें सांगितलें कीं तुला जर विपूल द्रव्य पाहिजे अशी इच्छा असेल तर रानांतून एक कोल्हा धरून आणून कोणत्याही प्रतिपदेचे दिवशीं आपल्या घरच्या दरवाज्या समोर त्या कोल्ह्याचा शस्त्रानें घात करून त्याची दोन छकलें करावीं व तीं दरवाज्याच्या दोहोबाजूस दोन अशीं पुरून टाकावीं ह्मणजे यथेच्छ संपती आपल्या घरीं चालून येतें. हें ऐकून त्या भोळ्या इसमानें पुष्कळ खटपट करून एक कोल्हा धरून आणिला आणि त्यानें सांगितल्या प्रमाणेंच करीत आहे तों त्या कोल्ह्यानें त्यास जोरानें चावलें. तथापि त्यास न जुमानतां त्यास धरून त्याची दोन छकलें करून टाकिलीं. त्या नंतर थोड्याच दिवसांनीं सदर्हू इसमास त्याच्या चावण्यापासून वेड लागून त्याजप्रमाणेंच भोंकूं लागला. याप्रमाणें झाल्यावर अशा स्थितींतच सदर्हू इसम मरण पावला. द्रव्य लोभाकरितां काय हा भोळेपणा ! ! सदर्हू हकीकत आमच्या एका तेथील स्नेहानें सांगितल्यावरून आह्मास समजली आहे. ज्ञा. च.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत रा० रा० खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुतस्क १४ अकोला, सोमवार तारीख २१ माहे जून सन १८८० इसवी. अंक २४


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRI-BUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## न्यायसार.

## इंडियन लॅारिपोर्टांतील निवाडयाचें सार व वऱ्हाडांतील सर्क्युलरें वगैरे.

| पुस्तकाची किंमत व | | टपाल हशील. |
|---|---|---|
| एक वर्षाची | ४ रुपये | ०६ आ. |
| सहामाही | २०८ | ०३ |
| तीन माही | १०८ | ०१०६ |

फुटकळ अंकास ०८ आ. ००७ पै.

वर्गणी आगाऊ आल्या खेरीजें पुस्तक पाठविलें जाणार नाहीं. या संबंधी पत्रव्यवहार ठेवणें तो " उमरावती एथें प्रमोदसिंधु छापखान्यांत न्यायसार कर्ते " या पत्यावर ठेवावा.

## पुस्तकांतील विषय.

भाग १ —दिवाणी

,, २ —फौजदारी.

,, ३ —हिंदु धर्मशास्त्र व मुसलमानी शेरा; महत्वाचा ठराव सारांश देण्यांत येईल.

४—प्रमाण शास्त्र व करार शास्त्र.

५ — किरकोळ ( स्टांप, कोर्ट फी. नोंदणीचा व मुदतीचा कायदा.

६ — वऱ्हाडचीं सर्क्युलरें वगैरे

कायद्या संबंधी उपयुक्त शंका व पत्र व्यवहार कोणी पाठविल्यास तो पुस्तकांत घेतला जाईल.

अंताजी गोविंद वकील.

---

विक्रीसे तयार

## कनिंघमकृत सटीक पुराव्याचा आक्ट.

अथवा,

सन १८७२ चा आक्ट १ ला व त्याच सालचा आक्ट १८ वा यावरून झालेली दुरुस्ती; उपोद्घात, समजुतीच्या टीपा, हायकोर्टाचे ठराव, व अवांतर कायदे जे मि. कानिंघम साहेब, ब्यारिस्टर व मद्रासचे आडव्होकेट जनरल यांनीं आपल्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तींत दिले आहेत त्या सर्वांचें

मराठी भाषांतर.

केवळ मराठी जाणणारांकरितां त्यांच्या परवानगीनें.

## बामन गोविंद रानडे वकील,

कोल्हापुर व बेळगाव, यांनीं केलें तें

पुणें एथें

"ज्ञानप्रकाश" छापखान्यांत छापलें तारीख १७ माहे मे सन १८८०

( किंमत ७ रुपये टपाल हशील व वंगी खर्चासह ०८ आठ आणे. )

हें वरील पुस्तक बरेच दिवसांपासून तयार होत होतें तें हल्लीं तयार झालें आहे. त्यांत आक्टाची पूर्णपणें समजूत होण्यासारख्या सरळ भाषेनें लिहिलेला असा ७७ पानांचा उपोद्घात आहे. आक्ट व टीपा मिळून रायल सांच्याची २५५ पानें आहेत. पुस्तक पाहिल्यावर त्याची योग्यता कळणारी आहे. पुस्तकें पुणें एथें "ज्ञानप्रकाश" छापखान्यांत व कोल्हापुर एथें "ज्ञानसागर" छापखान्यांत मिळतील.

---

## नोटिसा

जेठमल छगुलाल मारवाडी दुकान कसबे तेल्हारें तालुके अकोट यास भाऊराम वल्लद सटवाजी देशमुख मौजे महमदाबाद--तेल्हारें तालुके अकोट याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे आमचें देणें घेणें पांच चार वर्षांपासून असून आमच्याकडे तुमचे दुकानचें कर्ज १७०० रुपये आहे. गेले महिन्याचे २५ वे तारखेस तुह्मी स्टांप कागद आणून एक दस्तैवज ह्मणून लिहून घेतला पण तें खरीदखत केलें असें मला अलीकडे समजलें आहे. माझीं चार शेतें व राहते घराची इमारत, तीन बागाइती विहिरी ही जिनगी निदान पांच हजार रुपयांचा माल आहे व तें तुह्मी १७०० रुपयांत खरीदें घेण्याचा दगाबाजीनें विचार चालविला तेव्हां मी असा दस्तैवज कधीं लिहून देणार नाहीं. तो दस्तैवज केवळ रद्द आहे असें मी समजतों. अशी तुमची दगाबाजी मला समजल्याबरोबर मी तुमचे सर्व रुपये रोख देण्याम तुमचे एथें आलीं पण तुह्मी ते घेतले नाहींत व तो दगाबाजीनें लिहून घेतलेला दस्तैवज आमचे संमतीवाचून रजिस्टर करून घेण्याचे विचारांत आहा सबब ही प्रसिद्ध नोटिस दिली आहे. तरी ही पावल्यापासून आठ दिवसांचें आंत तुह्मी आपले रुपये घेऊन आमचे सर्व दस्तैवज परत द्यावे. याप्रमाणें न केल्यास या पुढें तुमच्या रकमेचें व्याज आह्मी बिलकूल देवाल नाहीं. या नोटिशीचा खर्च तुमचेवर बसेल कळावें. तारीख १२ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) भाऊराम वल्लद सटवाजी देशमुख दस्तूर जानगव भाऊराम देशमुख.

---

नोटिस.

चिमणाजी सांगळे जात वंजारी रहाणार मौजे गुंज तालुके मेहकर जिल्हा बुलढाणा यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा मौहोत्राचा नवरा असून मोंहोतूर लागण्यास १० वर्षे झालीं तेव्हांपासून आजपर्यंत तूं माझ्याशी जनरीतीप्रमाणें संसार केला नाही. ६ वर्षें झालीं असतील त्या वेळेस मला एक वेळा तूं आपल्या घरीं नेले होते व मी तेथें ५ महिने होते परंतु माझ्याशीं जनरीतीप्रमाणें संसार केला नाहीं तूं माणसांत नसल्या कारणानें माझी खात्री झाल्यावर मी आपल्या आईबापाच्या घरीं आले. यानंतर तूं एक दोन वेळा एथेंही आला व मी चालण्यास ह्मटलें तर तूं पळून गेला. त्यावरून माझे आईबापाची व गावांतील लोकांचीही खात्री झाली. मी आज ६ वर्षे माहेरीं राहून सावकारी पैसा दीड शें रुपये अन्नवस्त्रास खर्च झाला. हल्लीं या नोटिसीनें असें कळवितें कीं एक महिन्याचे आंत माझे बापाचे घरीं येऊन खर्च झालेला पैसा देऊन मला नेण्याचें करावें सदर्हू मुदतींत असें न केल्यास मला दुसरा नवरा करण्याची परवानगी द्यावी. एक महिन्याच्या आंत परवानगी न दिल्यास मी दुसरा नवरा करीन नंतर तुझा हक्क कोणत्याही रीतीनें मजवर चालणार नाहीं. कळावें तारीख १० माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) जाई मर्द चिमणाजी सांगळे वंजारी वस्ती पास्टुल तालुके बाळापुर निशाणी बांगडी.

---

नोटिस-

भवानी वल्लद जानजी तायोड रहाणार मौजे निंभोरें तालुके अकोलें यास. रामजी वल्लद लक्ष्मणजी तायोड रहाणार मौजे मजकूर तालुके मजकूर याजकडन नोटिस देण्यांत येते कीं, तुमची आमची भाऊबंदकी असून जागेचे व घराचे हिस्से पूर्वींपासूनच झालेले आहेत. आह्मी आपले जागेंत रा. बापुजी गांवंडे याचे गरीबीवर लक्ष्य देऊन त्यास छप्पर करून रहावयास दिलें; परंतु अलीकडे सदर्हू छपराची जागा तुह्मी कोण्या मारवाड्यास विकून रजिस्टर करून देणार असें आमचे कानावर आलें आहे ह्मणून तुह्मास या नोटिशीनें अशी समज देण्यांत येतें कीं, सदर्हू छपराची जागा पूर्वापार माझ्या मालकीची असून माझ्याच ताब्यांतही होती व मीच बापूजी यास रहावयास दिली आहे असें असतां ती जागा तुह्मी कोणत्या आधारानें दुसऱ्यास लिहून व रजिस्टर करून देणार हें कळत नाहीं. व ती माझी जागा असल्यामुळें तुह्माजवळून माहितगार मनुष्य कधी घेणार नाहीं इतक्यावर जर तुह्मी दुसऱ्या कोणा गैरमाहित मनुष्यास लिहून द्याल अगर कोणी लिहून घेईल तर तें गैर कायदा ठरून उभयतांचेंही नुकसान होईल हें तुह्मास कळावें. व नोटिशीचा खर्च तुह्मावर बसेल कळावें तारीख १५ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) रामजी वल्लद लक्ष्मणजी तायोड पाटील मौजे निंभोरें याचे हातची निशाणी

---

मानभाव पंथाची उत्पत्ति.—

राक्षसभुवनाच्या पूर्वेस असणाऱ्या शेंबे गावचा वतनदार गोपाळपंत कुळकरणी व जोशी त्याचा ( कृष्णंभट ) हा पुत्र. मानभाव मत यापासून निघालें. त्याविषयीं दंतकथा अशी सांगतात कीं,— यास वेताळाची अतिशय भक्ति असे, आणि त्यामुळें त्यास त्याचा साक्षात्कारही होता. एकदां यास वेताळ ह्मणाला, तुला जें इच्छित असेल तें माग. त्यावरून यानें मी लोकांस कृष्णासारखें दिसावें असें मागितलें. तेव्हां वेताळानें यास एक मुगुट देऊन ह्मटलें, हा जोंपर्यंत तुझ्या डोक्यावर असेल तोंपर्यंत तूं कृष्णच असा लोकांस दिसशील; परंतु हा डोक्यावरून काढतांच पूर्ववत् दिसूं लागशील. यास्तव हा संभाळ, व विचारानें चाल असें सांगून वेताळ अदृश्य झाला.

पुढें यानें कुळकरण्याचें व जोशीपणाचें काम भावाबंदांच्या गळ्यांत घातलें, व आपण त्यांतून मोकळा होऊन वरप्रदानाप्रमाणें कृष्ण होऊन लोकांच्या दृष्टीस हळू हळू पडूं लागला. ही गोष्ट चोंहीकडे प्रसिद्ध झाल्यानें गांवचे व आसमंताद्भागच्या प्रदेशांतले लोक दर्शनास येऊं लागले, व कित्येक स्त्रीपुरुषांनीं अनुग्रह घेतले. त्यांत त्यानें थोडें जपून चालावें तें न चालतां याच्या कृष्णरूपास ज्या अनुग्रही स्त्रिया भुलल्या व संभोग इच्छूं लागल्या त्यांच्या मनकामना यानें निर्धास्तपणानें रासक्रीडेच्या थाटानें पुरवून बहुत द्रव्यही संपादन केलें. सारांश याचा अनुग्रह घेण्याविषयीं स्त्रीपुरुषांच्या उड्या पडतां पडतां हें याचें प्रकरण पैठण शहरांतही हळू हळू शिरलें.

ही गोष्ट फुटत फुटत हेमाद्रिपंताच्या (हेमाडपंताच्या) कानावर गेली. तेव्हां यांसही आश्चर्य वाटून, त्याच दिवशीं त्यानें त्याचें इष्ट दैवत गणपति होतें त्याची प्रार्थना करून त्यास वरील गोष्ट पुसली. तेव्हां गणपतीनें हेमाडपंतास त्या गोष्टीचें सर्व मूळ व मर्म सांगून अदृश्य झाला असतां, हेमाद्रिपंतास या गोष्टीचा पराकाष्ठेचा राग आला. व त्यानें लागलीच एक कारकून कृष्णंभटास पैठणास घेऊन येण्णसाठीं शेंबे गांवास पाठविला. कारकून चतुर होता, ह्मणून त्यानें मोठ्या नम्रतेनें प्रार्थना करून युक्तीनेंच कृष्णंभटास पैठणास नेलें, व पंतास नेऊन भेटविलें. पंतांनीं त्याचें कृष्णरूप पाहून त्याचा मोठा आदरसत्कार केला, व स्नान भोजन आज येथेंच व्हावें ह्मणून विनंती केली. ती कृष्णंभट मान्य करीना. कारण डोकीवरील मुगुट स्नान करतांना काढावा लागेल, व तो काढतांच आपलें भांडवल फुटेल याचें त्यास भय पडलें.

शेवटीं होय नाहीं अशा प्रकारें उभयतांचें भाषण होतां होतां, हेमाद्रिपंताच्या नेत्रसंकेतावरून कारकुनानें एकाएकीं याच्या डोयीवरील मुगुट उचलला. तो उचलतांच कृष्णंभट मूळच्या रूपानें दिसूं लागला. असें पाहून हेमाद्रिपंतानें त्यास कैदेंत ठेविलें. नंतर ज्या बायका, व जे पुरुष त्याचे अनुयायी होते, त्या सर्वांस त्यानें पैठणास धरून आणवून विचार केला कीं, या सर्वांस मारणें योग्य नाहीं. ह्मणून मग त्यानें कारकुनास आज्ञा करून कृष्णंभट व त्याचे अनुयायी सर्व स्त्रिया व पुरुष या सर्वांचे पांचपाट काढून व सर्वांस काळीं वस्त्रें नेसवून हद्दपार केलें. (पूर्वीं काळें वस्त्र अपमानाचें चिन्ह समजत असत) तोच हा सांप्रत दिसत असलेला मानभावाचा पंथ होय.

हल्लीं चांगल्या जाणत्या मानभावांस पुसतां ते ह्मणतात कीं, आह्मी कृष्णाचा भाऊ बलराम याचे संप्रदायी आहों. कारण बलराम नील वस्त्रें वापरीत असे, व नीलांबर असें त्यास असलेलें नांव अमरकोशांत प्रसिद्धही आहे. तेंच चिन्ह आमचें आहे ह्मणून आमचें मत खरें आहे. या लोकांचें मत काय आहे, व मानभाव या शब्दाचा अर्थ काय याविषयीं हकीकत आहे ती येणेंप्रमाणें:—

मानभाव ह्मणतात, आमचें खरें नांव महानुभाव आहे. या पंथाची प्रवृत्ति महाराष्ट्र देशांत असून, विशेषेंकरून वऱ्हाडांत फार आहे. यांतील मुख्यांत महंत असें ह्मणतात. यांचे मुख्य मठ पांच आहेत. त्यांचीं ठिकाणें, ऋद्धपूर; कारंजें, दर्यापूर, फलटण, आणि पैठण. या शिवाय बाकी वगैरे उपमठ आहेत ते निराळे. मठांचीं नांवें, नर मठ, नारायण मठ, ऋषि मठ, प्रवर मठ, आणि प्रशांत मठ, येणेंप्रमाणें आहेत. एका महंताच्या हाताखालीं पुष्कळ मानभाव असतात. एक महंत समाधिस्थ झाल्यावर, त्याच्या शिष्यांतून सर्वानुमतें जो योग्य ठरेल त्यास त्याच्या गादीवर बसवितात. महंतास पालखी, मोरचेल, चवरी, शिक्का वगैरे सर्व राजचिन्हें असतात.

मानभाव पंथांत गृहस्थाश्रम आणि संन्यासाश्रमांतील स्त्री पुरुषास केशवपन जरी आहे, तरी त्यांस लग्न करण्याची इच्छा असतां त्यांतल्या त्यांतच तें करण्यास प्रत्यवाय नाहीं. गृहस्थाश्रमांतील स्त्री पुरुषांस वपन नाहीं, काळ्या वस्त्रांऐवजी मात्र पांढऱ्या वस्त्रास एक काळें ठिगळ असावें लागतें.

ह्या पंथाचा मुख्य आचार्य कृष्णंभट होता. ह्मणून त्यासच कृष्ण समजून त्याच्या मूर्तीची उपासना मानभाव करतात, व कृष्णचरितामृत जो त्यानें केलेला ग्रंथ त्यास फार मानतात. या शिवाय हे लोक दत्तात्रयालाहि भजतात. यांच्यांत जैन लोकांप्रमाणेंच हिंसेचा निषेध आहे. तरी दसऱ्याच्या दिवसांत गांवामध्यें पशुवध होतो ह्मणून, जैन लोक गांव सोडित नाहींत, पण हे लोक नऊ दाहा दिवस पर्यंत पालें देऊन रानांतच राहावयास जातात. इतका यांचा कडक नियम आहे.

यांच्या भोजनांत एकवाढ असते, आणि भोजनास बसतांना कृष्णनामाचा गजर आरंभीं करून भोजनास बसणें हा एक त्यांचा नियम असतो. यांचा लग्नविधि असा आहे कीं, ज्यास लग्न करणें असेल त्यानें आपली झोळी जी मानभाविण त्यास आवडेल तिच्या झोळीवर ठेवावी. ती तिनें तशीच राहूं दिल्यास त्याचें लग्न ठरतें; न राहूं दिल्यास नाहीं. लग्न ठरल्यावर निरनिराळ्या आंथरुणावर परंतु जवळ वधुवरांनीं निजावें. मग महंतासमक्ष वरानें श्रीकृष्णाचा गडबडगुंडा आला असें ह्मणावें. त्यास वधूनें खुशाल येऊं द्या असें ह्मणतांच, लोळत तिच्याकडे जावें ह्मणजे उभयतांचें लग्न झालें.

मानभाव लोक इतर धर्माच्या लोकांस आपलीं धर्ममतें सांगत नाहींत. त्यांचीं पुराणें ह्मटलीं ह्मणजे गीता, लीलानिधी, व लीलामृतसिंधु हीं आहेत. ह्यांशिवाय रुक्मिणी स्वयंवर, बाललीला, गोपीविलास आदिकरून हे लहान ओंवीबद्ध ग्रंथ आहेत. यांच्या ग्रंथाची लिपि निराळ्याच संज्ञेची असल्ये, व ते ती मानभावी दीक्षा घेणाराशिवाय इतरास सांगत नाहींत.

मानभावांत ज्ञानोबा, निवृत्ति, सोपान, मुक्ताई, अशीं नांवें आपणास ठेवून कित्येकांनीं अभंगही लिहिले आहेत; व ते सर्व प्रायः डोळे, नाक, कान, दाबून जो लखलखाट दिसतो त्याच्या वर्तनपर आहेत. त्यावरून या मतांत षण्मुखी मुद्रेचें पाहणें याचें प्राधान्य दिसून येतें.

या मताची प्रवृत्ति शालिवाहन शकें ११२९ मध्यें हेमाद्रिपंत पैठणास चंद्रसेन राजाचा कारभारी असतां झाली असें ह्मणतात, आणि जर ही गोष्ट खरी असेल तर आज या मतास उत्पन्न होऊन पावणेसातशें वर्षें झालीं आहेत असें ह्मटलें पाहिजे; ह्मणजे हें मत ज्ञानेश्वराच्या पूर्वीं सुमारें पाउणशें वर्षें निघालें होतें असें दिसून येतें. ही माहिती आह्मांस एका वृद्ध मनुष्याकडून मिळालेली आहे ती जशाची तशीच एथें लिहून वाचकांस सादर केली आहे.— हिंदुस्थानचा अर्वाचीन कोश. सु. प.

# वऱ्हाडसमाचार.

मिति ज्येष्ठ शुद्ध १४ शके १८०२

## शिंदे सरकारचे पुत्र लाभ संबंधानें औदार्य.

ग्वालेरचे शिंदे सरकारास एक पुत्र आहे आणि आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, त्यांनां द्वितीय पुत्र नुकताच झाला आहे. राजे लोकांस असे अनेक पुत्र होणें ही ईश्वरीकृपेची देणगी होय. पुत्रलाभानें गरीबास देखील संतोष होतो. मग येरास होईल यांत संशय काय? जेथें लक्ष्मी विपुल असतें तेथे संततीची वाण असते अशी बरीच प्रसिद्धी आहे. त्यांतून राजे लोकांनां तर क्वचित संतती होते व असें अर्थें ह्मणजे दत्तक, व त्याविषयीं परवानग्या वगैरे खटपटीचे उपाय योजावे लागतात. ते टळून राजे लोकांस औरस पुत्र होऊं लागले आहेत. ही देशास सुखाची गोष्ट आहे. आणि साऱ्या देशास सुखाची गोष्ट राज संतत ती झाल्याबद्दल स्वतां राजास अत्यानंद होणें व तत्प्रीत्यर्थ त्यांनीं आपलें औदार्य दाखविणें हें हीं साहजीक आहे. ह्मणून शिंदे सरकारानीं या गोष्टीसाठीं पुष्कळ पैसा खर्च करण्याची व साऱ्या हिंदुस्थानांत लोकांस आपल्या पुत्रोत्सवाची आठवण रहाण्याची तजवीज योजिली आहे हीही संतोषाची गोष्ट आहे.

एथपर्यंत हें सर्व ठीक झालें पण तें औदार्य कोणत्या रूपानें खर्चीं घालावें या विषयींचे शिंद्याच्या दरबारचें मत फारसें प्रशंसनीय आहे असें आह्मांस वाटत नाहीं. त्यांनीं निश्चय केला आहे कीं, या पुत्रोत्सवाप्रीत्यर्थ साऱ्या हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं मिळून पांच लक्ष ब्राह्मणभोजन घालावयाचें. पक्वान्न काय करावयाचें त्याचा निश्चय अजून ठरला नाहीं तो इतक्यांत ठरेल पण तयारी करितां वाई, पंढरपुर, नाशीक, त्रिंबकेश्वर, पुणें वगैरे ठिकाणीं हुकूम येऊन थडकले असें समजण्यांत आलें आहे,

शिंदे सरकारास ब्राह्मण भोजन फार प्रिय आहे. व औदार्याची विशेष गोष्ट हीच ते समजतात असें दिसतें. कारण मागें एक दोन वेळां अशीं लक्ष ब्राह्मण भोजनें त्यांचीं चालू झालेलीं आहेत त्यासाठीं महिनेच्या महिने खटाटोप चालतो. व खर्च होतो तितका धर्म ब्राह्मणाकडे रुजू होत नाहीं. कंत्राटदार, कामदार हे सरकारास ठकवून ब्राह्मणांच्या तोंडचें अन्न आपण चोरून खातात. व त्यांत नानाप्रकारचे विपर्यास घडतात. येणेंकरून ब्राह्मण भोजन हें धर्मसंबंधानें जरी श्रेयस्कर आहे तरी त्या अन्नाचा व्हावा तसा विनियोग झाला नाहीं. तर त्या दानास सर्वांशी सत्पात्रता ह्मटली जाणार नाहीं असें आह्मांस वाटतें.

हल्लींची महागाई व मोठ्या एका पक्वान्नाचें जेवण व राज दरबारचा सढळ खर्च ह्मटला ह्मणजे सरासरी पात्रीं एक रुपया लागेल त्यामानानें पांच लक्ष ब्राह्मणांस भोजन घालणें ह्मणजे पांच लक्ष रुपये पाहिजेत. आतां शिंदे सरकारास एवढी पांच लक्षांची रकम ह्मटली ह्मणजे कांहीं फार नाहीं, ती केवळ त्यांच्या हातावरची मळी आहे पण एवढे पांच लक्ष रुपये केवळ एक वेळच्या ब्राह्मण भोजनाला उधळून टाकावे व त्या द्रव्याचें श्रेयसंपादन मागें व्यवहार मार्गांत कांहींच राहूं नये असें होणें एवढ्या मोठ्यांच्या कृत्यास चांगलेंसें शोभत नाहीं.

मागें पुराण काळाचे प्रसंगीं स्वदेशिय राजांचीं राज्यें होतीं. देशांत आबादी होती लोकव्यवहार सुरळीत चालत होते, तेव्हां ब्राह्मण ग्रंथकारांनीं दानग्राहकता काय ती आपणाकडेच लिहून ठेविली. तेव्हां त्यांविषयीं लोकांची महत्व बुद्धीविशेष, व धर्मावर निर्वाह करण्याचे इतर ज्ञातीस कारण कमी ह्मणून त्या बाबदींत कांहींच तक्रारी निघाल्या नाहींत. नाहींपेक्षां निघाल्या असत्या. असें जरी आहे तरी देश, काल, पात्र पाहून जें दान करावें तें उत्तम असें भगवद्गीतेंत श्रीकृष्णानीं सांगितलें आहे तेव्हां त्या मानानें ह्मणजे देशस्थिति, कालाचा ओघ आणि दानपात्रता याविषयीं विचार केला तर एक ब्राह्मणच शिंद्यांच्या पक्वान्नयुक्त मिष्ट भोजनास अधिकारी असावे व इतर गोरगरीब, अतीत अभ्यागत, भणंग भिकारी, गोसावी बैरागी, फकीर व इतर अनाथ लोक यांस त्या दानाचा अंश न मिळावा हें बरोबर नाहीं. सात्विक दानाच्या रीतीनें ह्मटलें ह्मणजे या सर्वांस पात्रता आहे. व ब्राह्मणभोजनाचे बदला अन्नार्थी भोजन ह्मणून सर्व अनाश्रितास अन्नदान करणें अधिक श्रेयस्कर आहे असें आह्मांस वाटतें.

हा सदरील विचार नुसत्या अन्नदानापुरता झाला. पण शिंदे सरकार पुत्रोत्सवाप्रीत्यर्थ पांच लक्ष रुपये खर्च करणार तेव्हां ते त्यानीं असें एक वेळ अन्न शिजवून लोकास खाऊ घालून नाहींसे करावे यापेक्षा तेवढ्या रकमेचा दुसरा शाश्वत उपयोग त्यांस कांहीं करतां येत नाहीं कीं काय? हा दुसरा प्रश्न आहे. व आमचे मतें मुख्य विचार हाच आहे. दक्षिण देशांत २ वर्षें दुष्काळ पडून बहुत शेतकरी लोकांची वाताहत झाली व सरकारच्या साऱ्याचे दुट्टे त्यांच्या मागें लागले त्यामुळें ते कृष्णमुख करून विदेशीं राहिले आहेत त्यांकरितां शिंदे सरकारानीं सारा भरला तर त्यांनां घरादारांत आणून सोडल्याचें त्यांनां पुण्य लागेल. वरें सारा इंग्लिश सरकारानें माफ केला तर त्या गरीब लोकांस शिंदे सरकार बैलांची जोडी, बीभरण व औत घेऊन देतील तर त्यांनां जन्माचें अन्न दिल्याचें पुण्य लागेल, व देशाची आबादी होईल. देशांतील सर्व कारागिरी परकी लोकांच्या घरांत गेली आहे त्याविषयीं स्वदेशीय राजे शिंदे सरकार अभिमान धरून कांहीं शिल्प शाळा ठिकठिकाणीं घालितील तर हजारों तरुण लोक धंद्यास लागतील व त्यांस दुवा देतील. आपल्या देशांतील कापडाचे माग बुडाले व विलायती कापडाचा सुकाळ झाला तेणेंकरून साळी कोष्टी उपाशी मरूं लागले त्यांची कीव धरून शिंदे सरकार एक दोन गिरण्या आणून चालू करतील तर त्यांस फार पुण्य लागेल. व इतके खटपटीचे मार्ग कांहीं नाहीं केले व नुसते पांच लक्ष रुपये इंग्लिश सरकारचे स्वाधीन करून जिल्ह्याचे ठिकाणीं गरीब अशीं पांच पांच विद्यार्थ्यांस पांच पांच रुपयांच्या दरमहा पगारी जागा अभ्यास करण्यासाठीं द्या असें ह्मटलें तरी एवढ्याच रुपयांत सुमारें पाचशें विद्यार्थी पाहिजेत तितकीं वर्षें विद्याभ्यास करून शिंदे सरकारास यावज्जन्म दुवा देतील. तेव्हां धर्माचे, परोपकाराचे आणि आनंद प्रदर्शित करण्याचे इतके परोपरीचे मार्ग असतां तिक

लक्ष्य न पोंचून भटांचीं तोंडें क्षणमात्र गुळचट होण्याकडे व अर्धा मुर्धा पैसा मध्यस्थांच्या जबड्यांत पडण्याकडेच खर्च झाला तर तसाच योगायोग व देशाचें दुर्दैव समजलें पाहिजे. दुसरें काय ?

## काबुलाकडे अस्वस्थता.

काबूल देशचे लोक कांहीं तऱ्हेवाईक आहेत. ते कांहीं आठवडे स्वस्थ असतात व कांहीं आठवडे बेताल होऊन जातात. एवढें पराक्रमी इंग्लिश सरकार दोन वर्षें त्यांच्या पाठीस लागलें आहे व बारंवार त्यांच्या खोडी मोडीत आहे तरी ते दांडगे लोक ताळ्यावर येत नाहींत एवढेंच नव्हे, केव्हां केव्हां ते अधिक बेफाम होतात, हल्लीं त्याप्रमाणें झालें आहे. या आठवड्यांत काबुलाकडील ज्या तारा आल्या आहेत त्या चांगल्या नाहींत. अबदुल रहमान यास कांहीं अटीवर इंग्लिश सरकार काबुलचा अमीर करणार आहे पण असें वर्तमान आहे कीं, तो या गोष्टीस कबूल नाहीं त्यानें सरदार लोकांस इंग्लिशांविरुद्ध उठण्यास गुप्त पत्रें पाठविलीं आहेत. त्यानें मझारीशरीफ ही काबुलची नवी राजधानी करून नाणें पाडण्याची तजवीज चालविली आहे. लोकांपासून तो कर्ज घेत आहे, सावकारांकडून जबरीनें चांदी नेऊन तिचें नाणें पाडीत आहे. काबुलास लवकर यावें असा त्याचा इरादा नाहीं.

दुसरा सरदार अयूबखान इंग्लिश सरकारानें हिरातेस पाठविला आहे. त्याला फौजेपैकीं कोणी पुसत नाहीं. तो निस्तेज होऊन राहिला आहे. महमद जान गिजनीस गेला आहे व इंग्लिश सरकाराविरुद्ध त्याला लोक मिळूं लागले आहेत. लोगरी लोकांनी गडबड सुरू केली आहे. अलटीमोर एथें बरेच लोक जमले आहेत. गिलजाई लोक कावेरे बावरे झाले आहेत. अंदुखत एथे ३००० लोकांचा जमाव जमला आहे. मीर बुचा हा गडबड करण्याच्या रंगांत आला आहे, फक्त अबदुल रहमानची वाट पहात आहे. मस्की अलाम यानें कांहीं लोक जमविले आहेत व तो बहादूरखान किल्यावर आला आहे. कोहीस्तानी लोक इंग्लिश सरकारास मदत करितात त्यांची खोड मोडण्यासाठीं तागे लोक व निजरो लोक उठले आहेत. महमद शहाखान यानें साफी लोकांचा जमाव जमविला आहे अशी ठिकठिकाणची बातमी प्रसिद्ध झाली आहे मग त्यांत खरेपणा किती आहे तो पाहिला पाहिजे.

काबुलचा रस्ता बामीनच्या वाटेनें अगदी बंद पडला आहे. तिकडे फारच चोरावा माजला आहे. असें ह्मणतात कीं, लवकरच निदान सहा आठवड्यांत सर्व काबुलभर पुन्हा धुमाळी होईल. इंग्लिश सरकार अबदुल रहमानच्या अखेर जबाबाची वाट पहात आहेत. १९ वे तारखेस त्याला मुद्दाम पत्र पाठविलें तें विसावे तारखेस त्याच्या हातीं जाईल नंतर लागलाच काय तो निकाल होईल. अबदुल रहमान ताळ्यावर आला नाहीं तर अयूबखानाला काबूलचा अमीर करणें किंवा याकूबखानाला हिंदुस्थानांतून परत नेऊन पुन्हा अमीर करणें या दोहोंपैकीं एक गोष्ट इंग्लिश सरकारास करावी लागेल व फौजेची तयारी ठेवावी लागेल.

तिकडे उन्हाळा प्रखर आहे. पेशावराहून २००० तट्टं काबुलाकडे सरकारांतून रवाना झालीं त्यांचा बिलकूल पत्ता नाहीं. हिंदुस्थानांतून ५६००० रुपयांचे १४००० मण बटाटे फौजांकरितां पाठविले होते ते तेथें पोंचत पर्यंत इतके नासले कीं पाहण्याबरोबर जमीनींत खळगे करून ते पुरावे लागले व हवा खराब होऊं नये ह्मणून त्यांवर चुना घालावा लागला. याप्रमाणे काबुलाकडील प्रस्तुत हकीकत आहे.

## रशिया व चीन यांचा युद्धसंग्राम.

जगामध्यें शांति क्वचित असते. निरंतर कांहींना कांहीं गडबडी चालू असतात. तुर्कस्थान व रशिया यांची लढाई संपून फार काळ झाला नाहीं, काबुलची लढाई अजून मिटली नाहीं, ब्रह्मदेश प्रकरण पानावर पान टाकिल्याप्रमाणें राखून ठेवलेंच आहे तो आतां रशिया व चीन या दोन मोठाल्या राष्ट्रांचा संग्राम सुरू झाला आहे. हा किती दिवस चालून कोणत्या थरास जातो पहावें.

चिनी लोकांचा उत्तर हद्दीवरील लिली नावाचा एक प्रांत आहे व त्याचें मुख्य शहर कलजा नावाचें आहे तें सन १८७१ सालीं रशियन लोकांनीं आपले ताब्यांत घेतलें त्या वेळेस असा हेतु दाखविला कीं चीन सरकारचा अंमल ढिलावला आहे व रशियन व्यापारी काफले तिकडून जातात येतात त्यांवर हल्ले होतात सबब बंदोबस्ताकरितां ही तजवीज केली आहे. चिनी सरकार जेव्हां परत मागेल तेव्हां हें शहर आह्मी परत देऊं. त्या गोष्टीस ९ वर्षें झालीं. बहुत वेळां चिनी लोकांनीं मागणें केलें पण रशियन लोकांनीं तें शहर परत दिलें नाहीं एवढेंच नव्हे त्याची अधिक बंदोबस्ती केली व तेथून सेंटपिटर्सबुर्घ पर्यंत तारायंत्रही केलें यावरून चिनी लोक लढाईस उठले आहेत. व रशियन लोकही त्यांशीं सामना देण्यास सिद्ध झाले आहेत. हिंदुस्थानांतून कर्नल गार्डन ह्मणून एक गृहस्थ चिनांत गेले आहेत. लढाई होऊं देऊं नये, मध्यस्थी करावी असा त्यांचा हेतु आहे. तसें न झाल्यास ते रणदीक्षाही घेतील. त्या प्रांतीं ते नामांकित आहेत.

## वऱ्हाड.

हवामान— रोहिणीचे एक दोन पाऊस सर्वत्र पडून पर्जन्य काळास सुरुवात झाली असें वाटत असे त्याप्रमाणें एथें ही प्रकार घडला. पण मृग नक्षत्राचा एक थेंबही आला नाहीं दिवसभर वारा सोसाट्याचा वाहतो व त्यांत पाहिल्या पेक्षां किंचित गारठाही असतो. मृगनक्षत्र संपून आर्द्रास आरंभ झाला तरी पाऊस नाहीं ह्मणून सर्व लोक हवालदील आहेत. पेरण्याचीं कामें बंद पडलीं आहेत याच प्रामाणें पुणें, सोलापुर, नगर, साताराा, मुंबई, धुळें बऱ्हाणपुर. काशी व कलकत्ता या या ठिकाणच्या पत्रांवरून कळतें कीं, तिकडेही मृगनक्षत्राचा पाऊस पडला नाहीं तेणेंकरून कोठें रोग, कोठें महर्गता हीं आपले पाय शिरकवित आहेत. अशा प्रकारें तप्त झालेल्या जगास आर्द्रा तरी आर्द्र करून सोडोत नाहीपेक्षां स्थिति कठिण आहे.

सर रिचर्ड मिड साहेब बहादुर रेसिडेंट यानीं आपली रजा १५ दिवस वाढविल्यामुळें मे० लोन्स साहेब गेल्या आठवड्यांत परत आले नाहींत पुढील आठवड्यांत येतील असें समजतें.

मे. दस्तुर बहिमनजी साहेब सी आय ई येथील स्माल काज कोर्टचे जड्ज यांची रजा संपून काल रोजीं ते येथें येणार होते परंतु मे. रतनजी साहेब हैदराबादेस घोड्यावरून पडून आजारी झाले असें एकदम कळल्यावरून ते तिकडे गेले. व अधिक रजेविषयीं काल तार आली. मि० डेविस साहेब व मि० दस्तुर एदलजी साहेब तीन दिवसां पूर्वी रजेवरून परत आले व आपआपले कामावर रुजू झाले.

रा. रा. गोपाळ महादेव भिडे वाशिमास क्लार्क आफ धि कोर्टचे जागेवर जाऊन रुजू झाले त्यांचे बदली रा. रा. परशराम जगन्नाथही येऊन आपले कामावर रुजू झाले.

रा. रा. हणमंत खंडेराव वऱ्हाडांतील पेनशनर तहशिलदार नाशकास होते ते कित्येक दिवस आजारी असून थोड्या दिवसांपूर्वीं मरण पावले असें समजतें.

अगरचे त्रिंबकराव देशमुख वगैरेवर मागें खुनाचा मुकदमा होऊन शिक्षा झाल्या होत्या ते कागदपत्र मे. जोन्स साहेब रेसिडेंट यांचे पहाण्यांत आले व त्यानीं त्या प्रकरणांत कित्येक रिमार्क्स करून चौकशी फिरून करण्याकरितां जुडिशीयल कमिशनर साहेब यांस लिहिलें आहे. व कर्नल बुशबी साहेब यांनीं त्या प्रकरणाचा कायमचे जु. कमिशनर साहेब यानीं आपले माहिती प्रमाणे निकाल करण्यासाठीं राखून ठेविलें आहे असें समजतें.

मे. महमद रजा मद्रास इलाख्यांतील हिंदुस्थानी शाळांवरील डिपुटी इन्स्पेक्टर यांस मि. दस्तुर एदलजी साहेब असिस्टंट कमिशनर झाले त्यांचे अख्त्यारीचे जागेवर नेमिल्याविषयीं या आठवड्याचे हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

बाळापुरचे नायब तहशिलदार रा. रा. गगाराम आबा यानीं २ महिन्यांची रजा घेतली होती पण दीड महिन्यांत ते आपलें खानगी काम आटोपून कामावर रुजू झाले.

वऱ्हाडांतील सर्व दिवाणी कार्टें दोन महिने बंद होतीं तीं १६ वे तारखेपासून सुरू झालीं.

२१ वे तारखेस इलिचपुरास व २४ वे तारखेस उमरावतीस सेशन आहे त्या धोरणानें जुडिशीयल कमिशनर साहेब तेथें तेथें जाऊन नंतर अकोल्यास येतील.

वाघोलीचे पाटलास हार्वे सभापति कंपनीनें कपाशीबद्दल पैसे देतांनां चुकून १०० रुपये जास्त दिले व तो त्या गोष्टीस नाकबूल आहे सबब फिर्याद झाली आहे.

शाळा खात्याकडील बोर्डिंगाकडे डा. डिसोजा यांस १० रु. ची नेमणूक झाली.

कपाशीचा व्यापार करणारे राली ब्रदर्स कंपनीचे एजंट एथें आहेत त्यांचीं वजनें मापें खोटीं असल्याच्या संशयावरून पकडलीं होतीं पण तीं खरीं ठरलीं सबब परत दिलीं. सरकारास ही खोटी खबर फ्लेमिंग कंपनीनें दिली असें त्यांचें ह्मणणें आहे.

या आठवड्यांत ४।५ दिवस पोलिसानें खूप गर्दी करून ३४ कलमाचे मुकद्दमे सुमार १०६ केले. स्वच्छतेचें काम म्युनिसिप्यालिटीचें आहे व तिचा ५० रुपये पगाराचा इन्स्पेक्टर नावाचा कामदार हेंच काम पहात असतो. शिवाय डिव्हिजनल मेंबर दोन दोन आहेत व त्यांणीं अशा हलक्या कामांत लोकांवर मुकद्दम्याची सक्ती करूं नये. त्यांस ताकिदी द्याव्या व ताकिदीनें न झाल्यास म्युनिसिप्यालिटीनें मनुष्यें लावून स्वच्छता करवावी. व त्या मनुष्यांची मजुरी घरवाल्यापासून घ्यावी असा गुदस्त सालीं लोकांचे सोयीकरितां नियम करून ठेविलेला आहे. व तेणेंकरून काम सुरळीत चाललें आहे असें असतां पोलिसानें ही एकदम गडबड उडवून देण्यास मुळांत काय कारण झालें तें समजलें नाहीं. वरिष्ठांनीं हुकूम दिला असल्यास म्युनिसिप्यालिटीसच कळविलें असतें तर सहल तजविजीनें काम झालें असतें. आतां पोलिसास हें काम पहाण्याचा अधिकार नाहीं असें नाहीं व त्यांचे शिपाई हिंडतही असतात असें असतां महिन्याचे महिने कधीं ह्मणण्यासारखे मुकद्दमे झाले नाहींत तितके मुकदमे चार दिवसांत झाले यावरून दिसतें कीं धरपकड अधिक झाली व ती कान्स्टेबल लोकांचे केवळ तंबेतानें कित्येक गोष्टींत विनाकारण झाली असावी असा लोकांचा गवगवा आहे तसें नसतें तर याच आठवड्यांत इतक्या लोकांनीं एकदम घाण केली ह्मणणें जुळत नाहीं. सबब ज्यांचें जें काम तें त्यांनीं नीट रीतीनें सररास करून लोकांस एकदम त्रास, काळजी व गैरअब्रूचा धोका न येऊं द्यावा अशी आमची त्यांस शिफारस आहे. व लोकांस आमचें सांगणें आहे कीं त्यांनीं काळजीपूर्वक स्वच्छता ठेवावी. त्यांचे कराचे पैसे घेऊन त्यांचीं कामें बजावणारी म्युनिसिप्यालिटी आहे व ती आपले अभिवचनाप्रमाणें त्यांवर मुकदमे करणार नाहीं एवढ्या भरवशावर स्वस्थ राहूं नये. कालभैरवाप्रमाणें पोलिसचा सोटा त्यांवर आहे हें त्यांनीं लक्षांत ठेवावें, दुसरें काय ?

## वर्तमानसार.

नवीन व्हाइसराय यांची सिमला मुक्कामीं लार्ड लिटन माजी व्हाइसराय यांनीं १० वे तारखेस रीतीप्रमाणें भेट घेतली. मि. प्रिमरोज यांस व्हाइसराय साहेबानीं आपले प्रायव्हेट सेक्रेटरी नेमून घेतलें.

काबुलाकडून मुस्ताफियास मुरी एथें आणिलें. पोलिस अधिकारी त्याचे बरोबर होते त्याची प्रकृती नीट नाहीं. व कांहीं मुक्काम त्यास डोलींत घालून आणिलें.

पब्लिकवर्क्स खात्यांत पेनशनाविषयीं नवीन नियम होणार ह्मणून वार्ता होती त्याप्रमाणें कांहीं घडेल असें दिसत नाहीं त्या कामासाठीं एक कमिटी नेमली होती व तिनें रिपोर्टही केला होता पण तो मागें पडला.

नागडोंगराकडे मागें तिकडील अडाणी लोकांनीं गडबड केली होती तेथें आतां व च्यावाच्या जागा सरकार तयार करीत आहे.

चिमी लोकांनीं रशियन लोकांच्या हद्दीवरील ठाण्यावर हल्ला केला व आंत शिरले. समर्कंद एथील रशियन फौज यार्कंदकडे जात आहे असें ह्मणतात. आक्सस नदीच्या पलीकडे लोकांत फार अस्वस्थता उत्पन्न झाली आहे. व तिकडील लोक रशियाविरुद्ध बंड करण्यास तयार झाले आहेत असें ह्मणतात.

सर रिचर्ड टेंपल साहेब मुंबईचे माजी गवरनर विलायेतस आहेत त्यांस डाक्टर आफ सिविल ला असा नवीन किताब मिळाला.

दक्षिण आफ्रिकमध्यें इंग्लिश सरकारानीं नवीन मुलुख काबीज केला आहे तो वाढविण्याची खटपट कांहीं करूं नये व तिकडील स्वतंत्र वागणाऱ्या लोकांस कांहीं तोशीस लावीत जाऊं नये असें स्टेट सेक्रेटरीनीं नटालचे गवरनरास लिहून कळविलें आहे.

तुर्कस्थानांत कादीर पाच्छा यांस प्रधान सभेचे मुख्य नेमिलें. आणि अबेदीन पाच्छा यांस परराष्ट्रसंबंधी प्रधान व वजीर नेमिलें.

मि॰ ग्लाडस्टन साहेब यांनीं पार्लमेंटमध्यें नुकतेंच जमाखर्चाचें टिपण वाचिलें. तेव्हां कांहीं कर अधिक उणे करण्याची सूचना केली. दारूसंबंधीं कर कांहीं कमी केला. व इनकमट्याक्स दर सहामाहीस दर पौंडास एक पेनी वाढविला व या धोरणानें सालअखेरीस अडतीस लक्ष रुपये शिलक राहील असा त्यांनीं अजमास केला आहे.

सर बार्टल फ्रियर साहेब याची दक्षिण आफ्रिकेंतील नेमणूक कायम राखण्याविषयीं महाराणी साहेबांच्या प्रधानानीं आग्रह धरिल्यावरून लिबरल पक्षाचे लोकांत बरेंच असमाधान उत्पन्न झालें.

लार्ड रिपन आणि लार्ड केनेमर यांच्या नेमणुकीच्या विरुद्ध ग्लासगो आणि लिवर्पूल एथील लोकांच्या सभा होऊन अर्ज झाले आहेत.

रशिया देशांत राजकीय गुन्ह्याचे संबंधानें चौकशीचें काम चालू होतें तें संपलें. २ कैद्यांनां फाशीची शिक्षा झाली. एकाला १५ वर्षें खाणीमध्यें सक्त मजुरी करण्याची शिक्षा झाली. तिघांनां वीसपासून आठ वर्षेंपर्यंत सक्त मजुरी कैदेच्या शिक्षा झाल्या. तिघी स्त्रियांनां पंध्रा पंध्रा वर्षें व सहा स्त्रियांनां च्यार च्यार वर्षें सक्त मजुरी कैदेच्या शिक्षा झाल्या.

सातार जिल्ह्यांतील वाई शहरावर प्युनिटिव पोस्ट बसलें आहे. त्यासंबंधी ७००० रुपये वर्षाचा कर आहे तो गाववाल्याकडून घेतला जातो. हल्लीं स्वस्थता आहे दंगेधोपे नाहींत सबब सरकारानीं मेहरबान होऊन सदर्हू पोस्ट आमचे एथून उठवावें असा लोकांनीं गवर्नर साहेबास अर्ज दिला. ते महाबळेश्वराकडे जातांनां तेथें गेले होते त्यांनीं त्याविषयीं योग्य विचार करूं असें त्यांस आश्वासन दिलें आहे.

आह्मांस लिहिण्यास वाईट वाटतें कीं त्रावणकोरचे महाराज तारीख ३१ मे रोजीं मरण पावले. हें २० वर्षें राज्यकारभार पहात होते व यानीं आपला कारभार शहाणपणानें व सुधारल्या पद्धतीनें चालवून मोठा लौकिक संपादन केला. यांनां पुत्र आहेत त्यांतील वडिलास गादीचा अधिकार प्राप्त झाला. हे प्रौढ अजून सद्गुणसंपन्न आहेत.

श्रीमंत शिंदे सरकार यांस द्वितीय पुत्र झाला. त्यांचे नाव श्री॰ महादजीबोवा ठेविलें व या आनंदानिमित्त ५ लक्ष ब्राह्मण भोजन ठिकठिकाणीं घालावयाचें असा संकेत झाला आहे.

मुंबईचे नवीन गवरनर साहेब महाबळेश्वरास गेले होते ते पुण्यास परत आले.

सातारचे पेनशनर डिपुटी कलेक्टर रा. रा. बाळाजी गणेश माठे यांस देवाज्ञा झाली.

नगर जिल्ह्यांतील राहुरीचे गंगाराम नाइक याजवर मुलास ठार मारल्याचा गुन्हा शाबीद होऊन सेशन जडजानीं फाशीची शिक्षा दिली होती तिजवर हायकोर्टांत अपील होऊन आरोपी दोषनिर्मुक्त झाले. ११ ब्राह्मण अनुष्ठानास बसले होते, आतां स्वाहाकार सहस्त्र भोजन वगैरे होऊन एकंदर खर्च २०००० रुपये लागले !

नगरास रेल्वे स्टेशन बांधण्याची सुरवात झाली आहे खर्चाचें सांगशन ३५००० रु. आहे.

मुंबईस वे. शा. सं. ज्वालादत्त जोशी वैद्य यानीं हठदीपिका ग्रंथाप्रमाणें योग शास्त्राचा अभ्यास बालपणापासून केला त्याचा कांहीं चमत्कार लोकांस दाखविला वेताची एक सहा हात छडी मुखावाटे पोटांत घातली व ती पुन्हा बाहेर काढली. चार बोटें रुंद व १६ हात लांब एक वस्त्र मुखावाटें पोटांत घातलें व वर लोटाभर पाणी प्याले आणि नंतर तें वस्त्र काढून दिलें.

रा. ब. माधवराव गोविंद रानडे यांस बडोद्यास जडजाची जागा मिळत होती ती त्यानीं नाकबूल केली.

सोलापुरच्या शाळेवरून कलेक्टर साहेब जात असतां पुष्कळ मुले बाहेर लघवीस येऊन खेळत असलेली त्यानीं पाहिलीं व शाळेंत जाऊन मास्तरशीं त्याबद्दल त्यांचें बोलणें होऊन त्याचे वरिष्ठास त्यानीं लिहिलें व त्या बाबदींत मास्तरास आठ आणे दंड झाला. मास्तरानें सांगितलेल्या लघवी शद्बाचा अर्थ कलेक्टर साहेब शौच असा समजले असावे असें तिकडील पत्रांत लिहिलें आहे.

आलीकडे तीस वर्षांत हिंदुस्थानांतील लोकांवर कर किती वाढले आहेत ते पाहा. सन १८४९ सालीं मिठावरील कर ३,१८,९०,००० रुपये होता तो सन १८७९ सालीं ७ कोटी रुपये झाला. जकात त्यासालीं ९४,७०,००० रुपये होती ती हल्ली २,२४,८०,००० रुपये झाली. अबकारीचें उत्पन्न १,११,१५,००० रुपये होतें तें २,७४,२०,००० रु. झालें. स्टांपाचें उत्पन्न ५९,४०,००० रुपये होतें तें २,०८,७०,००० रुपये झाले. व करांचें उत्पन्न ९ लक्ष रु. होतें तें ८९,६०,००० रुपये झालें.

हिंदुस्थानांत अफूवर मोठा कर आहे. त्याविषयीं नुकताच पार्लमेंट सभेंत विचार निघाला होता, तेव्हां असें ठरलें कीं हा कर सोडून देणें हिंदुस्थानांतील देशाची स्थिति नीट नसल्यामुळें तूर्त अशक्य आहे.

सातारचे डिपुटी कलेक्टर रा. ब. सदाशिव मोरेश्वर साठे रजेवर आहेत त्यांनीं पेनशनाचा अर्ज केला असें समजतें.

सोलापुर हायस्कुलाला थोड्याच दिवसांत शेतकीचा वर्ग जोडला जाणार आहे. लोकलफंडाकडून व म्युनिसिप्यालिटीकडून खर्चाची तजवीज झाली.

मद्रास इलाख्यांत मुलींच्या शाळाकरितां एक स्त्री इन्स्पेक्टर नेमण्याचा सरकारचा ठराव झाला आहे. मिसेस ब्रांडर नावाची एक युरोपियन स्त्री मद्रासेस ५।६ वर्षें मुलींच्या नार्मलस्कुलावर मुख्य शिक्षक होती व ती हल्लीं एडिबरो एथें आहे तिलाच या कामावर नेमिलें आहे व ती लवकरच तिकडून इकडे यावयास निघेल.

नेटिव वैद्य आणि डाक्टर यांच्या योग्यतेच्या संबंधांत मुंबईच्या पत्रांतून वादविवाद मोठे झपाट्यानें चालू आहेत. व त्यांविषयीं नीट विचार झाला तर डाक्टर लोक मागतात असा कायदा सरकार त्यांस करून देणार नाहीं असें वाटतें.

अमेरिकेंत न्यूयार्क एथें हवेच्या दाबानें ट्रामवेच्या गाड्या कशा चालतात तें पहाण्याचे प्रयोग चालविले आहेत.

लार्ड लिटन यांची स्वारी ता. २९ मिनहू रोजीं मुंबईस येण्यासाठीं निघणार व मार्गांत त्यांस भेटण्याकरितां बरेच राजे येणार असें समजतें.

वैनाद प्रांतांतील सोन्याच्या खाणीच्या व्यापाराच्या संबंधानें आजपर्यंत ८ मंडळ्या स्थापित झाल्या असून त्यांचे एकंदर ९० लक्ष रुपये भांडवल जमलें असें समजतें.

रशिया व चीन यांजमध्यें लढाई होण्याचा संभव असून त्या संबंधानें अमूर प्रांतांत कडेकोट तयारी चालली आहे.

सिमला एथें लष्करी लोकांत अशी गुणगुण आहे कीं जनरल हिल्ची तुकडी शटरगरडान एथून पिछेहाट करून अली खेल एथें येईल आणि जनरल राबर्टसची फौज खैबर मार्गें गंडमाक एथें येऊन राहील आणि चांगली हवा पाहून हिंदुस्थानास परत येईल. तसेंच ६ आठवड्यांनंतर काबूल एथें इग्रजांकडील एकही शिपाई रहाणार नाहीं.

काठेवाड सरकारी रेल्वेवरून पहिली गाडी ता. ८ जून रोजीं चालली. या रेल्वेचें भावनगरापासून वढवाणपर्यंत अंतर १०९ मैल आहे. ने. ओ.

सोलापुर एथील पोलिस सुपिरेंटेंडेंट साहेबांच्या हपीसचे इष्टाब्लिशमेंट कमी करून त्यांतील लोकांस कलेक्टरकडे ज्या जागा रिकाम्या असतील अगर होतील त्यांजवर नेमावें व पो. साहेबांच्या आफिसांतील हिशेबी वगैरे काम हेडकार्टरांत इंग्रजी जाणणारे एक दोन क्लार्क ठेवून त्यांच्याकडून करवावें आणि पो. सु. सा. यांणीं पो. इन्स्पेक्टरप्रमाणें फक्त डिस्ट्रिक्टांत फिरण्याचें काम करावें अशाविषयीं सरकारांत प्रकर्ण चालू असून सदर्हू प्रमाणें व्यवस्था लौकरच अमलांत येणार असें कळतें. क. त.

हल्लींच्या लिबरल पक्षाचे पुढारी व विलायत सरकारचे हल्लींचे मुख्य प्रधान जे ग्लाडस्टन साहेब त्यांणीं लिहिलेल्या एका पत्रांत ही पुढील दोन वाक्यें आहेत असें एक ठिकाणीं वाचण्यांत आलें व त्यावरून या नव्या राज्यकारभाऱ्यांपासून आपण जी अपरिमित आशा करीत आहों ती कितीशी सफळ होण्याची आशा आहे हें दिसून येतें. तीं वाक्यें अशीं आहेत कीं, तुमच्या ( काउन्ट करोली ) पत्रांत जे मुद्दे सांगितले आहेत " त्या प्रत्येक मुद्याबद्दल प्रथम विचार न करितां मी एकदम मूळ विषयाकडे वळतों. " मी ज्या वेळेस रिकामा होतों व माझ्या " शिरावर ज्या वळेस कांहींच जबाबदारी न " व्हती त्या वेळेस मी जीं जीं भाषणें केलीं " तींच भाषणें हल्लीं कायम ठेवावीं व पुन्हा " त्याच मासल्याचीं भाषणें करावीं असा " माझा बेत नसून राणीकडून ज्या घटकेस मला प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं त्या " घटकेपासून पूर्वीं बोलल्याप्रमाणेंच मला सर्व गोष्टी कायम करतां येणार नाहींत असा माझा निश्चय झाला. मला हल्लीं स्थिति प्राप्त झाली आहे ही स्थिती प्राप्त होईल " असें मला पूर्वींच जर वाटलें असतें तर " मी पूर्वींच्या भाषणांपैकीं एक शद्बही उच्चारला नसता. भ. द.

प्रांत गोवा व हुबळी यांचे दर्म्यान रेल्वे करण्याचा बेत पोर्टुगीज पार्लमेंटांत ठरला असें कळतें.

मुंबईस तारीख २४ मे रोजीं सरकारी टांकशाळेंत ५६,८६,४९४ रुपयांची चांदी शिलक असून पुढील आठवड्यांत ६,५३,१६८ रुपयांची चांदी आली. पैकीं ११,००,००० रुपयांचें नाणें पाडण्यांत आलें. या शिवाय खासगी व्यापाऱ्यांची १,८१,७९० रुपयांची चांदी परिक्षेकरितां शिल्लक होती.

हिंदुस्थानांत एकंदर ५७ गिरण्या आहेत. पैकीं मुंबईत ४४ व बाकी इतर इलाख्यांत.

श्री॰ तात्यासाहेब सांगलीकर यांच्याविषयीं कांहीं मजकूर बोलण्याकरितां श्री॰ पंतप्रतिनिधि औंध यांची स्वारी करवीरास गेली आहे. एका संस्थानिकाबद्दल दुसरे संस्थानिकांनीं रदबदली करण्यास प्रवृत्त होण्याचें हें पहिलेंच उदाहरण होय असें ने. ओ. चा करवीरचा बातमीदार ह्मणतो.

काशी— एथें गेल्या महिन्यांत बाबू हरिश्चंद्रजी यांच्या कन्येचा विवाहसमारंभ झाला त्यांत या बाबूनीं इकडे लग्नांत गालिप्रदानाची जी पूर्वापर निंद्य चाल चालू होती ती समूळ काढून टाकिली असें कविवचनसुधेवरून कळतें.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत रा॰ रा॰ खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुतस्क १४ | अकोला, सोमवार तारीख २८ माहे जून सन १८८० इसवी. | अंक २५

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४० |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRI-BUTORS.

*We invite the co operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

विक्रीस तयार

## कनिंघमकृत सटीक पुराव्याचा आक्ट.

अथवा,

सन १८७२ चा आक्ट १ ला व त्याच सालचा आक्ट १८ वा यावरून झालेली दुरुस्ती; उपोद्घात, समजुतीच्या टीपा, हायकोर्टांचे ठराव, व अवांतर कायदे जे मि. कार्निघम साहेब, ब्यारिस्टर व मद्रासचे आडव्होकेट जनरल यांनीं आपल्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तींत दिले आहेत त्या सर्वांचें

मराठी भाषांतर.

केवळ मराठी जाणणारांकरितां त्यांच्या परवानगीनें.

### वामन गोविंद रानडे

वकील,

कोल्हापुर व बेळगाव, यांनीं केलें

तें

पुणें एथें

"ज्ञानप्रकाश" छापखान्यांत छापलें

तारीख १७ माहे मे सन १८८०

( किंमत ७ रुपये टपाल हशील व बंगी खर्चासह ०८ आठ आणे. )

हें वरील पुस्तक बरेच दिवसांपासून तयार होत होतें तें हल्लीं तयार झालें आहे. त्यांत आक्टाची पूर्णपणें समजूत होण्यासारख्या सरळ भाषेनें लिहिलेला असा ७७ पानांचा उपोद्घात आहे. आक्ट व टीपा मिळून रायल साच्याचीं २९९ पानें आहेत. पुस्तक पाहिल्यावर त्याची योग्यता कळणारी आहे. पुस्तकें पुणें एथें "ज्ञानप्रकाश" छापखान्यांत व कोल्हापुर एथें "ज्ञानसागर" छापखान्यांत मिळतील.

## जाहिरात

सन १८७३ चा पंजाब म्युनीसपाल आक्ट नंबर १४ कलम ७ अन्वयें खामगांवांत राहणारे सर्व लोकांस हा नोटीस देण्यांत येत आहे कीं, हल्लींची घरपट्टी रद्द करून तिचे ऐवजीं "कान्सरव्हन्सी सेस" ह्मणजे "सफाई पट्टी" सर्व प्रतीचे लोकांवर एथील म्युनासिपाल कमेटी खालीं लिहिल्या प्रमाणे बसविणार आहे.

| | सालीना पट्टी बसेल ती | रु० |
|---|---|---|
| १ | ज्या मनुष्याचें घराचें भाडें वर्षांचें १२ रुपये किंवा याहून कमी असेल त्याजवर सालीना आठ आणे | ०८ |
| २ | ज्याचें घराचें सालीना भाडें १२ पासून २५ रुपयेपर्यंत असेल त्याजवर. | १ |
| ३ | ज्याचे घराचें सालीना भाडें २५ पासून५० रु.पर्यंत असेल त्याजवर | २ |
| ४ | ज्याचे घराचें सालीना भाडें ५० पासून १०० रु.पर्यंत असेल त्याजवर | ३ |

ज्याचे घराचें भाडें सालीना शंभराहून जास्त असेल त्याजवर सालीना दरशेकडे ३ तीन रुपयेप्रमाणें बसतील. परंतु कोणाही एका मनुष्यावर ६ सहा रुपयांहून अधिक पट्टी बसणार नाहीं.

सदर्हू सफाईपट्टीविरुद्ध कोणाची तक्रार असेल तर त्याणें आजपासून पंधरा दिवसांचे आंत आपली तक्रार म्युनिसिपाल कमेटीचे आफिसांत लिहून कळवावी. यापुढें कोणाची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें.

खामगाव तारीख १७ जून सन १८८० इ.

A. J. Dunlop.
व्हाइस प्रेसिडेंट
खामगाव म्युनिसिपाल कमिटी.

## नोटिस

रतनसिंग वल्लद पेमासिंग वस्ती बाळापुर अवरंगपुरा यास आनंदराव अमृत देशपांडे वस्ती बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचीं शेतें तीनें तुमचे कडेस सन १२८९ फसली पावेतो दरसाल ४५ रुपये साऱ्याप्रमाणें वहीतीस असून तुमचीं वर्षें पुरीं झाल्यें; परंतु तुमचेकडून सन १२८८ फसली सालाबद्दल रुपये ११ व सन १२८९ सालाबद्दल रुपये ४५ एकूण ५६ रु. येणें आहेत ते दिले नाहीत. हल्लीं नोटिस पोंचल्यापासून १० दिवसांचे आंत व्याजासुद्धां रुपये द्यावे न दिल्यास मुदतीचे अखेरीस आह्मी नोटिसीचे खर्चासुद्धां फिर्याद करूं तें कळावें. तारीख २४ माहे जून १८८०.

(सही) अनंदराव अमृत तर्फे कुलमुक्त्यार लक्ष्मण गोविंद.

## नोटिस

सुऱ्या वल्लद लसाजी धनगर रहाणार मौजे नांदखेड तालुके बाळापुर यास अनी मर्द सुऱ्या धनगर हल्लीं रहाणार मौजे नांदखेड इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्यास बरीच वर्षे झालीं मला कळूं लागल्यापासून माझ्याशी तूं चांगल्या रीतीनें वागत नसून वागवीतही नाहीं. कित्येक वेळा माझ्या मामानें मला तुमचे घरीं आणून घातलें, पण तुह्मी लागलीच मारठोक करून काढून देता. सबब सुमार सहा वर्षे झालीं मी तुह्मापासून वेगळी आहे तुह्मी माझी अन्नवस्त्राची सुद्धां फिकीर न ठेविल्या कारणानें मला कर्ज वाम करून निर्वाह करावा लागला तेणेंकरून आज मितीस मला दरसाल ५० रुपये प्रमाणें ३०० रुपये मला कर्ज झालें आहे. हल्लीं तुह्मास या मुद्दामें नोटिशीनें असें कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत मला झालेले तीनशें रुपये कर्ज देऊन टाकून मला तुह्मी आपले घरीं घेऊन जावें व चांगल्या रीतीनें वागवावें. अगर वागविणें नसल्यास फारकती द्यावी. वरील मुदतींत तुह्मी कांहींच केलें नाहीं तर कर्ज झालेले रुपये दिवाणींत फिर्याद करून तुह्मापासून घेईन व तुमचा लग्नाचा हक्क रद्द करून कायदेशीर रीतीनें दुसरा गंधर्वाचा घरठाव करीन हें तुह्मास कळावें तारीख १९ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) अनी मर्द सुऱ्या धनगर इचे हातची निशाणी रेघ.

## नोटिस.

हुकूमचंद हजारीमल मारवाडी दुकान जांभें तालुके अकोले नजीक मूर्तिजापुर यास हुकूमचंद गिरधारीलाल दुकान पळसो तालुके अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे आमचे रुपये ४८ अठेताळीस शिवाय व्याज आहे हे रुपये आह्मी तुह्मास दोनचार वेळा मागितले; तुह्मी देतों देतों ह्मणता पण देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्या पासून आठ दिवसांचे आंत सर्व रुपये आणून द्यावे. न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून व्याजा सुद्धां व कोर्ट खर्चा सुद्धां तुह्मा पासून रुपये भरून घेऊं या नोटिशीचाही खर्च तुह्मावरच बसेल कळावें तारीख २४ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) हुकूमचंद गिरधारीलाल दस्तुर हुकूमचंद

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### दुसऱ्याचे उपयोगीं पडणें

राजमान्य राजश्री वऱ्हाडसमाचार कर्ते यांस विनंती विशेष-महाराज या जगांत येकमेकानें एकमेकाच्या उपयोगी पडण्याची फार अवश्कता आहे. तेणेंकरून जगांत सद्गुण वाढतात. मनुष्य सर्वकाल अपूर्ण आहे. तेव्हा त्याला दुसऱ्याच्या सहायाची जरूर आहे; व या साठींच त्यानें आपल्या असल्या स्थितींत दुसऱ्यांनां सहाय केलें पाहिजे सज्जन मनुष्य दुसऱ्यास उपयोगी पडण्याविषयीं फार झटतात. व दुर्जन दुसऱ्यांचे नुकसानार्थ प्रवृत्त असतात. रानामध्यें वृक्ष असतात ते देखील उष्णानें पीडा पावलेल्या लोकांस छायेसाठीं उपयोगी पडतात. चंदन वृक्ष जो आहे तो आपणाला घासूनही घेतो पण लोकांचे उपयोगी पडतो. वृक्षांतही दुर्जन आहेत उदाहरणार्थ बाभळीचा वृक्ष. त्याविषयीं येका कवीनें असें ह्मटलें आहे:—

श्लोक.

आमूलाग्र निबध्ध कंटक तरुः
पुष्पं न सौगंधिकं,
छाया न श्रमहारिणी नहि फलं
क्षुत्क्षामसंतर्पणं ॥
रे रे बब्बुल साधुसंगरहितो
त्वत्तो धमो ना परो,
अन्येषा मपि शाखिनां फलवतां
गुप्तप्रदो जायसे ॥ १ ॥

अर्थ— हे बाभळीच्या वृक्षा, तूं कसा आहेस ? मुळापासून शेंड्या पर्यंत कांट्यांनीं भरलेला, तुला फुलें आहेत पण त्यास कांहीं सुगंध आहे काय ? नाहीं. तुझ्या छायेला कोणी येऊन बसलें तर त्याचें श्रमहरण होत नाहीं. तुझ्या फलांनीं ह्मणजे शेंगानीं कोणा मनुष्याची क्षुधा हरण होत नाहीं. याप्रमाणें तू साधुसंगरहित आहेस आणि याशिवाय तुजमध्यें एक अधमपणा असा आहे कीं दुसऱ्या फलद्रूप झाडाकडे कोणी गेला असतां गुप्तरूपानें तूं तेथें असतोस, ह्मणजे तेथें तुझे कांटे दुसऱ्याचे पायास बोंचावयास सिद्ध असतात.

दुर्जनाची गोष्ट अशी आहे याजकरितां मनुष्यमात्रानीं हें उदाहरण लक्षांत घेऊन सज्जन होण्या विषयीं तत्पर असावें. कळावें लोभ करावा हे विनंती

एक
वाचक.

रा रा वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. मोपच्या डाक्याविषयीं—

पोलिसचे जे लोक माग लावित गेले ते सेवलीच्या जवळ तीन कोसांवर एक गांव आहे त्या गावीं आहेत. तेथें दरवडे खोरांचा मुख्य मारवाडी ब्राह्मण रहात असतो त्यानें पोटाकरितां डाका घातला ह्मणून सांगितलें १८ इसमांपैकीं ८ धरले आहेत; पैकीं ज्यांस जखमा लागल्या होत्या ते कबूल आहेत बाकीचे लोक सांपडले नाहींत त्यांचि तपासांत पोलिस मोठें तत्पर आहे. वशीम डिस्पेनसरीमध्यें जखमी डाकेखोर होता तो हल्लीं बरा होत चालला आहे. गेलेल्या मालां पैकीं

कांहीं मार्गांत सांपडला. हल्लीं रात्रीं घोंडे गावात येत असतात ह्मणून पोलिसचा शिपाई बंदोबस्तास आहे.

सोमयाग— वाशिमास दोन यज्ञ झाले पैकीं एक पशुयज्ञ झाला. त्याचा प्रारंभ वैशाखी पौर्णिमेस होऊन पांचवे दिवशीं समाप्ती झाली. यज्ञास ३ बोकड होते, व काशीचे ११ ब्राह्मण निमंत्रण गेल्यावरून आले होते, तिसरे दिवशीं दोन बोकडांचा वध होऊन शेवटील दिवशीं एकाचा झाला. यज्ञकर्ते हरभट अग्निहोत्री यांनीं अन्नदान २ संतर्पणाचें केलें. परंतु या यज्ञामुळें कांहीं लोक चर्चा करितात कीं प्राचीन काळीं ब्राह्मण पशु वध करून सजीव करीत हल्लीं सजीव होत नाहीं. शास्त्री वगैरे मंडळीस विचारतां कोणी करावा व कोणी करूं नये असें ह्मणतात पूर्वीं कोणत्यां ब्राह्मणानें पशू सजीव केला त्याचें उत्तर भरवसेलायक मिळत नाहीं पूर्वींचे पशूही बोलत असत अशा अनेक कथा आहेत. प्राचीन काळाप्रमाणें ब्राह्मणांचें सामर्थ्य नसेल तर यज्ञोपवीत धारण करण्याचें सामर्थ्य आहे काय? वाचक मंडळीपैकीं ह्याचें विवेचन करून सांप्रत सोमयाग व्हावेत कीं नाहीं हें कळविलें असतां आभार होतील.

वाकदचा तलाव— वाकद तालुके वाशीम एथील लोकांचे सांगण्यावरून कळतें कीं त्या तलावास संभूगीर गोसावी बाळखेडकर यांनीं आपले सुमारें १००० हजार रुपयांचे रोखे सरकारास दिले. सरकारानीं त्यापैकीं २५५३८१४ वसूल करून तलावास एका बाजूंनें मातीची पाळ बांधली आहे. परंतु सालमजकुरी तिची दुरुस्ती न झाल्यावरून फार खराब झाली आहे. २।३ वर्षांनीं नावाचें तळें राहील असें वाटतें. हें काम सरकाराशिवाय व्हावयाचें नाहीं. राहिलेला पैसा वसूल करून त्याचा व्यय दुरुस्तीकडे व आंतील माती काढण्याकडे केल्यास सरकारची मेहेरबानी होईल. कळावें. तारीख १६ माहे जून सन १८८० इसवी.

एक 'क्ष.'

---

## वऱ्हाडसमाचार.

---

मिति ज्येष्ठ वद्य ६ शके १८०२

---

## पंढरपुर.

सोलापुर जिल्ह्यांत भीमा नदीचे काठीं पंढरपुर हा गाव आहे. हें श्री विठोबाचें स्थान. पुराणांतरीं याविषयीं पुण्यप्रद लेख बहुत आहेत व पंढरी महात्म ह्मणूनही एक प्राकृत ग्रंथ आहे त्यांत या देवाचें महात्म, क्षेत्रमहात्म व इतर गोष्टी यांविषयीं पुष्कळ सांगितलें आहे.

पुराणांतील भाग बाजूस ठेवून इतिहासांतील माहिती पाहूं गेलें तर मुसलमानी बादशाही अमलांत या देवाचें महात्म कितपत होतें त्याविषयीं बरोबर कांहीं कळत नाहीं, तथापि तुकाराम, नामदेव, ज्ञानेश्वर या विठ्ठल भक्तांच्या कथा त्या काळच्या आहेत त्यांवरून त्या काळींही हें संस्थान अप्रसिद्ध नव्हतें व बादशाही कारकीर्दींतिल्हीही श्रीविठोबास कांहीं देणग्या आहेत असें ऐकण्यांत आलें आहे. शिवाजी महाराजाचे कारकीर्दींतीलही कांहीं माहिती आह्मांस मिळाली नाहीं तरी त्यांचे वंशज सातारच्या गादीचे अधिकारी यांजकडून विठ्ठलास पुष्कळ नेमणूक होती व त्यांतून अजून कांहीं चालू आहे असें समजतें. सातारचे मराठी राज्याच्या वेळेस पंढरपुर पेटा त्यांच्याच अमलांत होता व ती अलीकडेच सातार जिल्ह्याखालून निघाला आहे. पेशवाई अमलांत अखेर अखेर पंढरपुरची पुष्कळ चलती झाली. शेवटचे बाजिराव पेशवे प्रतिवर्षीं विठ्ठलदर्शनास जात असत व त्यावेळीं तेथें बरेच मुक्काम करीत. त्यांनीं देवास पुष्कळ देणग्या दिल्या आहेत. व श्रीमंताचे स्वारी बरोबर शिंदे, होळकर, गायकवाड यांच्याही स्वाऱ्या पंढरपुरास जाईत. तेव्हां यांनींही तेथें आपले वाडे बांधिले, देवास देणग्या दिल्या, व अन्नछत्रें घातलीं तीं अजून चालू आहेत. हा राजकीय प्रकार झाला. पण त्या सुमारास व तेव्हांपासून अलीकडे श्री विठ्ठलाविषयीं राष्ट्रांतील लोकांचीही भक्ती अतोनात वाढत चालली. प्रति आषाढी व कार्तिकी एकादशीस लाख लाख पर्यंत यात्रा तेथें जमते. रेल्वे नव्हती तेव्हांपासूनही दोन दोनशे तीन तीनशे कोसांवरून बैल गाडीनें, घोड्यानें व पायांनींही भाविक जत्रा पंढरपुरास जात असे व आतां तर बहुत ठिकाणांहून रेल्वेची उत्तम सोय झाली आहे त्यामुळें यात्रा हौसेनें जाते.

पंढरपुरास भूवैकुंठ ह्मटलें आहे. खरेंच तेथें विठ्ठलाची रमणीय मूर्ति, सुंदर व भव्य देवालय, लक्षावधि भक्तांची दाटी, आणि नामघोषाचा गजर हा थाट पाहिला ह्मणजे कवीस असें वाटणें कांहीं असाधारण नाहीं या जगीक संपत्तीच्याही दृष्टीनें पाहिलें असतां श्री विठ्ठलासारखें श्रीमान दैवत दुसरें थोडेंच असेल विठ्ठलास कोट्यावधि रुपयांचे अलंकार आहेत-त्यास कोणी घोंगडी समर्पण केली आहे तिला मोठमोठाल्लीं मोत्यें आहेत व तिची किंमत लक्षावधि रुपये आहे. असें अनेक परीचे इतर दागिने आहेत. चांदीचीं भांडीं मोटमोठाल्या समयी, घागरी, गंगाळ वगैरे आहेत. पूजा दिवसांतून किती वेळां होतात, नैवेद्य किती येतात, व शेज आर्ती, काकड आर्ती, पाद्यपूजा, पंचामृतपूजा वगैरे समारंभ दिवसांतून किती होतात त्यांची गणती नाहीं. असा हा देवाचा थाट पाहून मनास मोठा संतोष वाटतो.

आतां दुसरीकडे नजर दिली तर मोठा अचंबा वाटतो. देवाचे लाखो रुपयांचे दागिने पण ते देवावर पाहावयाचें मनांत आणिलें तर ते एके ठिकाणीं नाहींत. शंभर बडव्यांकडे शंभर दागिने त्यांची मिळवा मिळव करावी लागते. बडव्यांनीं देवास ग्रासून टाकिलें आहे. त्याच्या दागिन्याची दुर्दशा, सामान सुमानाची वाताहत, एवढेंच नाहीं पण देवापुढच्या नित्य दक्षिणेचा देखील बडवे लोक लिलाव करून मक्ता देतात याहून त्यांच्या अप्रतिष्ठेची गोष्ट काय सांगावी? बडव्यांचा देव ऋणी आहे, शेकडो बडवे देवाचे योगानें मोठे श्रीमान झालेले आहेत, तथापि त्यांची देवाचेठायीं मोठीशी निष्ठा आहे व ते मोठे भगवद्भक्त आहेत असें दिसत नाहीं. मक्तेदारास फसविण्याचें त्यांचें एक उदाहरण पहाण्यांत आलें. एका यजमानास देवापुढें ४ रुपये ठेवावयाचे होते हें बडव्यास कळतांच ते देवापुढें न ठेवितां संकल्पून घरीं आमचे हातावर द्यावे ह्मणजे देवास पावतील असें बडवे ह्मणाले. यजमानानें ही गोष्ट कबूल केली नाहीं व देवापुढेंच दक्षिणा ठेवावयाचा त्याचा निश्चय दिसला तेव्हां ते ह्मणाले कीं आह्मी आपले पदरचे तुह्मास पैसे देतो त्यांतून प्रथम एक तुह्मी देवापुढें ठेवावा व एक ओंवाळून टाकावा नंतर आह्मी कापुर लावून देवास ओंवाळितो तेव्हां तुह्मी रुपये देवापुढें ठेवावे ह्मणजे ते मक्तेदारास न मिळतां आह्मांस मिळतील. पुढें बडव्याच्या अत्याग्रहासाठीं यजमानास तसें करावें लागलें.

अलीकडे श्री विठ्ठलाची पंचामृत पूजा बंद झाल्यासारखी झाली आहे. बहुधा सर्व मूर्तीस अभिषेक करूं देत नाहींत पाद्यपूजा ह्मणजे पायांवर अभिषेक करावा असें सांगतात. त्या बाबदींत बडव्यांचा व दुसरे कोणाचा वाद आहे असें कारण सांगतात व थोड्या वर्षांमागें मूर्तीचा भंग झाला आहे तें व्यंग न दिसावें हेंही एक कारण असल्याचें कोणी सांगतात, तथापि बरीच प्राप्ती होण्याचा सुमार असला तर पंचामृत पूजाही होते असें समजलें आहे. असो. हे सर्व मध्यस्थांचे व खटपटीचे प्रकार आहेत. बाकी देवाचे ठिकाणीं कांहीं नाहीं. तो अष्टौप्रहर भक्तांस दर्शन देण्यासाठीं राउळीं कंबरेवर हात ठेवून उभा आहे. पाहिजे त्यानें डोळे भरून त्याचें दर्शन घ्यावें व त्यांत कृतकृत्य व्हावें त्याच्या दर्शनास मध्यस्थ नको, कांहीं वायन नको, गोप्रदान नको, तीर्थविधी नको, कांहीं नको, ब्राह्मण, शूद्र, तेली, माळी, स्त्रिया, मुलें सर्वांस प्रीतीची भेट देण्यास तो सज्ज आहे.

पंढरपुरास म्युनिसिप्यालिटी आहे व तिचें उत्पन्न चांगलें आहे. त्यांतून शहरसुधारणा हल्लीं चांगली झालेली आहे. गावांत पाण्याचे नळ आणिले आहेत. तेणेंकरून घोड्यांवरील व बैलांवरील माकणी किंवा लगडी आतां पेनशनास लागल्या. स्वच्छता चांगली झाली आहे. सडका बऱ्याच झाल्या आहेत. देवालयांतही सुधारणा व सोय चांगली झाली आहे. लहान दरवाजे काढून मोठे केले. गाभाऱ्यांत दरवाजे नव्हते तेणेंकरून यात्रेकरूंचा कोंडमारा होई व हवा बिघडून जाई तेथें आतां नवीन दरवाजे पाडून आंत ही हवा खेळती केली आहे. त्या योगानें रोगाचें प्राबल्य कमी होऊन आषाढी कार्तिकींत दाटी कमी होण्याची सोय झाली आहे. राव साहेब उमियाशंकर लालशंकर यांचे प्रयत्नानें तेथें एक अनाथ गृह स्थापन झालें आहे. व त्यासाठीं हजारो रुपयांची बाहेरून मदत झाली आहे. आणि श्री विठ्ठल कृपेनें तो कारखाना सुरळीत चालो असें सर्व शुभेच्छु इच्छितात.

---

Natives of India may now be appointed to the covenanted Civil Service as members of the Presidency to which they belong. They may also be appointed to an office in the Covenant Civil Service upon the ground of proved merit and abilitiy or professional attainments on recommendation of the Local Government. Their salary will be nearly ⅔ of what it would be if the office were held by a Covenant Civil Service appointed in England. These appointments will not be conferred on individuals who have attained the age of 55 years.

The pension of a Native Civil Servant is not to exceed 5 or 6000 a year after an active service of 25 or 30 years.

Retiring pension of 25 years service to be half of average salary.

Invalid pension of 10 years service to be Rs. 1500 a year plus Rs. 150 for each complete year of service in excess of ten.

Superannuation pension is the same as Invalid pension.

These rules create an opening to members of the Uncovenanted Civil Service for admission to the Covenanted Civil Service rank; but beyond a description of "proved merit and ability" no succinct instructions have been laid down whereby candidates may aspire to be admitted. If it be that the examination which qualifies for the Covenante Civil Service rank will be the invariable test, the policy will be an equitable one.

The pension rules of the C. C. S. have one great benefit; and that is, the opportunity offorded to gain a pension after an active service of ten years, and a proportionate increase according to service beyond ten. This is a privilege which is denied to the uncovenanted. We would strongly advocate the same benefit being extended to the latter class; it will only be dividing the "loaves and fishes" impartially. We are glad to notice a relaxation in the pension rules soothing the rigidity of the present ones, even though made applicable to the Covenanted class. The hardship so frequently endured by many, in being deprived of a half pension after an active service of 24 years is very great; the only alternative being the ⅓ pension; a proportionate increase would certainly ameliorate their condition and make service under government more attractive.

---

✝ It will give our readers pleasure to know that the daughters of Mr. Ganendro Mohun Tagore were presented to Her Majesty the Queen at a Drawing Room held on the 11th May at Buckingham palace, on which occasion by the special command of Her Majesty, they wore their national costume which was prepared by English milliners. Our Calcutta

brethren have apparently determined to take the lead in all matters tending to enhance the dignity of the Indians.

---

The Uncovenanted service Family Pension fund weich has existed for about 42 years with ever increasing prosperity now stands with a capital of 64 Lacs. At a meeting of the members held in February. 79 a question of vital importance was controverted in regard to modifyng the existing Rule 50. the object of which was "that incombents on the fund shall be paid "their annuities in London at the "market rate of exchange" instead of at 2 shillings in the Rupee. The proposition had been submitted for the votes of the general body and the result of the voting is 553 for the amendment to 505 against. Simple as this subject may appear, a glance at the reports will show the loss in exchange that has be fallen the fund to be so enormous as to have aroused the feeling of the general body to a sense of the threatening failure of the fund by ever increasing losses. The contest has been between the Indian subscribers and the European.

---

The incomplete information placed at our disposal, in regard to the Ellichpur Post office case before we went to press last week led us to certain inaccuracies in regard to the details of the case and we take the earliest opportunity, in the cause of fairness and accuracy, to rectify the matter by giving an account of the facts as given in one of the Bombay papers: —

"The night of the 5th instant, "between 12 and 2 o'clock, the "post office of Ellichpur was broken intoand Government money "to the extent of Rs. 3,000 stolen. "The thieves first broke into the "Post Master's house, took some "articles of Jewellery, and having "hit upon the office keys, evident "ly made the best of their time. "The Inspector of police and a "European chief constable's houses "are within a stones throw of the "place. The Post Master, Mr. "Gannon, and several members of "his family were sleeping in the "backyard, owing to the heat. The "Post Master's quarters are a "portion of the Post Office building. No trace of the thief or "thieves has yet been found."

Our sympathies are with Mr. Gannon, and we hope he will not be victimised for neglect of his charge. It is supposed that the system of the working of the Money Order offices has opened a door for temptation to burglars; and if so, it would be unfair to cast the onus on Mr. Gannon, of replacing the money stolen.

---

Mahomed Raza Deputy Inspector of Mahomedan schools Madras is appointed to officiate as an attache to the Resident a Hyderabad vice Mr. Edulje Bymanjee Dustoor, with effect from date of assuming charge.

---

The Queen has approved of the retirement from service of Major R. H. Hudleston from the 21st March 1880. He retires with an honorary rank of Lieutenant Colonel.

## वऱ्हाड.

मे० मोन्स साहेब हैदराबादेहून काल निघणार होते. कोणी असें ह्मणतात कीं हिंदुस्थान सरकारच्या सेक्रटरीची जागा त्यांस मिळणार व ते सिमल्याकडे गेले. आह्मांस या वार्तेविषयीं विश्वसनीय कांहीं कळलें नाहीं.

---

कर्नल बेल साहेब कमिशनर चिखलदऱ्याहून निघून उमरावतीकडून एथें आले.

---

कर्नल बुशबी साहेब जुडिशियल कमिशनर येथें येऊन परवा बुल्ढाण्यास सेशना करितां गेले.

---

मे. दस्तुर बहीमनजी साहेब सी. आय. इ. यानीं १० दिवसांची रजा वाढविली आहे ती प्रमाणे ते परवा येतील.

---

मि. दस्तुर एदलजी साहेब असिस्टंट कमिशनर यांस खडगाव कोर्टास काम फार असल्यामुळें मदतीकरितां अकोटास पाठविलें व त्या प्रमाणें ते तिकडे गेले.

---

बुल्ढाण्याचे क्लार्क आफ कोर्ट मि. एदलजी जमशेटजी यांनीं अडीच महिन्यांची रजा घेतली त्यांचे जागेवर इलिचपूरचे डिपुटीक्लार्क रा. रा. गणेश बापुजी यांस नेमिलें व ते तिकडे गेले.

---

इलिचपूरचे क्लार्क आफ कोर्ट रा.रा. वासुदेव सदाशिव पिंसोळकर यांनीं दोन महिन्यांची रजा घेतली. त्यांचे जागेवर येथील डिपुटीक्लार्क रा. रा. बळवंत राजाराम कावळे यांस नेमिलें.

---

इलिचपुरचे डिपुटीक्लार्कचे जागेवर रा. रा. दामोदर नानाजी सिंदेकर यांस नेमणार असें वर्तमान आहे. अकोल्यास कशी व्यवस्था करणार तें अजून समजलें नाहीं.

---

अकोटचे रा. रा. खुशालराव गणेश देशपांडे येथील रा. रा. गोपाळरावजी वकील यांचे तीर्थरूप आजारी होते ते मरण पावले.

---

मि. दस्तुर एदलजी साहेब यांस एक महिन्याची हक्काची रजा मिळालेली असून पुढें त्यानीं डाक्टरचें सर्टिफिकेट पाठवून एक महिन्याची आजारीपणाची रजा मागितली त्या प्रमाणें ती त्यांस मिळाली परंतु रजेच्या कायद्याप्रमाणें पहिली व ती अशा दोन्हीही रजा आजारीपणाच्या समजल्या जाव्या असें ठरलें.

---

बाळापुरचे बनसीलाल छबिल्दास अफूचे पेटमक्तेदार यानीं बाळापुर व पारस या दोन गावीं किरकोळ अफूविक्रीचा मक्ता घेतलेला असून रूळाप्रमाणें त्यानीं हिशेब ठेविले नव्हते. सबब त्यांचें बाळापुरें एथील दुकान सरकारानें जप्त केलें आहे. हा मजकूर लोकांचे माहितीकरितां मे० डिपुटी कमिशनर साहेब यांणीं आह्मास कळविला आहे.

---

इलिचपुर तालुक्यांतील एका पाटलानें एका महारास काठी मारिली व तेणेंकरून तो महार मरण पावला असें समजतें.

---

उमरावतीच्या स्माल्काज कोर्टाचें काम पूर्वीप्रमाणें रा. रा. श्रीकृष्ण नरहर यांजकडेच तूर्त दिलें आहे.

---

चांदूर तालुक्यांत मंगरूळ दस्तगीर एथें नवीन पोस्ट आफिस सुरूं झालें आहे:

---

उमरावती जिल्ह्यांत एका शूद्र स्त्रीनें नवरा निवंत असतां व त्याची संमती घेतल्यावाचून पाटाचा दुसरा नवरा केला त्यानबद्दल नवऱ्याचे फिर्यादीवरून त्या स्त्रीला ६ महिन्यांची व पाटाच्या नवऱ्याला २ वर्षांची कैद व दोन दोन शें रुपये दंड अशी शिक्षा झाली. व याकामांत एक मध्यस्थ होता. त्याला ही दोन वर्षांची कैद आणि १०० रुपये दंड अशी शिक्षा झाली. वऱ्हाडांत हीं अशीं प्रकरणें फार होत असतात. स्त्रीपुरुषांचें पटत नसलें ह्मणजे त्या स्त्रीला दुसरे लोक फंद देऊन वर्तमानपत्रांतून नोटिस देववितात व तींत कांहीं शर्ती लिहितात. त्या शर्तीप्रमाणें नवरा वागला नाहीं किंवा त्यानें नोटिशीचा जवाब दिला नाहीं ह्मणजे आपलें कार्य झालें असें त्या स्त्रीस भासवून तिजकडून पाटाचा दुसरा नवरा करवितात. कायद्याचें अज्ञान असल्यामुळें व स्त्रीकडील बाजू जोरावर असल्यामुळें गरीब नवरे कधीं कधीं स्वस्थ बसतात. आणि कोणास चांगला सल्लागार मिळाला ह्मणजे वर लिहिल्याप्रमाणें मुकदमे होऊन शिक्षा होतात. यासाठीं लोकांस आमचें सांगणें आहे कीं, नवऱ्याची कायदेशीर संमती अथवा फारकती घेतल्यावाचून नुसत्या स्त्रीच्या नोटिशीवरच तिचा पाट लावून देणें हें भयंकर व गुन्ह्याचें काम आहे.

---

पोष्टाकडील मनी आर्डरचे रुपये घेऊन पावती द्यावी लागते तिला स्टांप पाहिजे कीं काय असा संशय उत्पन्न झाल्यावरून हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे कीं, कितीही रकमेची पावती असली तरी तिला स्टांपाची जरूर नाहीं.

---

सिकंदराबादचे असिस्टंट कमिशनर ले० कर्नल मेन साहेब यांनी रजा घेतली त्या नेमणुकींत मि. किट्स साहेब एथील असिस्टंट कमिशनर आफिशियेटिंग सेकंड क्लास होते ते आफिशियेटिंग फर्स्ट क्लास झाले तसेच मे. दस्तुर बाहिमनजी साहेबाचे रजेंत मि. हेर साहेब आफिशियेटिंग सेकंड क्लास असलेले आफि. फर्स्ट क्लास झाले आहेत.

---

मि. बेंटली ब्यांकेचे एजंट यांस उमरावती म्युनिसिप्यालिटींत मेंबर नेमिलें.

---

अकोल्याहून नाटक जाऊन थोडेच दिवस झाले तों तासगावकर नाटकाचे म्यानेजर रा. रा. लक्ष्मणराव हे आपली मंडळी घेऊन प्रस्तुत एथें आले आहेत. शनिवारीं रात्रीं त्यानीं प्रमिला स्वयंवर व स्त्रीचातुर्यांतील विक्रमचरित्र हा खेळ केला.

---

निजाम स्टेट रेल्वेवरून एप्रिल महिन्यांत ९१३० टन माल गेला व त्याजबद्दल उत्पन्न ३०१०६ रुपये झाले.

---

अकोल्यास गाव्यांत किल्यावर तोफ ठेविली आहे ती प्रत्यहीं दिवसां १२ वाजतां उडवितात पण तिचा आवाज आरंभीं ऐकूं येत असे तसा आतां चांगला ऐकूं येत नाहीं असा बोभाट आहे. किल्यावर तोफ आणण्याचा हेतू चोहोकडे स्पष्ट आवाज ऐकूं यावा हा असून त्यांत काय व्यंग झालें आहे तें समजत नाहीं.

---

येथील नाजर मि० शापुरजी हे बोरगावचे गोसाव्याचे दुकानची वाहिवाट पाहात होते व त्यासाठीं त्यांना दरमहा ६० रुपये पगार होता. ते त्यांकडील काम २४ वे तारिखेस संपलें परंतु सदरहू दुकानदारानीं आणखी १९ दिवस नाजर यांस आमचें काम पाहूं द्यावें असा अर्ज केला आहे. तसेंच नाजर यांणीं आपलें दुकान फार उत्तम रीतीनें चालविलें व सुयंत्र व्यवस्था लाविली या. संतोषकारक गोष्टीबद्दल त्यांस २२०० रुपये बक्षिस देण्यास परवानगी द्यावी असा डि० कमिशनर साहेबाकडे अर्ज दिला व त्यास परवानगी मिळाली असें एकतों.

---

मृगाचा पाऊस अगदींच पडला नाहीं पण आर्द्रा लागल्या आणि ग्रहण झालें तेव्हांपासून इकडे पावसाची सुरवात झाली आहे. मोठासा अजून पडला नाहीं पण लहान लहान सरी येऊन पडती भावना झाली आहे. व हवेंत बदल होऊन, पुष्कळ थंडावा आला आहे.

---

अकोल्याचे स्टेशनावर लोकल फंडाकडून बांधलेली एक मोठी सराई आहे. व तेथें हमेशा पुष्कळ उतारकरू असतात. ते बाहेरील पडव्यांत उतरले असतां दर माणशीं दर रोज एक पैसा भाडें घेण्याची आजपर्यंत वहिवाट होती ती मे० फिटझरल्ड साहेब डिपुटी कमिशनर यांनी लोकसुखार्थ बंद केली आतां भाडें पडणार नाहीं. खोल्यांतून जे थोर गृहस्थ उतरतील त्यांस मात्र पूर्वी प्रमाणें प्रति दिवशीं च्यार आणे भाडें द्यावें लागेल. गरीब लोकांकरितां डिपुटी कमिशनर साहेबानीं ही उत्तम तजवीज केली.

---

मे० सयद नुरूद्दीन महमद खान कर्नोळकर रेसिडेंट साहेबाचे अस्त्यांची यांस एक महिन्याची रजा मिळाली.

---

मि० शेख अबदुल करीम उमरावती जेल कडील थर्ड क्लास आस्पिटल असिस्टंट यांनीं ३ महिन्यांची सिक रजा घेतली. व त्यांचें काम सिव्हिल आस्पिटलकडील आसि. मि० इनक सादक यांनी करावें असें ठरलें.

---

## वर्तमानसार.

पुणेहेरल्ड नावाचें पुण्याचें वर्तमानपत्र बंद झालें. रा. रा. रावजी प्रभाकर भावे हे त्या पत्राचे पुढारी होते त्यांस इंदापुरास नवीन मुनमफ कोर्टांत क्लार्क आफ कोर्टची जागा मिळून ते तिकडे गेले त्यामुळें असें झालें असावें.

मुंबईचे पोलिस कमिशनर सर फ्रांक सूटर यांनीं एक महिन्याची रजा घेतली.

मनिआर्डरचें काम टपाल खात्याकडे गेल्यापासून गेल्या जानेवारी तागाईत सवा दोन महिन्यांत ६४ लक्ष रुपयांच्या मनिऑर्डरी झाल्या. व सरकारास त्याजबद्दल ९०००० रुपये कमिशन मिळालें.

रत्नागिरी जिल्ह्यात केळशी गावीं कोल्ही व कुत्रीं फार पिसाळलीं आहेत सोटा हातात असल्याशिवाय घराबाहेर पडण्याची कोणाची सोय नाहीं. घरांतही तीं बेधडक शिरतात व बायकांस इजा देतात १९।२० दिवसांत १०।३९ मनुष्यें जायां झालीं आहेत असें पुणेवैभवांत एक पत्र असल्यावरून समजतें.

पुण्यास एकविसावे तारखेस प्रदर्शनाची सुरवात झाली.

एफ ए किंवा लिटल्गो असें ज्या परीक्षेस नाव आहे तिचें तें नाव बदलून प्रीव्हियस एक्झामिनेशन असें नाव देण्यांचा ठराव झाला.

मद्रासेस सरकारी इमारती व कामदार यांजवरील म्युनिसिपल कर कमी होण्याविषयीं ठराव होत आहे तसें झाल्यानें म्युनिसिप्यालिटीचें सालीना ६१००० रु.चें उत्पन्न कमी होईल.

लॉर्ड लिटन साहेब माजी गवरनर जनरल २९वे तारखेस सिमल्याहून निघून मुंबईस येतील व तिसरे तारखेस ऑगष्टांत बसून विलायेतस जातील. येते वेळीं त्यांनां जो मान मिळाला आहे तोच जातांनां द्यावा असें नवीन ग. ज. साहेबानीं ठरविलें आहे. इंदूरचे होळकर सरकारांनीं खांडव्याचे स्टेशनावर आह्मी आपली परवानगी असल्यास आपणास भेटू असें लॉर्ड लिटन साहेबास विचारिलें होतें त्या अगत्याबद्दल त्यांनीं त्यांचे आभार मानून त्यांस असें कळविलें कीं आह्मी प्रस्तुत अधिकार सोडिला आहे सबब भेटीचें आतां कारण राहिलें नाहीं. व भेट घेणें वाजवी नाहीं. दुसऱ्याही कित्येक राजांस याचप्रमाणें त्यांनीं कळविल्याचें समजतें.

मि. लायल साहेब हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी लवकरच विलायतेस जाणार आहेत.

पुण्यास म्युनिसिप्यालिटींत कमिशनर नेमण्याचा हक्क लोकांस मिळावा अशा साठीं सार्वजनिक सभेनें अर्जाची खटपट चालविली आहे.

तुर्कस्थानचे दरबारी असलेल्या युरोपियन राजवकिलानीं आर्मिनीया प्रांतांत जल्द सुधारणा करण्याविषयीं कळविलें आहे.

नारू बरा होण्याचें औषध— हलक्या साबणाची एक वडी बारीक करून तींत अर्धापाव पाणी व थोडी सवागी घालून शिजवावी. नंतर त्याचा लेप नारूच्या तोंडावर करून कपड्याची पट्टी बांधावी व तीन दिवस पर्यंत न सोडतां तसाच ठेवावा ह्मणजे नारू मरून बाहेर पडतो व एकदम आराम वाटतो. हा उपचार फोड फुटल्यावर करण्याचा आहे. सदरील औषध एक पत्रांत प्रसिद्ध झालें आहे तें लोकोपयोगाचें असल्या कारणानें आह्मी येथें दिलें आहे. लोकांनीं याचा अनुभव घेऊन कसा काय गुण येतो तो पहावा.

मि. ग्लाडस्टन यानीं एक रात्रीं कामन्स सभेंत प्रश्नास जबाब देतांना असें सांगितलें कीं, तुर्कस्थान व राशिया मुसलमान व ख्रिश्चन यांपैकीं कोणाचाही पक्ष न धरतां निष्पक्षपातानें बर्लीन तहनामा अमलांत आणण्याचा ब्रिटिश सरकारानें ठराव केला आहे.

मुंबई इलाख्या पैकीं कांहीं जिल्ह्यांत दुष्काळामुळें जमीन बाबीची जी बाकी थकली होती, ती सरकारानें रयतेस सूट दिली ही गोष्ट आह्मी मागें कळविलीच आहे. हल्लीं या विषयाचे संबंधानें असें कळतें कीं, ही १५ लक्ष रुपयांची सूट घालण्या बद्दल जिल्हा जिल्ह्याचे कलेक्टरांनीं नामदार टेंपल साहेबांचे कारकीर्दींत फारच सक्तीनें रिपोर्ट केले होते. व ह्या थकलेल्या बाकी पैकीं एक पैही वसूल होण्याची आशा धरणें योग्य नाहीं असें सरकारास स्पष्ट रीतीनें जाहीर केलें होतें. जिल्हानिहाय कलेक्टरांचे वरील अभिप्रायांस कमिशनर व कौन्सिलदार यांचेही मोठें पाठबळ मिळालें होतें. व अशा स्थितींत नामदार टेंपल साहेबांसारख्या अभिमानी राज्यकर्त्यासही आपला पूर्वीचा अभिप्राय सोडून देणें भाग झालें व अखेरीस सूट देण्याचा ठराव झाला. वर लिहिल्या प्रमाणें नामदार टेंपल साहेबांचे कारकीर्दींत च ह्या थकलेल्या बाकीबद्दल उलट सुलट जमाखर्च करण्याची सर्व तयारी झाली असून ही गोष्ट नेकनामदार सर जेम्स फरग्युसन साहेब यांचे कारकीर्दींत अमलांत मात्र आली. ज्ञा. च.

घोड्यावर बसण्यांत पटाईत सर रिचर्ड टेंपल एवढेच नसून त्यांच्यावर जास्त पटाईत गृहस्थ सर गार्नेट वुल्स्लि हे आहेत. हे गृहस्थ १७० कोस जमीन तीन दिवसांत घोड्यावर बसून चालून गेले. यांची नेमणूक हिंदुस्थानच्या कम्यांडर इन चीफच्या जागीं होणार असून ते इकडे आले ह्मणजे सर रिचर्ड सारख्या मराठ्या मारतील असें एक इंग्रजी पत्रकर्ता लिहितो.

सिंदेसरकार एक कागदाचा कारखाना काढणार आहेत असें ऐकिवांत येतें. आजपर्यंत ह्या महाराजास फौजेचा मोठा शोक असे पण त्यांत कांहींच अर्थ नाहीं अशी यांची खात्री झाल्यामुळें आतां यांनीं आपलें चित्त व्यापारांत घातलें असून तें त्यांचे करणें वेळेच्या मानानें योग्यही आहे यांत शंका नाहीं.

आबिसिनियांतील लढाई सात महिने चालली असून त्यांत फक्त १०००० लोक गुंतलेले होते, तथापि त्यांस एकंदर खर्च सुमारें १४ कोट रुपये लागला. आफगाणिस्थानांतील लढाइ आज सुमारें १८ महिन्यांवर चालली असून त्यांत ६०,००० लोक गुंतले गेले आहेत तथापि ह्या लढाईस फक्त सुमारें ६।७ कोटी रुपयेच खर्च झाला असें बाहेर आलें आहे. अशा घबाड फरकामुळें आफगाण लढाईच्या खर्चांत कांहीं तरी आंत बाहेर आहे असें विलायत सरकारचें अनुमान असून तें खरेंही असावें असें वाटतें.

ऐंग्लंडांत मुख्य ४ असामी पैसेवाले असून त्यांतील जो अगदीं भिकारी आहे त्याचें फक्त व्याजाचें उत्पन्न दर मिनिटास सुमारें १५ रु. आहे ! व सर्वांत जास्त श्रीमंत आहे त्याचे दर मिनिटास सुमारें ५० रुपये आहे. यांपैकीं माकी नावाचा जो मनुष्य आहे तो सुमारें ३० वर्षांपूर्वीं अगदीं भिकारी होता. उद्योगाचें फळ असेंच आहे.

मजबूत पेनशनर लोक पलटणींत नोकरीस ठेवावयाचे त्यास जे लोक रहाण्यास कबूल असतील त्यांस पेनशन शिवाय भरपूर पगार मिळोन ड्रेसाचे कपडेही मोफत दिले जातील व शिवाय कांहीं रकम इनामही देण्यांत येईल. पु. वै.

## दुःखामध्यें समाधान.

जेव्हां जेव्हां मानवाचें अंतःकरण मृत्यूनें केलेला नाश पाहून दुःखित होऊन जातें तेव्हां तेव्हां ते शोक करून असें आपणांस दुःख कां व्हावें, संबंधी इष्ट मित्र इत्यादिकांमध्यें मृत्यूनें कां वियोग पाडावा, असा प्रश्न करितात. हा क्रम युगानुयुगें चालत आला आहे. परंतु मृत्यू त्यांच्या अश्रूंनां, त्यांच्या विलापांनां, किंवा त्यांच्या प्रश्नाला न जुमानतां आपलें काम सतत करीत चालला आहे. त्यांच्या प्रश्नामध्यें हा अर्थ गर्भित असतो कीं आह्मांस सध्या या जगामध्यें जितकें सुख मिळतें त्याच्यापेक्षां अधिक मिळालें पाहिजे. त्याचें उत्तर अजून मिळालें नाहीं आणि जगाची आहे अशीच स्थिति कां असावी याचीं कारणें शोधून काढण्याविषयींचे यत्न सर्वथा निष्फळ झाले. परंतु अधिक सुखाची इच्छा धरून बसणें हेंच आह्मांस उचित आहे कीं काय याविषयीं जर आह्मीं विचार केला तर उत्तराची गरज रहाणार नाहीं.

आह्मी अधिक सुखाची आशा धरितों आणि आह्मांला वाटतें कीं तें आह्मांला मिळावें याविषयीं आमचा एका तऱ्हेचा हक्कच आहे. ह्मणून तें न मिळालें ह्मणजे तो अन्यायसाच भासतो. आणि यामुळेंच आह्मी वरील प्रश्न करण्यास प्रवृत्त होतों. आतां आह्मांस कोणती तरी वस्तु मिळावी तितकी किंवा त्याच्यापेक्षां कमी मिळते असें ठरविण्यास किती मिळावी याचें कांहीं तरी मान पाहिजे. तें मान या गोष्टीमध्यें आह्मी पूर्वीं जें सुख अनुभविलें तेंच. कारण कोणत्याही गोष्टीविषयीं आशा धरून ती मिळावीच असें जें आह्मांस वाटतें तें ती पूर्वीं मिळाल्यामुळेंच. ह्मणून जी वस्तु आह्मांस पूर्वीं कधीं प्राप्त झाली नाहीं तीविषयीं आह्मी आशा करीत नाहीं यास्तव ती जर आह्मांस कधींही मिळाली नाहीं तर त्यांत कांहीं दुःख वाटत नाहीं तेव्हां कोणतीही वस्तु हरवल्यापासून दुःख जें होतें तें पूर्वीं आपणास प्राप्त झाली होती ह्मणूनच होतें. आपणाजवळ ती नसणें ही गोष्ट स्वाभाविकच आहे; परंतु पूर्वीं नसून प्राप्त होणें ही गोष्ट देणाराच्या कृपेमुळें होते. यास्तव ती वस्तू नसून आपणास मिळाली ह्मणून देणाराचे आभार मानिले पाहिजेत, त्याणें ती नेली ह्मणून त्याजला दोष देतां येत नाहीं. त्याणें ती नेल्याच्या योगें केवळ आपल्या पूर्वीच्या स्थितीमध्यें आपण जाऊन पडतों. याप्रमाणें आह्मांस जें पूर्वीं सुख प्राप्त झालें होतें त्याबद्दल आह्मी ईश्वराचे आभार मानावे ते न मानतां उलट ह्यामध्यें कांहीं व्यत्यय येऊन तें आपणास सतत मिळेल अशी जी आशा उत्पन्न झालेली असते तिचा भंग झाला ह्मणजे वरील प्रश्न करून ईश्वरास दोष मात्र देतों. परंतु ईश्वरानें आह्मांस सतत दुःखामध्यें ठेवून कधीं कधीं मात्र जर सुख दिलें तर त्यांचे आह्मी आभार मानू. तर मग त्यानें जें आमचें प्रिय केलें त्याबद्दल आह्मी त्याला दोष देतों हा किती बरें आमचा अन्याय!

आह्मी मागें अनुभविलेल्या सुखावरून च ईश्वरास दोष देतों यास सदा संकटांत असणाऱ्या लोकांचें सबळ प्रमाण आहे. ते जशी ईश्वराची खऱ्या भावानें व शुद्ध अतःकरणानें भक्ति करितात तशी सुखांत असले ल्यांकडून होत नाहीं. त्यांनां सुखाचा लेशही जर प्राप्त झाला तर अत्यानंद होतो. परंतु जे त्यांच्यासारख्या संकटांत कधींही पडलेले नाहींत ते कितीही जरी आनंदांत असले तरी त्यांनां त्यांत कांहीं फारसें वाटत नाहीं. ह्मणून दुःखासारखें भक्तिबीजाचे विकास करणारें दुसरें कांहीं नाहीं. आणि ईश्वराच्या चांगलेपणाविषयी शंका ज्या निघतात त्या फारकरून ज्यांनां कशाचीही चिंता नाहीं अशांपासूनच निघतात. परंतु कित्येकांनां असें वाटतें कीं, जेव्हां आपण सुखामध्यें असतों तेव्हांच आमची ईश्वराघरती श्रद्धा जास्त असते आणि आह्मी धर्माचरणी असतों परंतु विपत्तींत पडतों तेव्हां आमची ती श्रद्धा व तें धर्माचरण हीं डळमळीत होतात. अशा मनुष्यांचा जो सुखांतला भाव तो खरा नव्हे, ते ईश्वराच्या आज्ञेप्रमाणें वागतात ते केवळ इतर जनांच्या आचारास अनुसरून लोकापवादाच्या भीतीमुळें; आपलें कर्तव्य ह्मणून नव्हे. कारण जर ईश्वराविषयीं त्यांच्यामध्यें खरी पूज्यबुद्धी असती, त्याच्यावर त्यांचें दृढ प्रेम असतें तर ईश्वरानें त्यांच्यावरती आणलेल्या संकटांत त्याचें कर्तृत्व जाणून, ते त्याच्यावर भरंवसा ठेऊन ते योग्य रीतीनें सोसते, आणि त्यानें ठेविलेल्या स्थितींतच असणें योग्य मानिते व त्यांत कांहीं कुरकुर केल्याशिवाय रहाणें आपलें कर्तव्य सें वाटून तसें करिते.

याप्रमाणें आह्मी विपत्ती प्राप्त झाली असतां जो खेद करितों त्याचें कारण देणारा व नेणारा जो ईश्वर त्याच्याशी देणें व नेणें यांच्या संबंधानें आपला भाव कसा असावा या विषयीं आह्मी विचार करीत नाहीं. आपणास एक सारिखें पुष्कळ काळपर्यंत सुख प्राप्त झालें, ह्मणजे तें आमचें हक्काचें च आहे असें वाटून आह्मी देवाच्या दयेनें हें प्राप्त झालें आहे ही गोष्ट विसरतों आणि तें एकारकी नाहींसें झालें ह्मणजे त्याजला दोष देतों. परंतु एकसारिखी जी सुखाची स्थिति तिजबद्दल एक सारिखी दुःखाची स्थिति जर प्राप्त झाली असती आणि तिनमध्यें कधीं कधीं सुखलेश मिळाला असें जर झालें असतें तर मात्र आह्मी त्याचे उपकार मानून त्याचेवर भाव, प्रेम, आणि श्रद्धा ठेविली असती. एकसारिख्या सुखाच्या स्थितीचा जर तो परिणाम आणि एकसारिख्या दुःखाच्या स्थितीचा हा परिणाम तर सुखाच्या स्थितीबद्दल दुःखाचीच प्राप्ति व्हावी हें बरें. सु. प.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत रा० रा० खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.